# माणूस

शनिवार
७ ऑगस्ट १९७१
५० पैसे

# हे काय घडते आहे ?

# हे काय घडते आहे ?

'पाडळदे गावाशेजारी (जि. धुळे, ता. शहादे) चिखली नावाचे एक गाव आहे. त्या ठिकाणी पूर्वी बेटसिंग नावाचा आदिवासी राजा होता. तो आता वारला आहे. त्या ठिकाणी सांबरसिंग बेटसिंग हा कारभार पाहत असतो. त्याच्या नावावर जवळजवळ पंधराशे एकर जमीन होती. ती आज त्याचेजवळ राहिलेली नाही. आता गुजर लोकांकडे ती वहितीला आहे. ती आदिवासी राजाची जमीन आहे. ती आम्हाला मिळायला पाहिजे. हा धडधडीत अन्याय आमचेवर होत आहे. तो आता आम्ही सहन कसा करावा ?'

'भिल्ल जनतेला असे वाटू लागले आहे, की आमची या सरकारला गरज नाही. तर या समाजाने का हिंदु म्हणून हिंदुस्थानात राहावे ? स्वतंत्र राज्याची मागणी आम्हाला करावी लागेल...'

सातपुड्याचे भिल्ल-आदिवासी हा आवाज आता उठवू लागलेले आहेत...

पाटीलवाडीला धान्यकोठारावर लोक चालून जात आहेत...

तिरकामठे, भालें, पिस्तुले रोखलेली दिसतात... सातपुडा भागात

हे काय घडते आहे ?

—पुढील स्वातंत्र्यदिन विशेषांकी एक खास लेख.

माणूस शनिवार ७ ऑगस्ट १९७१ पन्नास पैसे
वर्ष अकरा अंक दहा
वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशची वर्गणी पंचेचाळीस रुपये

# माणूस

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

## सप्रेम नमस्कार...

□ २४ जूनच्या अंकात श्री. रा. द. पाध्ये यांनी लोकमान्य टिळकांच्या लखनौ करारावद्दल उल्लेख केला आहे.

'जागर' वाचल्यानंतर ह्याच विषयावर आम्हा मित्रमंडळींची यावर चर्चा सुरू होती.

भारताच्या फाळणीचे खापर टिळकांवर फोडण्यासाठी लागणारी विलक्षण बुद्धिमत्ता प्रा. कुरुंदकरांजवळ आहे यात शंकाच नाही. पण आमच्या एका इतिहासाच्याच प्राध्यापक मित्राने दिलेले स्पष्टीकरण 'माणूस'च्या वाचकांना कळणे योग्य होईल असे मला वाटते.

— ब्रिटिश आणि मुस्लिम विरुद्ध हिंदु असे स्वरूप राष्ट्रीय स्वातंत्र्य आंदोलनाला येत होते ते लोकमान्यांनी ब्रिटिश विरुद्ध हिंदु आणि मुसलमान असे ह्या लखनौ कराराने केले.

लोकमान्यांना मुस्लिमांचा सहकार नुसता मान्य होता असे नसून हवा होता हेही उघड आहे. पण त्याचा अर्थ मुस्लिमांचा अनुनय आणि हिंदूंचा तेजोभंग त्यांना मान्य होता असा नाही.

ब्रिटिशांशी झुंज संपताच किंवा चालू असतानादेखील मुस्लिमांनी अवसानघाताचे धोरण आखले असते तर त्याचाही समाचार घेण्याचे धोरण आखण्याची वृत्ती व सामर्थ्य लोकमान्य टिळकात होते हे निश्चित, तशा वृत्तीचा अभाव असता तर

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक

बहुसंख्यांकांना एकत्र आणणारे गणेशोत्सव, शिवजयंत्युत्सव त्यांनी सुरू केले नसते. हिटलरने रशियाशी अनाक्रमणाचा करार केला याचा अर्थ त्याला जन्मभर रशियाचा अनुनय करायचा होता असा होतो का? रशिया त्रासदायक ठरायला लागल्याबरोबर पहिली आघाडी झुंजत ठेवूनही त्याने रशियाविरुद्ध बाराशे मैलांची दुसरी आघाडी उघडलीच की नाही? काय करायचे ते राष्ट्राची गरज विचारात घेऊनच दरवेळी करायचे असते की नाही? राष्ट्रीय नेत्यात किमान इतकी मुत्सद्देगिरी व सामर्थ्य हवे की नको? हे करार करताना त्याची बेडी होणार नाही इतकी काळजी नेत्याने घ्यायची असते. ती बेडी होत आहे असे दिसताच हे करार तोडून मोडून फेकून द्यायचे असतात. लोकमान्य वीस-पंचवीस वर्षे जगतेवाचते तर ह्या लखनौ कराराचे त्यांनी काय केले असते, हे मुंबईच्या जातीय दंगलीसंबंधाने त्यांनी 'केसरीत' लिहिलेले अग्रलेख प्रा. कुरुंदकरांनी वाचले असते, तर त्यांच्या लक्षात आले असते.

पण आधी एखादा निष्कर्ष काढायचा हे ठरवून टाकले, की मग हे असे विलक्षण निष्कर्ष निघतात. खरी गोष्ट अशी आहे की स्वत: जिनालाही ही फाळणी होईल हे

## लखनौ करार व प्रा. कुरुंदकर

१९४६–४७ पर्यंत खरोखरच वाटत नव्हते. त्या आधी तर फाळणीचा विचार हांही गाळीव मूर्खपणा दिग्गज नेत्यांना वाटत होता. तेथे १९२० ते १९४७ ह्या कालखंडातील विलक्षण घटना, अतुलनीय नेतृत्व इत्यादींचा काहीही परिणाम न होता, लखनौ कराराच्या बीजातून फाळणीचा वृक्ष फोफावला—असे म्हणायला विलक्षण निर्ढावलेले मन लागते यात शंका नाही.

लखनौ कराराचे दूरगामी परिणाम जोखण्याची ताकद म. गांधी व पं. नेहरूंना नव्हती व परिणामांना आळा घालण्याचे सामर्थ्य त्यांना नव्हते असा प्रा. कुरुंदकरांच्या विधानाचा अर्थ होतो. इतर अनेक वेळा त्यांनी पूर्वीची आश्वासने बदलली नसली तरी लखनौ करार जणू त्यांच्या लेखी 'बायबल' ठरला.

प्रा. कुरुंदकरांचे पं. नेहरू व म. गांधींवरचे प्रेम मला समजू शकते. त्या प्रेमापोटी पं. नेहरू हिंदुत्वनिष्ठ कसे होते हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी केलेली 'जागर' ह्याच पुस्तकातील त्यांची बालीश व हास्यास्पद धडपडही मला समजू शकते. पण ज्या अपराधांचे कबुलीजबाब खुद्द पं. नेहरूंनी मोस्लेसारख्या विदेशी पत्रकारांजवळ दिले त्या अपराधांचे खापर लोकमान्य टिळकांवर फोडण्याची त्यांची तथाकथित बुद्धिवादी वृत्ती मला समजू शकत नाही. न्यायालयीन संकेतानुसार दंडार्ह ठरण्यासाठी अपराधी कृत्य व त्यांचा परिणाम ह्यांचा प्रत्यक्ष किंवा निकटचा संबंध असावा लागतो. दूरान्वयाने नव्हे. पण अर्थात हा नियम लागू होतो तो न्यायाची चाड

असणाऱ्यांना, अपराध्यांना वाचविण्यासाठी आपले वकिली कौशल्य वापरणाऱ्यांना नव्हे.

ह्या बुद्धिवादाचा वापर करून फाळणीसाठी हिंदुमहासभा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व बॅ. सावरकरांना जबाबदार धरले जात होते हे कित्येक वर्षे आम्ही पाहात होतो. प्रा. कुरुंदकरांनी ही जबाबदारी लोकमान्य टिळकांवर टाकली हे उत्तम झाले.

पुढचा भाग मी माझ्या मित्राच्या शब्दात सांगतो—

' यापुढती कुरुंदकरापरीस अचाट बुद्धिमंतासाठी ये फळणीविशी जबाबदार पकडोन पंतप्रधान पेशवेपासोन थोरले महाराज श्रीशिवछत्रपती पात्रेतो सर्वास मारोन खावयास वाव जाला. '

२४ जुलै, १९७१ — वि. वि. शेणवाई, नागपूर

□ मी आपल्या पत्रानुसार येथील रुग्णालयात असलेले कवी श्री. नंदेश्वर यांच्याबद्दलची माहिती कळविली होती. माझे पत्र आपण आपल्या पत्रव्यवहाराच्या सदरात प्रसिद्ध केले होते. मी मध्यंतरी माझ्या कामात व्यग्र असल्यामुळे श्री. नंदेश्वर यांना भेटू शकलो नाही. काल येथील रुग्णालयाचे सिव्हिल सर्जन डॉ. डावळे यांना भेटलो. त्यांच्याकडून श्री. नंदेश्वर यांचेबद्दल वेगळीच माहिती कळली. तिची कल्पना आपणास असावी म्हणून मुद्दाम हे पत्र लिहीत आहे.

श्री. नंदेश्वर यांनी श्रीमती प्रतिभा पाटील उपमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे व श्री. गवई उपसभापती विधानसभा यांचे पत्र दाखवून रुग्णालयात प्रवेश मिळविला. ते क्षयाने आजारी होते व रुग्णालयात योग्य ते इलाज चालूच होते. पण ऑपरेशन संबंधी त्यांना कोणत्याच डॉक्टरांनी सांगितले नव्हते. त्यांनी स्वतःच आपले ऑपरेशन होणार असल्याबद्दलची हूल उठवली व आपल्या मित्रांकरवी मदतीसाठी आवाहन करविले. ' माणूस 'मध्ये व इतर वृत्तपत्रांतून आवाहन प्रसिद्ध झाल्यानंतर त्यांच्याकडे जवळ जवळ १००० रु. च्या रोख व मनिऑर्डरने देणग्या आल्या.

मनिऑर्डर येण्यास सुरुवात झाल्यानंतर डॉक्टरांना काही शंका आली व त्यांनी खोलीत जाऊन चौकशी केली. डॉक्टरांनी श्री. नंदेश्वर यांना ऑपरेशनसंबंधी खोटीच बातमी का पसरविली असा प्रश्न केला असता त्यांनी सांगितले, की आपल्या आईला व मुलांना मदतीची फार गरज होती म्हणून तसे केले व ऑपरेशन-संबंधी अमक्या डॉक्टरनी सांगितले असे एकमेकांच्या अनुपस्थितीत एकमेकाला सांगावयास सुरुवात केली.

प्रकृती बरी झाल्यानंतर त्यांना रुग्णालयातून discharge मिळाला व ते आपल्या गावाकडे निघून गेले.

डॉक्टरांच्या सांगण्यानुसार आता ते रोगमुक्त झाले आहेत व ऑपरेशनची किंवा आर्थिक सहाय्याची गरज नाही. वास्तविक पूर्वीदेखील वैद्यकीय सहाय्यासाठी त्यांना

काहीही खर्च करावा लागला नाही.
अशा रीतीने पूर्वी मी कळविलेल्या गोष्टींपैकी काही भाग असत्य होता हे आता उघड झाले आहे. श्री. नंदेश्वर क्षयाने आजारी होते ही गोष्ट खरी आहे. पण ऑपरेशन होणार व त्यासाठी ५०० रु. खर्च येणार हे जे त्यांनी मला सांगितले होते ते खोटे ठरले. प्रारंभी मी या सर्व गोष्टींची शहानिशा करू शकलो नाही व त्यांच्या सांगण्यावर विसंबून आपणाकडे पत्र पाठविले या चुकीबद्दल मी दिलगीर आहे.
डॉ. डावळे यांनी महाराष्ट्र शासनाच्या प्रसिद्धी खात्यास पण कळविले आहे. त्यांच्या सांगण्यावरूनच हे पत्र आपणास लिहीत आहे.
आपण माझे पत्र प्रसिद्ध केल्यानंतर दैनिक 'मराठा'कडूनदेखील सौ. शिरीष पै यांचे पत्र आले होते. त्यांनादेखील श्री. नंदेश्वर यांचा पत्ता कळविला होता. असो.

२६ जुलै, १९७१ — रा. दा. आंबेकर, आंबेजोगाई

□ माझ्या आजारात आपण पाठविलेली मदत बहुमोलाची आहे.
तसेच आपण जी तळमळ व सहानुभूती व्यक्त केली याबद्दल मी आपला सदैव ऋणी आहे.
आपल्यासारख्या मातब्बर माणसाची शक्ती, माझ्या पाठीशी उभी असतानासुद्धा मी अपयशी ठरलो. कारण की, ऑपरेशन करण्यास अयोग्य ठरल्यामुळे, तूर्त मला परत यावे लागले, याबद्दल खेद वाटतो.
पत्र उशीरा पाठवीत आहे याबद्दल आपण मला क्षमा कराल अशी आशा आहे. ह्यावेळी पुण्यामुंबईने माझ्यावर जे जीवाभावाने प्रेम केलं त्याबद्दल शतशः अभिनंदन.

१२ जुलै, १९७१ — कवी मदन नंदेश्वर, बडनेरा

[ वास्तविक आम्हीच आपले अभिनंदन करायला हवे, आपल्या डोकेबाजपणाबद्दल! बाबुराव बागुल, राजा ढाले, नामदेव ढसाळ इत्यादी कविमित्रांनी केलेल्या आवाहनाला 'माणूस'ने प्रसिद्धी दिली. आंबेजोगाई येथील 'माणूस'चे एक वर्गणीदार–वाचक श्री. आंबेकर यांचेमार्फत थोडी चौकशी करून अल्पसे द्रव्यसाहाय्यही पाठवून दिले. या सर्व प्रसिद्धी–चौकशीमुळे आपल्याला हजारभर रुपये पोचले हे ठीकच झाले. पण त्यासाठी एवढी 'हुशारी' दाखवायलाच हवी होती का? पैसे गेल्याचे दुःख नाही. फसवाफसवी नको होती.
ज्यांनी 'माणूस'मधील आवाहनाला दाद देऊन कवी नंदेश्वर यांना मदत पाठविली असेल त्यांनीही कवीला गुन्हा माफ करून प्रकरणावर पडदा टाकावा अशी विनंती आहे. —संपादक ]

## झांजपावली

रवींद्र पिंगे

# नऊ ऑगस्ट !

बेचाळीस साल उगवल्यापासूनच हिंदुस्थानभर क्रांतीचे वारे वाहू लागले, जिकडे तिकडे रणधुमाळी उडाली, लोकांनी स्वातंत्र्यसंग्रामात शड्डू ठोकून धूम उडव्या टाकल्या, वगैरे शोभिवंत भारूड जे पुस्तकात लिहिलेलं असतं, ते पुस्तकापुरतंच ठीक आहे. आमचे खरेखुरे अनुभव मात्र खोटे वाटावेत इतके वेगळे आहेत. अगदी बेचाळीस सालचीच गोष्ट सांगतो. गिरगावातली सदाशिव गल्ली त्या काळात अक्षरशः सुगंधित असायची. तो एक बाळबोध बोळ होता. दुतर्फा छोटया छोटया घरांच्या बाहेर फुलझाडं फुललेली असायची. रात्री तर रेशमी हातरुमालाच्या स्पर्शासारखा जीव पुलकीत करणारा रातराणीचा गंध सर्वत्र दरवळलेला असे. बोळात रहदारीचं नाव नव्हतं. सारा आसमंत शांत होता. पहाटेस चक्क दंव पडायचं. रात्री गारठा असे. अर्धवट ओलसर मातीच्या रस्त्यावरून आम्ही कोपऱ्यावरल्या बटाटयाच्या चाळीला काटकोन करून शाळेत जायचो. पोरंटोरं पाऊसपाण्यात डुंबतात, तसे आम्ही शाळेच्या वातावरणात डुंबलेलो होतो. खेळापलीकडे आम्हाला कशात काही गम्य नव्हते. देशात हाणामारी चालली होती. पण ती आमच्यापर्यंत पोहोचलेली नव्हती आणि देशभक्तीशी तिचा काही संबंध नव्हता. दूर कुठेतरी युद्ध पेटलेलं होतं; रात्री दिवाबंदी असे; पिवळी पगडी गस्त घाली; टॉमीज घोडागाडया उडवायचे; आणि नव्याने निर्माण झालेल्या रेशनिंग खात्यात टेंपरवारी म्हणून भरणा झालेली यच्चयावत मंडळी पायीपायींच कोटातल्या कचेऱ्यांना निघायची, त्यात खूप प्रौढ मुली असायच्या – आमच्या बालजीवनाला घेरणारं वास्तव हे फक्त इतकंच होतं. पुन्हा त्यातही दोन चार केशराच्या काडया होत्याच. 'नवयुग' झाडून सगळेजण वाचीत. प्रत्येकाला तेवढा वेळ असे. क्वचित कुणी 'झंकार'ही वाची. खांडेकरांच्या कादंबऱ्या वाचून त्यांच्यातील वाङ्मयगुणांची चर्चा न करता, वाचक खांडेकरांच्या त्यागी जीवनाबद्दलच गहिंवरून

बोलत. त्यांचा फोटो पुन्हा पुन्हा पहात. त्यांचे सिनेमे पहात. ते मस्त असत. त्यात गोस्गरिबांबद्दल पुळका तर असेच पण शिवाय मीनाक्षीही असे. त्या चित्रपटात कुठे तरी गांधीजींचा आडवळणाने हमखास उल्लेख येई. गांधीजींचा 'हरिजन' निघे. काहीजणांच्या हातात तो क्वचितप्रसंगी दिसेही. पण त्यांचे विषय भारीच पौष्टिक, पथ्यपाण्याचे आणि सोपेपणाचा निष्कारण गवगवा झालेल्या नेटक्या पण जटील इंग्रजीत मांडलेले असत. गांधीजींची दोन इंग्रजी वाक्यं वाचायची म्हणजे चारदा शब्दकोश पहावा लागे. त्यामुळे सर्वसाधारण वाचक 'हरिजन'च्या वाटेला जात नसत हेच सत्य आहे. ते खांडेकर वाचत. खांडेकर फार सोपं करून मांडीत. शिवाय उपमा घालीत. गांधीजींना काय म्हणायचं आहे हे मग वाचकांना अगदी विनासायास आपोआप कळे. गांधीजींचं नि आमच्या पिढीचं हस्तांदोलन हे असं खांडेकरांच्या मध्यस्थीनेच झालं, हा इतिहास आहे.

मात्र चंद्र दिसला नाही तरी आकाशात कुठे तरी तो मिरवीत असतोच, तसे गांधीजी आम्हाला प्रत्यक्ष दिसले नाहीत, तरी कुठे ना कुठे तरी ते गाजत असतच. त्यांचा, सावरकरांचा, सुभाषबाबूंचा, नेहरूंचा, जीनांचा बोलबाला सतत कुठे ना कुठे चालू असे. बरं, तो काळही इतका भाबडा होता की शंकरराव देव असोत की स. का. पाटील असोत, 'दे. भ.' ही दोन अक्षरं त्यांचा पिच्छा पुरवायचीच. वर्तमानपत्रातला त्यांच्या भकास छबीभोवतालचा मजकूर अलगद ओलांडून आम्ही वजिफदार, वझिरअल्ली, नायडू, गोडांबे, देवधर, अमरसिंग, निस्सार वगैरेंच्या अव्वल दर्जाच्या खेळांची बातमीपत्रं भाताच्या वाफेचा खरपूस वास परत परत घ्यावा त्याप्रमाणे पुन्हा पुन्हा वाचीत असू. देशभक्तांचे फोटो कधी कुणी खिशात बाळगले आहेत असं झालं नाही. बिब्बो, मीनाक्षी, काननबाला, नूरजहान, श्याम, शाहू मोडक, ह्यांचे फोटो शौकीनांपाशी जरूर असत. क्रिकेटरांच्या फोटोंचे अल्बम एकजात सर्व शाळकरी मुलांकडे असत. बंद पडलेल्या घड्याळासारखं निरर्थक जीवन वाट्याला आलेली धडधाकट बेकार माणसं प्रत्येक घरात, प्रत्येक चाळीत असत. ती राजकारणाबद्दल त्रासून बोलायची. बेचाळीस साली ह्यातल्या बहुतेकांना चाकऱ्या मिळाल्या. आनंदी आनंद झाला. ही केवळ हिटलरचीच कृपा असं सर्वांनी म्हटलं नि तोंडं गोड केली. आता राजकारणाच्या चर्चांना चांगलीच ओहोटी लागली होती. जी. पी. ओ., रेशनिंग, नेव्हल डॉकयार्ड, रेल्वे, मिलिटरी अकाऊंटस् वगैरे सरकारी खात्यात जो तो स्वत:ला नि स्वत:बरोबर आपल्या मित्रमंडळींना चिकटवून घेत होता. अर्ज केला पण नोकरी मिळाली नाही असं त्या काळात घडलं नाही. हिटलरने महाराष्ट्रातील बेकारांना अचानक सुगीचे दिवस अशा उफराट्या रीतीने दाखवले हे त्या आद्य आर्याचे ऋण कसे विसरायचे! आजचं सोडा; तेव्हाही कुणी विसरलं नाही. ब्रिटिशाने जावे आणि हिटलरने यावे अशी वांच्छा असलेल्यांची संख्या अजिबात उपेक्षणीय नव्हती. त्याचप्रमाणे शेळीच्या दुधाच्या चाऱ्यावर

जगणाऱ्या नेटिवांच्याही हातात देशाचें सुकाणू जाऊ नये असे मानणारा फार मोठा वर्ग घसा खरडून बोलत होता आणि तरीही गांधीजी गाजत होते. त्यांचं येणं जाणं वर्तमानपत्राच्या मथळ्यांनी जाहीर व्हायचं. ते मुंबईला जूहूला आले की अर्धी मुंबई जागी व्हायची. जो तो जुहूच्या चौपाटीवर निघायचा. गांधीजींना डोळे भरून पाहून तृप्त व्हायचा. बहुतेकदा खादी वापरण्याचे व्रत घ्यायचा. असेच एकदा ते येणार म्हणून कळलं. लाखो माणसं बोरीबंदरावर जमा झाली. मीही त्यात होतो. तास गेला. दोन तास गेले. तीन तास गेले. तरी गांधीजींचा पत्ता नाही. शेवटी कळलं की मध्येच कुठेतरी गाडी थांबवून गांधीजींना उतरविण्यात आलं होतं. सारा उसळलेला जनसागर हळहळला. पण नाराज झाला नाही. गांधीजींना मध्येच उतरवून बोरीबंदरात उशीरा आलेल्या गाडीतून काही ग्रामपुढारी उतरले. लोकांनी त्यांचाही जयनाद केला ! त्यात माझ्याही एक-दोन आरोळ्या होत्याच.

ही ऑगस्टच्या अगोदरची गोष्ट झाली. मुंबईत ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात गवालीया तलावावर काँग्रेसचा जंगी उरूस भरणार आहे हे आम्हा शाळकरी पोरांच्या कानावर दुरून दुरून आलं. त्याचा आमच्यावर काहीही परिणाम झाला नाही. सर्वसामान्य मराठी मध्यम वर्गीयावरही झाला नाही. चार पैसे कमवू लागलेली माणसं वेगळ्याच काळजीत गुरफटलेली होती. आजपर्यंत कुणी न ऐकलेल्या महागाईने सामान्यांच्या धोपटमार्गी जीवनात चंचूप्रवेश केला होता. नारळाची कवड नानिवडेकरांच्या दुकानात तीन पैशांना मिळायची, तिचा दर एक आणा झाला होता. गोवेकरांच्या खानावळीत मटनाची सागुती एका आण्याला वाटीभर मिळायची. तिला आता दीड आणा पडू लागला. बदाम, पिस्ते घातलेल्या आटीव मसाल्याच्या दुधाचा दर एक आणा कपावरून चक्क दोन आणे कपावर गेला आणि सामान्य माणसांनी मसाल्याच्या दुधाचं नावच टाकलं ! लोकांच्या खऱ्या काळज्या ह्या होत्या. घासलेटची बाटली भडकली होती, त्याच्याबद्दल लोक चिंतातूर झाले होते. देशाची किंवा स्वातंत्र्याची काळजी फारशी कुणा मध्यम-वर्गीयाला लागली नव्हती. जो तो आपआपल्या नोकऱ्या संभाळून होता. पन्नास रुपये मूळ पगार आणि दोन रुपये महागाई भत्ता, मिळून बावन्न रुपये दरमहा कमवीत होता. त्याच्या पुरुषार्थाची ती हद्द होती.

मात्र जसजसा काँग्रेसचा प्रचंड मंडप उभा राहू लागला, तसतसं वारं बदलू लागलं. मंडपाची आरास बघायला म्हणून लोक केनेडी पूल ओलांडून गवालीया तलावाकडे जाऊ लागले. प्रवेशद्वाराचे मनोरे सुरेखच होते. शांतारामबापूंनी ते बनवले आहेत असे लोक तेव्हा कुजबुजत असत. आम्ही पोरंही गेलो. खूप वेळ तो शामियाना आतून बाहेरून पहात रेंगाळलो. दिवे लागणी झाल्यावर बोलणी खायला घरी परतलो. मला वाटलं, नामी संधी आलीच आहे तर गांधीजींना एकदा पहावं. नेहरूंना पहावं. म्हणून अधिवेशनाच्या दिवशी गेलो. तेव्हा रस्ता माणसांनी नुसता

फुलला होता. पाऊलही पुढे टाकणं अशक्य झालं. गर्दीत जीव घुसमटू लागला माझ्या शेजारी एक उभट टोपी घातलेला माणूस गर्दीतून वाट काढीत मंडपाच्य दिशेने पुढे सरसावीत होता. त्याच्या पुढ्यात एका स्वयंसेवकाने विक्रीसाठी म्हणू राजेंद्रबाबू, सरोजिनी नायडू, सरदार पटेल वगैरे काँग्रेस पुढाऱ्यांचे फोटो धरले तेव्हा त्या माणसाने त्या स्वयंसेवकाला चुकविण्यासाठी म्हणून आपलं अंग कमालीच आक्रसून घेतलं! मी सिद्ध करू शकणार नाही, पण बहुतांशी तो उभट टोपीच माणूस म्हणजे कोल्हापूरचे माधवराव बागलच असावेत. असावेत नाही, माझी खात्री आहे की तेच ते होते! कारण तो चेहरा 'किर्लोस्कर' वगैरे मासिकातू छापून आलेला मी पाहिलेला होता. त्या अफाट गर्दीतून मंडपापर्यंत कसं भिडायचं! मी युक्ती काढली. बाबुलनाथाच्या टेकडीकडून निघालो आणि कंबाला टेकडीच्य मागून घुसून मंडपाच्या पिछाडीला आलो. तिथे गर्दीही नव्हती. पहाराही नव्हता कदाचित मीच स्वयंसेवकासारखा दिसलो असेन! पण मला मंडपात शिरायचं कुणीही आडकाठी केली नाही. मंडपाच्या आतून दिवे प्रज्वलित झालेले होते आणि त्यांच्या झोतात पं. नेहरू काहीच्या काहीच मारू दिसले.

त्या काळी ते गुलाबाच्या फुलासारखे दिसत असे म्हणण्यापेक्षा गेंददार गुलाबा फूल पं. नेहरूंसारखं उत्फुल्ल दिसे असंच म्हटलं पाहिजे. मात्र बाकीचे चेहरे परा कोटीचे खप्पड वाटले. कदाचित् त्याचमुळे आपल्या सौंदर्याच्या बळावर पं. नेहरू आपली सुलतानी त्यांच्यावर यथेच्छ गाजवू शकले. सुंदर रूप ही बंदी नोट आहे ती कुठेही वटवता येते हे देहाच्या सौंदर्याचं महत्त्व नेहरूंनी नीट जाणलं होतं म्हणूनच रूपाकडून टुकार असलेल्यांना पंडीतजींचा एकही होकार जन्मात मिळवित आला नाही. राजबिंडं रूप ही आपली अमोघ शक्ती आहे हे पंडीतजींना ठाऊक होते. त्यांचं जीवन हा ह्या शाश्वत सत्याचा प्रभावी आविष्कार आहे.

मला मंडपात करमलं नाही. कामकाजाची किचकट कळली नाही. म्हणून पुन्ह मागच्या कनातीतून बाहेर आलो. सभा सुटली, रात्र चढली, तरी तसाच बाहेर रेंगाळत उभा राहिलो. इतक्यात मौ. अबुल कलम आझाद मंडपाच्या बाहेर आले त्यांना पाहून एका तरुण भैय्याने त्यांच्या दिशेने झेप घेतली आणि त्यांच्या गोऱ्या पान चरणांची धूळ स्वतःच्या मस्तकी लावली! मला गहिंवरून आलं. मात्र त्या थोर मौलानासाहेबांनी त्या भारावलेल्या किरकोळ भक्ताकडे साधं पाहिलंसुद्धा नाही. सिगरेटची राख झटकून ते तडक एका स्टेशनवॅगनमध्ये बसले. आमच्या नाकातोंडात धुराचा फवारा कोंबून त्या स्टेशनवॅगनने धूम ठोकली. मौलानासाहेब तिथूनच नव्हे तर माझ्यापासूनही दूर दूर गेले.

दुसऱ्या दिवसापासून युद्धकांडाला प्रारंभ झाला. गवालीया तलावावर गोळीबार होतोय हे कळल्यावर कुणालाच काही कळेना. जो तो त्या दिशेने धावू लागला. ट्रॅम्स बंद झाल्या. आम्ही शाळेत होतो. काय गडबड आहे ते पहाण्यासाठी शिक्षक

बाहेर गेले. ती संधी साधून सर्व वर्ग पाटीदप्तरं घेऊन पसार झाला! पळत पळतच आम्ही केनेडी पूल ओलांडला. तिथे गर्दी, गोंधळ आणि आकांत ह्यांचा वणवाच पेटलेला होता. रस्त्यावर लोकांनी बसकण मारली होती. पोलीस बंदुकीच्या नळीतून धुराची नळकांडी उडवीत होते. फिक्कट निळसर रंगाच्या धुराचं एक पटलच त्या भागात तरंगत होतं. बंदुकीचे ठो–ठो आवाज आसमंतात उठत होते. शिट्या मारीत पोलीसांच्या गाड्या घिरट्या घालीत होत्या.

आम्ही टरकलो. पाय काढता घेतला. पण पुन्हा शाळेत जावंसं वाटेना. तो दिवस आम्ही असा रस्त्यावर भटकूनच काढला. एका प्रौढ माणसाला विचारलं, 'ही मारामार का चालल्याय?' तो म्हणाला, 'काल गांधीजींना पकडलं म्हणून.' मग सगळा उलगडा झाला. रस्त्यावर खडूने जिकडे तिकडे लिहून ठेवलेले होत; 'Quit India.' इंडिया म्हणजे हिंदुस्थान हे आम्हाला कळलं. क्वीट म्हणजे काय? आम्ही शाळेतली दोनशे मुलं होतो, पण एकालाही त्या शब्दाचा अर्थ माहीत नव्हता.

दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रांत सगळीकडे दंगली पेटल्याच्या बातम्या झळकल्या. गांधीजींनी स्वातंत्र्याची निर्वाणीची मागणी केली होती. त्यांना हार्दिक पाठिंबा म्हणून देशभर सर्वत्र हरताळ पाळला गेला. जगात हरताळ चालू असताना शाळेत काय म्हणून जायचं?

पाटीदप्तरं घेऊन दुसरा दिवसही आम्ही रस्त्यावरच काढला! ह्यात गांधीजीं-बद्दलचा पुळका होता अशातला भाग नाही. शाळेला हरताळ फासण्यात एक प्रकारची झिंग होती. मस्ती होती. ती आम्ही भोगीत होतो. इतकंच.

कुणी तरी म्हणालं, 'गांधीजींना सोडेपर्यंत शाळेवर बहिष्कार!' आमच्या पाठीच्या कण्यातून आनंदाच्या झिणझिण्या लुकलुकल्या. लागोपाठ महिनो न् महिने शाळेला बुट्टी ही कल्पनाच केव्हढी तुफान रोमांचकारक होती! आम्ही पडत्या फळाची आज्ञा घेतली. मोठी मुलं त्यांच्यापरीने विध्वंस करीतच होती. शाळेच्या भिंतीवर शाईच्या दौती आपटून फोडणं ही फार प्राथमिक अवस्थेतली गोष्ट झाली. मुलं त्याच्याही पुढे गेली आणि सामानाच्या, नकाशांच्या नासधुसीला प्रारंभ झाला. बाहेर रस्त्यावर संग्राम सुरूच होता. पोलीसांवर दगडफेक करणं, टेलीफोनच्या तारा कापणं, ट्रॅम्बा पेटवणं, गोऱ्या सोजिरांना एकटे-दुकटे गाठून बडवणं, हे काम सर्रास चालू होतं. घोळके करून फिरायचं आणि मोडतोडीचं महाभारत डोळे भरून पण कातडी वाचवीत पहायचं एवढंच आमचं काम उरलं. ते आम्ही चोख बजावलं. एकदा दादर स्टेशनाचे भस्म झाल्याची बातमी गिरगावात आली. आम्ही गेलो. स्टेशन जसंच्या तसं उभं होतं! पण आम्ही निराश झालो नाही. आज जाळलं नाही, तर उद्या जाळतील, इतका आशावाद आमच्यापाशी शिल्लक होता.

पृष्ठ ६१ वर

विजय वैद्य

# मुंबई वार्ता

## बोरोसिल ग्लास वर्क्समध्ये टाळेबंदी

निरनिराळ्या प्रयोगशाळा आणि रुग्णालये यांना काचेची उपकरणे पुरवणारी भारतातील ही एकमेव मक्तेदारी कंपनी. अमेरिकेतील कॉर्निंग या कंपनीच्या सहकार्याने, मुम्बईतील मरोळ अंधेरी येथे हे कांच सामान तयार होते. सुमारे आठ-साडे आठशे कामगारांना बेकारीच्या खाईत लोटून या कंपनीने २० जूनपासून टाळेबंदी पुकारली आहे.

कंपनीतील काही गैरप्रकार बाहेर आल्याने व्यवस्थापक आणि सुपरवायझरी कर्मचारी व कामगार यांच्यातील संबंध बिघडले जाऊन शेवटी गाडे या घटनेप्रत येऊन पोहचले. मात्र मुंबईने याबाबत विशेष दखल घेतली नाही असे दिसते.

ही कंपनी गेली सहा वर्षे तोटयात चालू होती, पण कामगार उपायुक्त श्री. भागवत यांच्या प्रयत्नांनी कंपनी व कामगार यांच्यात करार होऊन कामकाज व्यवस्थित चालून १९७० साली कंपनीने १७ लाख रुपये नफा मिळविला. ही कंपनी या क्षेत्रात एकमेव मक्तेदार असूनही तोटयात का याबाबत कामगारांनी व त्यांच्या युनियनने जंगजंग पछाडले आणि शेवटी 'पॅकिंग मटेरिअल स्कॅन्डल' म्हणून ओळखले जाणारे एक प्रकरण युनियनच्या हाती आले. युनियनच्या दाव्यानुसार व्यवस्थापकांनी या 'भानगडीत' लाखो रुपयाची अफरातफर केली. आणि शेवटी युनियनच्या दडपणाने कंपनीला या प्रकरणाबाबत दखल घेणे भाग पडले आणि एकसदस्य चौकशी मंडळ नेमावे लागले. पण चौकशीचा फार्स करण्यात येऊन सत्य परिस्थितीबाबत काहीही थांगपत्ता कंपनीने लागू दिला नाही. या एकसदस्य चौकशी मंडळापुढे ज्या सुपरवायझर्सनी साक्षी दिल्या ते कंपनीच्या दृष्टीने 'अन्‌वॉटेड' ठरले आणि त्याना १८ व १९ जून रोजी कामावरून दूर करण्यात आले. आणि हे सर्व कंपनीने या सर्व लोकांची नावे गुप्त ठेवण्याचे आश्वासन दिले होते तरीही घडले.

पण याबाबत कंपनीने वेगळीच कारणे दाखवायला सुरुवात केली. सुपरवायझरी स्टाफ गरजेपेक्षा अधिक आहे, सुपरवायझर्स 'इंनकॉम्पेटन्ट' आहेत वगैरे, पण कंपनीला खरी सलत होती ती 'सुपरवायझर्स स्टाफ असोसिएशन' ही असोसिएशन

सुपरवायझर्सनी त्यांच्या बेटरमेन्टकरिता स्थापन केली, ( त्यांना कॅज्युअल व सिक लिव्ह सारख्या सवलतीसुद्धा नाहीत ) पण त्यांनी युनियन स्थापायची नाही व त्यांचे जे काही प्रश्न असतील ते वैयक्तिकरित्या व्यवस्थापकांच्या कानी घातले पाहिजेत हा कंपनीचा दृष्टिकोन. सुपरवायझर्स वैयक्तिकरित्याही प्रश्न सोडवायला तयार होते पण व्यवस्थापक त्यातही विशेष रस घेत नव्हते.

'पॅकींग स्कॅन्डल' मध्ये भागीदार असणाऱ्यांना मात्र बढत्या मिळाल्या आणि ज्याचा त्यातील संबंध म्हणजे फक्त वरच्या अधिकाऱ्याने दिलेली 'हाय कोटेशन्स' लिहिण्यापुरता, त्याला कंपनीने चार्जशीट दिले. या प्रकरणामुळे सुपरवायझर्स व कामगारांनी अधिकाऱ्यांचे आदेश पाळायचे नाहीत असे ठरविले आणि त्यामुळे उत्पादनात घट झाली. खरे म्हणजे पात्रता असणाऱ्या योग्य व अनुभवी व्यक्तींनाच बढत्या द्या असा कामगार आयुक्तांचा आदेश, पण तोही कंपनीने आज धुडकावून लावला आहे.

आतापर्यंत १३ सुपरवायझर्सना कंपनीने काढून टाकले आहे व इतर १८ जणांवर कंपनीच्या आवारात पाऊल टाकायला बंदी घातली आहे. कंपनीची कामगार युनियन व 'सुपरवायझरी स्टाफ असोसिएशन' या वेगवेगळ्या संघटना आहेत पण सुपरवायझर्स आणि कामगार यांचे संबंध अत्यंत सलोख्याचे आहेत. कामगार युनियनच्या नेत्यांची व्यवस्थापकांबरोबर जी काही बोलणी चालू होती त्यावेळी व्यवस्थापकांनी त्यांना असे सांगितले की कंपनी काही सुपरवायझर्सना कमी करणार आहे, त्याबाबत कामगार युनियनने हस्तक्षेप करू नये पण त्यांच्या सलोख्याच्या संबंधामुळेच त्यांनी हे न मानता सुपरवायझर्सची बाजू घेण्याचा निर्णय घेतला.

सध्या कोर्ट कचेऱ्या वगैरे वगैरे चालू आहे. पण हा दीर्घकाळ चालणारा लढा आहे. एकजूट राखा असा इशारा युनियनने कामगारांना दिला आहे. कामगार एकजूट फोडण्याची व्यवस्थापकांची इच्छा आहे पण त्यांच्या या कारवाईला बळी पडू नका असेही त्यांना सांगण्यात आले आहे.

व्यवस्थापकांची कुलंगडी, भानगडी बाहेर काढण्याबद्दलच्या आकसामुळे हा सारा प्रकार घडणार असेल तर ती अत्यंत निंद्य अशीच गोष्ट आहे असे म्हणावेसे वाटते. □

# पशुवैद्यक विद्यार्थी संपावर

महाराष्ट्रीतील विद्यार्थीवर्ग हा तसा शांतच आहे. दिल्ली, बंगाल, तामिळनाडू, आंध्रप्रदेश प्रमाणे येथील विद्यार्थ्यांनी विद्यापीठे डोक्यावर घेतली नाहीत की हिंसात्मक चळवळी केल्या नाहीत. काही महिन्यांपूर्वी नागपूरमध्ये काही किरकोळ वावगे

पृष्ठ ५१ वर

## चाळीतील भांडणं....

विद्या म्हणजे देवी. जिथे आपण शिकतो ती शाळा, ते कॉलेज म्हणजे मंदीर, अशा टप्प्याने विचार करीत वर गेलो तर विद्यापीठ म्हणजे अगदी स्वर्ग नाही निदान तीर्थक्षेत्र तरी मानावे, नाही का ?

आमच्या हिंदु देवांत कधी कधी भांडणे होत, रुसवे फुगवे होत, (अजूनही होत असतील, कोण जाणे !) मग दोन तीर्थक्षेत्रांत–विद्यापीठांत–झगडा तसा काही अमानवी वाटू नये.

पण पंजाब–हरियानाच्या वीस हजार विद्यार्थ्यांना या झगडयात भरडून घ्यावे लागते, हा यातला वाईट भाग.

कथा सुरू होते मार्च १९७० पासून. पंजाब सरकारने या महिन्यात एक फतवा काढला. नव्याने स्थापन झालेल्या गुरुनानक विद्यापीठाशी जालंदर, कपुरताला, गुरुदासपूर आणि अमृतसर जिल्हयांतील ५६ कॉलेजांनी संलग्न व्हावे असा आदेश होता. पैकी ४२ कॉलेजेस् राजीखुषीने चंडीगडच्या पंजाब विद्यापीठाची सोयरीक तोडून अमृतसरच्या नानक विद्यापीठाशी नांदायला लागली. फक्त जालंदर जिल्हयातील दयाराम अँग्लो आणि आर्य समाज चालवीत असलेली कॉलेजेस् मात्र तंटा करून उभी राहिली.

दोन्ही विद्यापीठे या चौदा कॉलेजांवर आपला हक्क सांगू लागली. कुलगुरुंची पत्रकं–प्रतीपत्रकं सुरू झाली.

मध्ये नानक विद्यापीठात गुरुमुखीला शिक्षणाचे माध्यम करण्यासंबंधी हालचाल होताच सुप्रीम कोर्टापर्यंत प्रकरण गेले, त्या वेळी या चौदा कॉलेजांच्या 'मालकी'चा प्रश्न निघाला. पण कोर्ट म्हणाले, 'आपसातील भांडणं आपसात. आता केस फक्त माध्यमाची आहे नं, मग इतर प्रश्नांची लुडबुड नको.'

दरम्यान पोरं परीक्षेला बसली पंजाब विद्यापीठाच्या. पण निकालच हाती येईना. मग डिग्री सर्टिफिकेट्स् येईनात. कुणाकडे मागायचे ? चंडीगड की अमृतसर?

या मारमारीत पोरांची त्यांच्या पालकांची कुचंबणा. ही भाडणं आता अगदी चाळीतल्या पातळीवर गेली. 'तू माझ्या अंगणात केर टाकतेस का, हे बघ मी खरकटं फेकते' सारखे.

म्हणजे चंदीगडने आज जाहीर करायचं नानक विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना

आमच्या मेडिकल कॉलेजात प्रवेश नाही. दुसऱ्या दिवशी अमृतसरमधून घोषणा होते, पंजाब विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना आमच्या हद्दीतील मेडिकल, इंजिनिअरिंग आणि पोस्ट ग्रॅज्युएट कोर्सेससाठी प्रवेश नाही!

◻

## भिकारी हटाव

करुणानिधींच्या तामिळनाडूने आता कंबर कसली आहे. बस्स्. भिकाऱ्यांचे निर्मूलन करायचे. तेही सात वर्षात.

आणि सात वर्षांनी मद्रासकडे गेलात तर रेल्वे स्टेशनवर, देवळासमोर, रस्त्यावर, हॉटेलसमोर, बागेत कुठ्ठे कुठ्ठे म्हणून पसरलेले हात दिसणार नाहीत. तुम्ही उदार, मानवतावादी असाल, किंवा बरोबरच्या मैत्रीणीवर 'इम्प्' मारण्यासाठी उगीचच भीक घालणारे असाल तर तुम्हाला चुकचुकल्यासारखे होईल. महिन्याला दोन चार पैसे वाचू लागतील. असे इतक्या इतक्या कोटी लोकांचे पैसे, म्हणजे इतकी बचत. ती देशाला उपयोगी पडेल, मग आणखी प्रगती मग...

फक्त दोन तीन गोष्टी आवश्यक आहेत. एक म्हणजे करुणानिधी सरकार टिकले पाहिजे. ते टिकेल. इंदिरा गांधी असेपर्यंत द्र. मु. क. ला भीती नाही. दुसरे म्हणजे जनतेने मदत केली पाहिजे. हो, म्हणजे तुम्हीच भीक घालू लागला तर तुम्हाला नाराज करणं भिकाऱ्यांच्या जीवावर नाही का येणार?

तिसरं म्हणजे भिकाऱ्यांचं सहकार्य हवं. सरकार देत असलेलं शिक्षण घेऊन त्यांनी भिक्षापात्र अवलंबिणं सोडावं आणि 'जळो जिणं लाजिरवाणं' टाकून द्यावं.

तर ते असो. या संदर्भात काही आकडे मात्र डोळ्यांसमोर आले, ते नोंद घेऊन विचार करण्यासारखे आहेत.

तामिळनाडूत सत्तर हजारांपैकी आठ हजार भिकारी कुष्ठरोगाने पिडलेले आहेत.

यापैकी दोन हजारांची व्यवस्था सरकारच्या योजनेखाली संगोपनगृहात होईल. एकूण तीन लाख रुपये भिकारी निर्मूलन योजनेसाठी वापरण्यात येतील. यासाठी करुणानिधींच्या वाढदिवशी लॉटरीचा ड्रॉ ठेवून आलेले उत्पन्न योजनेकडे घेण्यात आले.

अलिकडेच या योजनेकरीता एक पहाणी झाली. त्यानुसार शहरातील एका भिकाऱ्यास दिवसाला पाच रुपये सरासरी मिळतात. लग्न समारंभ, हॉटेल आणि गल्लीबोळात शिळं-पाकं खाऊन दिवस भागतो, त्यामुळे पैसा वाचतो. त्याचं काय होत असेल!

शहरातील भिकाऱ्याला सरासरी पाच, तर खेड्यातल्याला कमीत कमी एक रुपया धरला तरी एकूण सरासरी रुपये तीन. म्हणजे एकटया तामीळनाडूत

दिवसाला दोन लाख दहा हजार रुपये भीक घातली जाते. या आकड्यात काही चूक होत नसली, तर सबंध देशभर किती पैसा असा बाजूला पडत असेल !

कलकत्त्यात एका पदवीधराने बेकारीला कंटाळून बूट पॉलिशचा धंदा सुरू केला. त्याचे उत्पन्न दिवसाला एक रुपया सत्तर पैसे ! ◻

## कुणाला काय न् कुणाला काय ?

खूप दिवसांपूर्वी एक चुटका ऐकला होता. एक सद्गृहस्थ भयंकर दुःखित चेहरा करून बसलेला असतो. कुणी वाटसरू विचारतो, 'काय रे बाबा, काय झालं ? घरी सगळं ठीकठाक नं ?'

'घरच्यांना काय धाड आलीय्. ही प्लेगची साथ ओसरली आहे नं, त्याचं दुःख आहे.'

'साथ ओसरली म्हणून ?'

'हो, स्मशानात लाकडं विकण्याचा धंदा आहे माझा.'

चुटक्याची आठवण झाली डोळे येण्याच्या साथीवरून. बहुधा मुंबईतून सुरू झालेली ही साथ झपाट्याने देशभर पसरली. थेट निर्वासितांच्या छावण्यांपर्यंत.

कुणाला काय न् कुणाला काय.

लखनौच्या एका औषध कारखानदाराने लगेच फायदा घेतला. हा कारखाना डोळ्यासाठी दोन-तीन प्रतीची औषधं तयार करतो.

साथ येताच सर्वांत चांगल्या प्रतीची औषधं एकदम गडप.

का ? उत्तर सोप्पं अगदी. निकृष्ट प्रतीची किंवा महाग दराची औषधं खपावी म्हणून. १·७५ रु. किंमत असलेली औषधं अदृश्य तर ४·७५ रु. वाली हवी तेवढी.

लखनौमध्ये गेल्या पंधरवड्यात दिवसाला हजार ते बाराशे बाटल्यांची मागणी होती. पण आठवडाभर पुरवठाच नाही. लाल, नशीले डोळे मिरवत लखनौची मंडळी आसवं ढाळीत होती.

खेड्यातील लोकांना तर याहून जास्त त्रास. डॉक्टर औषधं लिहून देत, ते घ्यायला जायचं तर दुकानदाराने भलतंच दाखवावं. पुनः डॉक्टरची संमती घ्यायला गावी जायचं, पुनः यायचं. डॉक्टर दहा ते वीस टक्के ताकदीचं औषध सांगायचे, त्याची किंमत १·८० रु. तर दुकानदाराकडे असायचे तीस टक्के ताकदीचं. किंमत रु. २·४०.

कारखानदार नि दुकानदार अशी नडवणूक करून दहा-पंधरा दिवसांत गबर बनले.

तक्रार, चौकशी, शिक्षा वगैरे सोपस्कार आटपेपर्यंत साथच गेली होती. आता तिकडे लक्ष द्यायला वेळ आहे कुणाला ? ◻ ◻ ◻

सौ. तारा पंडित

# हे कलकत्ता

## हिरवा रंग शिल्लक ठेवा !

कलकत्ता कॉर्पोरेशनने व्हिक्टोरिया स्क्वेअरची जागा भारत सरकारला टी. व्ही. स्टेशनसाठी लीजवर देण्याचे ठरविले आहे. ही बातमी तर धक्काच देणारी आहे. स्वातंत्र्य मिळाल्यापासून चोवीस वर्षांच्या दीर्घ काळात कलकत्ता कॉर्पोरेशनने एकही लोकहिताचे काम केलेले नाही. आता जे काय थोडेसे आमचे म्हणून शिल्लक आहे तेही हिसकावून घेण्याचा यांना काय अधिकार आहे बरे ? दिवसेंदिवस कलकत्त्याचे सौन्दर्य नष्ट होत आहे ते हळूहळू कमी होत जाणाऱ्या हिरवळीबरोबर. डलहौसी स्क्वेअर, कर्झन पार्क आणि मैदानाचा काही भाग एवढाच काय तो हिरवळीचा भाग उरला आहे. येथील टाऊन प्लॅनर्सचे हे राजकारण आल्हाददायी हिरव्या रंगाचा बळी घ्यायलाच उठले आहे जणू !

## आम्ही भित्रे आहोत का ?

कलकत्त्याचे एक रहिवासी–श्री. प्रमोदकुमार चटर्जी विचारतात, आम्ही भित्रे आहोत की काय ?...बंगालमध्ये शक्तिशाली नेतृत्व असते तर विध्वंसक कृत्यांचा व भेकड हल्लेखोरांचा बंगालमधून कधीच समूळ नायनाट झाला असता. पश्चिम बंगालचे लोक हल्लेखोर प्रवृत्तीचे आहेत व त्यांचे रक्त पटकन गरम होते हे खरे असले तरी आवश्यक ठिकाणी सामना देण्यास मात्र ते सरसावत नाहीत, हेसुद्धा खरे आहे. श्री. चटर्जी हे कबूल करतात व पुढे म्हणतात–' कदाचित् शीख, जाट, मराठा किंवा गुरखा ह्यांच्या सर्वांच्या मानाने आमची जातच भित्री असावी.' वस्तुस्थिती अशी आहे की भर दिवसा पडणारे खून हेच उघड्या डोळ्यांनी बघणाऱ्या हजारो माणसांचे ' शौर्य ' बोलून दाखवतात. चारसहा माणसे एकाला मरेपर्यंत मारतात. तो मेल्यानंतर ते सारेजण पळून जातात. हे हल्ले अगदी अचानक होत असतात. आता मरणाऱ्याचा मृत्यू आपण टाळू शकत नाही हे खरे. पण खुनी माणसाला पकडून त्याला बेदम मारणे एवढे आम्हाला का जमू नये ? असा श्री. चटर्जींचा सवाल आहे. ते पुढे म्हणतात–पंजाब, महाराष्ट्र व नेपाळमध्ये अशा घटना घडतात काय ? पश्चिम बंगालमध्ये मात्र बोटावर मोजण्याइतकी माणसे

किंवा गुंड हजारो लोकांवर मात करतात. कारण लोकांमध्ये ह्या गुंडांना पकडून मारण्याचे किंवा निदान पोलिसांच्या स्वाधीन करण्याचे धैर्यच नाही. एखादा गुंड कसली कृत्ये करतो हे त्या वस्तीत राहणाऱ्या सर्वांना माहीत असते पण केवळ जिवाच्या भीतीने ते सारे चूप बसतात. ' खरेच, आम्ही इतके दुर्बल कसे ?'

## रस्ते सुगंधित ...

ऑस्ट्रेलियातील सिडने शहराच्या मुख्य बाजारपेठेतील रस्ते यानंतर नुसते स्वच्छ राहतील एवढेच नव्हे तर त्यांवर सुगंधित जलसिंचन देखील करण्यात येणार आहे. पायी चालणाऱ्या लोकांना जरा ' प्लेझंट ' वाटावे हा हेतु. ही बातमी ऐकली तेव्हा नजरेसमोर कलकत्ता उभं राहिलं. इथे देखील शहराच्या सर्व भागात एक विशिष्ट प्रकारचा (?) गंध येतच असतो. गल्लीबोळात काय, छोटया रस्त्यावर काय किंवा मोठ्या रस्त्यांवर काय, कुठल्याही सिंचनाचा उपयोग न करता गंध येतच असतो. बेशिस्तपणा, घाणेरड्या सवयी आणि जाणून बुजून होणारी अविचाराची वर्तणूक ह्यातूनच त्या विशिष्ट गंधाची निष्पत्ति आहे. ह्या सत्यापासून दूर पळणे अशक्य ! यात भर म्हणूनच की काय निदान फूटपाथ स्वच्छ आणि व्यवस्थित ठेवण्यातही कॉर्पोरेशन अयशस्वी ठरले आहे; मोठ्या रस्त्यांबद्दल तर बोलायची सोयच नाही.




अलीकडे फूटपाथची दृश्ये मोठी विचित्र झाली आहेत. छोटीछोटी दुकाने साऱ्या फूटपाथभर ओळीने लागलेली असतात. फळवाले, फुलवाले, चहावाले हे देखील तिथेच अडचण निर्माण करतात. त्यांचा माल इतकी जागा व्यापतो की पायी चालणारा हमखास अडखळून पडावा. फूटपाथला लागून सर्व बाजूंनी उन्हाने वाळलेला नि पावसाच्या पाण्याबरोबर वाहात आलेला कचरा साचलेला असतो.

यापेक्षा आणखी घाण ती काय असणार ? असल्या फूटपाथने चालायलादेखील स्किल् लागतं हो ! ...तेव्हा इकडल्या दृष्टिकोनातून पाहता फूटपाथवर सुगंधी जलसिंचन करणारे सिडनेचे लोक लहरीच म्हणायला हवेत. कदाचित् अति सौंदर्यदृष्टिचा अशही त्यांच्यात वसत असावा. कोण जाणे ! त्यांचं काही का असेना, आमच्या कलकत्त्याचे फूटपाथ मात्र भयंकर घाणीचा नमुना आहे हे मात्र खरं ! इतरांसाठी नाही पण निदान स्वतःच्या फायद्यासाठी तरी प्रत्येकजण कर्तव्यनिष्ठ राहिला तरच काही सुधारणा होण्याची आशा आहे; एरवी हे असंच चालत राहणार !

## इलेक्ट्रिक गाड्या

कलकत्त्याच्या उपनगरांना जोडणाऱ्या इलेक्ट्रिक गाड्या म्हणजे हल्ली एक तमाशाच झालाय् ! त्यांतल्या त्यात सिआल्डा ते बोनगाव ह्या मार्गावर गैरव्यवस्था विशेषकरून जाणवते आहे. प्रत्येक गाडी स्टेशनात येते ती ठरलेल्या वेळेपेक्षा अर्धा तास उशीरा. त्यामुळे गाड्यांची वेळापत्रकं म्हणजे निव्वळ फार्स झाला आहे. याशिवाय नेहमीच कोणत्या ना कोणत्या गाड्या कॅन्सल होत असतात. त्यामुळे चालणाऱ्या गाड्यांमध्ये विलक्षण गर्दी होते. एखादेवेळी तर चारचार लोकल गाड्यांचे उतारू एकाच गाडीत नाइलाजास्तव समाविष्ट केले जातात. माल खच्चून भरावा तशी माणसे कोंबली जातात. रोज दोनचार माणसे जीव गुदमरल्यामुळे बेशुद्ध होऊन पडतात. दिवे आणि पंखे यांच्या चोऱ्यांमुळे लोकांना अंधारात व पंख्याशिवाय प्रवास करावा लागतो. एखादेवेळी तर एखाद्या डब्याला दारे खिडक्या देखील नसतात. त्यामुळे सर्व लोक एकुलत्या एका दाराशी हवा मिळावी म्हणून गर्दी करू लागतात.

रोज ह्या दिव्यातून पार पडणारी माणसे म्हणतात वर्तमानपत्रांनी आपापले रिपोर्टर एकदा पाठवावेत व त्यांना हा प्रवास करायला सांगावा म्हणजेच लोकल गाड्यांनी जाणाऱ्या उतारूंच्या अडचणी काय आहेत त्या त्यांना स्पष्टपणे कळतील !

□ □ □

बँकांचे राष्ट्रीयीकरण असे राबविले नाही तर त्यातून काहीच निष्पन्न होणार नाही.

# कृषिवल-पत-पुस्तक

प्रा. रा. म. बिवलकर

बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा १९ जुलै १९७१ हा दुसरा वाढदिवस. गेल्या दोन वर्षात राष्ट्रीयीकृत बँकांच्या शाखा तीन हजारांनी वाढल्या आणि त्या आता एकूण ११ हजारांवर गेल्या. नव्या तीन हजार शाखांपैकी दोन हजार शाखा ग्रामीण भागात उघडल्या गेल्या आणि ग्रामीण भागातील ठेवीही हळुहळु पण निश्चितपणे वाढत आहेत. पण सर्व नव राष्ट्रीयीकृत बँकांची संचालक मंडळे नेमली गेली असली तरी अशा संचालक मंडळांवरील बँक-कर्मचाऱ्यांच्या प्रतिनिधींच्या व ठेवीदारांच्या प्रतिनिधींच्या नेमणुका अजून रेंगाळल्या आहेत. गेल्या दोन महिन्यांत राष्ट्रीयीकृत बँक क्षेत्रात किमान पाच अफरातफरीची प्रकरणे उजेडात आली आहेत आणि त्यापैकी दोन प्रकरणांना राजकीय रंग आहे. बँक-कर्मचाऱ्यांमध्ये लाचलुचपतीचा प्रादुर्भाव झाला आहे अशा बातम्या येत आहेत आणि एकंदरीत बँक-व्यवहार व संघटन यांचा योग्य ढाचा गेल्या दोन वर्षातही बसलेला नाही या गोष्टी शासनाला भूषणावह नाहीत.

राष्ट्रीयीकरणानंतर स्वतंत्र उद्योग, लघुउद्योग यांच्याप्रमाणेच कृषिक्षेत्रालाही राष्ट्रीयीकृत बँकांनी पतपुरवठा करावा असे धोरण जाहीर झाले. बँकानीही या धोरणाला अनुसरून कृषिक्षेत्रात अशी कर्जे सढळ हस्ते देण्याचे धोरण स्वीकारले. छोटया मोठया शेतकऱ्यांना मदत करण्याच्या अनेक योजना कार्यान्वित केल्या. शेतकऱ्यांच्या गरजा जास्तीत जास्त भागविण्याची निरनिराळया बँकांत चढाओढच लागली. पण हे करताना, सहकारी क्षेत्राकरता आजवर जवळजवळ 'रक्षित' ठेवलेल्या अशा कृषिक्षेत्रात व्यापारी बँकांचा व्यवहार सुरू झाला. सहकार-क्षेत्रातील मंडळींना आपल्या राखीव कुरणात होणारी ही घूसखोरी मान्य कशी होणार? त्यांनी याबद्दल ओरड सुरू केली. व्यापारी बँकांमुळे सहकारी बँकांचा धंदा बुडाला अगर बुडत आहे असे त्यांना वाटू लागले. वास्तविक त्यांना तसे वाटण्याची जरुरी नाही. कृषिक्षेत्रात पतपुरवठयाची एवढी जबरदस्त मागणी आहे की ही सहकारी मंडळी त्यातल्या २०।२५ टक्के मागणीलाही पुरी पडू शकत नाहीत आणि मग ती मागणी छुपे सावकार-सराफ पुरवितात आणि शेतकरी त्यांच्या भारी व्याजापोटी मरतो. ही खरी स्थिती.

सहकारक्षेत्राची वर उल्लेखिलेली ओरड वा भीति किती निराधार आहे हे 'ऑल इंडिया रूरल क्रेडिट सर्व्हे कमिटी'च्या अलीकडच्या अहवालातील आंकडेवारीवरून सिद्ध होईल. या अहवालाप्रमाणे १९७३–७४ साली शेतीकरता किमान २ हजार कोटी रुपयांचा छोटया मुदतीचा पतपुरवठा लागेल. यापैकी फारतर ७५७ कोटी रुपयांची छोटया मुदतीची कर्जे सहकारी बँका शेतकऱ्यांना देऊ शकतील. याचा अर्थ छोटया मुदतीच्या कर्ज मागणीपैकी १३०० कोटी रुपयांचा पतपुरवठा व्यापारी बँकांनीच करायला हवा. शेती-व्यवसायात, बांध, बंदिस्ती, विहिरी, यांसारख्या भांडवली-गुंतवणुकीकरता जी दीर्घ मुदतीची कर्जे लागतात त्या संबंधीचा अंदाजही वरील अहवालाने वर्तविला आहे. चौथ्या पंचवार्षिक योजना काळात याकरता १५०० कोटी रुपये लागतील. याकरता ७०० कोटी रुपये देशातील भूविकास बँकांतर्फे दिले जावे एवढीच तरतूद चौथ्या पंचवार्षिक योजनेने केली आहे. म्हणजे पुन्हा याही प्रकारच्या कर्जाबाबतीत व्यापारी बँकांनी ८०० कोटी रुपयांचा आपला वाटा उचलला पाहिजे. हे आकडे हेच दर्शवितात, की कृषिक्षेत्राच्या मागणीपैकी जास्तीत जास्त ५० टक्क्यांपर्यंत पतपुरवठा सहकारी क्षेत्र करू शकेल आणि तेही त्या क्षेत्रातील लांडया-लबाडया, अफरातफरी, फसवाफसवी, नातेवाईकांना बुडित कर्जे देणे या गोष्टी कमी झाल्या व दिलेली कर्जे वेळेवर परत करण्याचे धोरण कर्जदारांनी अवलंबिले तरच शक्य आहे. याचा अर्थ, सहकारी क्षेत्राच्या तोंडचा घास न काढताही व्यापारी बँकांना आपल्या धंद्याकरता हवे तेवढे क्षेत्र कृषिक्षेत्रात नक्कीच उपलब्ध आहे. या देशाच्या वाढत्या लोकसंख्येच्या मुखी ओला अर्धा घास अधिक घालण्याच्या दृष्टीने सहकारी पतपेढया, व्यापारी बँका आणि इतर पतसंस्था यांनी एकोप्याने, सुसंघटितपणे, सुविहित पद्धतीने शेतकऱ्यांना उत्पादक कर्जे देण्याचे धोरण अ-विलंबपणे अवलंबिले पाहिजे.

आज या विविध संस्था एकाच क्षेत्रात काम करीत असताही त्यांच्या व्यवहारात सुसूत्रपणा नाही. त्यामुळे शेतकरी बंधूंना एकाच वेळी, एकाच तारणावर, एकाच कार्याकरता विविध पतसंस्थांकडून कर्जे घेणे शक्य आहे, तशी संधी समोर दिसत असता तसे करण्याचा मोह त्याला होणे साहजिकच आहे. त्यामुळे ज्या भागात विविध पतसंस्था काम करतात त्या भागात असा दुफेरी व जरुरीपेक्षा अधिक पतपुरवठा केला गेला आहे. कित्येक वेळा, ज्या शेतकऱ्याने घेतलेले कर्ज परत न करून आपल्या सहकारी सोसायटीला बुडविले त्याला व्यापारी बँकेने नवे कर्ज दिले आहे. त्याच तारणावर!

पतपुरवठयाच्या व्यवहारात सुसूत्रता यावी म्हणून राष्ट्रीय पातळीवर सुसूत्रता समितीची स्थापना करण्यात आली. या समितीने कृषि-पत-पुरवठ्याबाबत आणि व्यापारी बँका व सहकारी बँका यांच्या व्यवहारात सुसूत्रता आणण्यासाठी काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. १: जर शेतकरी एखाद्या सहकारी संस्थेचा

सभासद असेल तर त्या संस्थेला कळविल्यावाचून बँकेने त्या शेतकऱ्याला कर्ज देऊ नये. २ : सहकारी संस्थेच्या सभासदाला तिने कर्ज दिले असेल तर संस्थेच्या अनुमतीवाचून व्यापारी बँकेने त्या शेतकऱ्याला कर्ज देऊ नये. ३ : सहकारी संस्थेचा सभासद असलेल्या व तिचे घेतलेले कर्ज वेळेवारी परत न करणाऱ्या थकबाकीदाराला बँकेने केव्हाही कर्ज देऊ नये. ४ : पण शेतकरी कुठल्याही सहकारी संस्थेचा सभासदच नसेल तर बँकेने योग्य त्या पद्धतीने कर्ज द्यायला हरकत नाही.

पण या सूचनांचा अवलंब केला तरी दुहेरी पत-पुरवठ्यावर आळा घालणे शक्य नाही. कारण बँका व सहकारी संस्था यांनी कर्जदानाबाबत एकमेकांना वेळोवेळी माहिती द्यावी अशी अपेक्षा असली, तरी प्रत्यक्षात ते घडत नाही. सहकारी संस्थेचा सभासद नसणाऱ्या शेतकऱ्याला बँकेने कर्ज द्यायचे. पण हे कर्ज घेतल्यावर तो शेतकरी एखाद्या सहकारी संस्थेचा सभासद होतो व सहकारी संस्थेकडून नवे कर्ज घेतो. त्याने आधी बँकेकडून कर्ज घेतले आहे हे उघडकीस येईल, पण तेव्हा फार उशीर झालेला असेल !

शेतसारा वसुली करणाऱ्या तलाठी मंडळींजवळ जे लँड रेकॉर्ड असते त्यात व ते जमीनमालकाला देतात त्या सातबाराच्या उताऱ्यावर जमिनीच्या तारणावर घेतलेल्या कर्जांचा उल्लेख असतो. पण तलाठी, सातबाराचे उतारे, त्यावरील नोंदी, त्यावरील ढवळाढवळी, त्याकरता चालणारी मूठदाबी याबद्दल न बोललेले बरे ! शिवाय सातबाराच्या उताऱ्यावर जमीनधारकाने सहकारी पतसंस्थेकडून अगर भूविकास बँकेकडून काढलेल्या कर्जाचीच नोंद असणार. सावकाराकडून अगर व्यापारी बँकेकडून काढलेल्या कर्जाची नोंद त्यावर नसते. सातबाराच्या उताऱ्यावरही घेतलेल्या कर्जाची नोंद न करणे व कर्जदाराला 'थकबाकी शून्य' असे प्रमाणपत्र देणे हा तलाठी मंडळींचा अवैध पैसा मिळविण्याचा एक शिरस्ताच होऊन बसला आहे. त्यामुळे कर्जदान करणाऱ्या पतसंस्थांना कर्जदाराच्या खऱ्या पतीची कल्पना येणे कठीण होते.

## परिख यांची योजना

अशा परिस्थितीत कृषिक्षेत्राला मोठ्या प्रमाणात पतपुरवठा करताना दुफेरी कर्जदान होऊ नये म्हणून योग्य उपाय योजना त्वरित करणे जरुरीचे ठरले आहे. अनेक पतसंस्था शेतकऱ्यांना कर्ज द्यायला आज सिद्ध असताना आणि त्यांच्यात आपसात योग्य अनुसंधान नसताना अगदी प्रामाणिक शेतकऱ्यालाही दुहेरी कर्जदान मिळविण्याचा मोह होतो. आणि कर्जदान करणाऱ्या पतसंस्थांचे व्यवहार धोक्यात येतात. गेल्या दोन वर्षात अशी अनेक प्रकरणे झाली. आणि राष्ट्रीयीकृत बँकांचा पैसा बुडित कर्जात अडकून पडला. देशविकासाच्या दृष्टीने असे होणे गैर आहे. बँकांच्या व्यवहारावरील जनतेचा विश्वास त्यामुळे उडून जाईल. म्हणूनच शेतकऱ्याने घेतलेली कर्जे, त्याची पत, कर्जफेडीबाबत त्याच्या सवयी, तो घेतलेली

कर्ज उत्पादक कार्याकरताच वापरतो की नाही या संबंधीची माहिती, पतदात्या पतसंस्थेला त्वरित उपलब्ध करणारे 'कृषिवल-पत पुस्तक' प्रत्येक जमीनधारक शेतकऱ्याला उपलब्ध करून देणे जरूर आहे. अशा तऱ्हेच्या पत-पुस्तकाची कल्पना मध्यंतरी श्री. एच्. एस्. परिख नावाच्या गृहस्थानी 'इकॉनॉमिक टाईम्स्'मध्ये एक लेख लिहून जनतेपुढे मांडली. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे,

ही पत पुस्तिका पासपोर्टच्या आकाराची असावी. त्या पुस्तिकेच्या पहिल्या २/३ पानावर खाली दिलेली माहिती, योग्य त्या महसूल खात्यातील अधिकाऱ्यांनी भरून, ती खरी असल्याचे प्रमाणपत्र दिलेले असावे.

१. जमीनधारकाचे छायाचित्र.
२. त्याची सही वा अंगठा निशाणी.
३. त्याचे संपूर्ण नाव.
४. संपूर्ण पत्ता.
५. कुटुंबातील त्याच्यावर अवलंबून असलेल्यांची संख्या व नावे.
६. त्याची जमीन धारणा :

| | |
|---|---|
| (अ) मालकीची– | १. बागायती..... एकर |
| | २. जिराइत......एकर |
| (ब) खंडाने करीत असलेली | १. बागायती......एकर |
| | २. जिराइती......एकर |
| ७. पाणी पुरवठ्याचे साधन | १. विहीर......संख्या |
| | २. कॅनॉल...... |
| ८. शेतीची यांत्रिक अवजारे | १. ट्रॅक्टर......संख्या |
| | २. पंप...... ,, |
| | ३. इतर अवजारे–तपशील |

त्यानंतरच्या पानावर त्याने काढलेल्या कर्जाचा तपशील असावा :–

१ : कर्ज देणाऱ्या पतसंस्थेचे नाव :–
२ : कर्ज कशाकरता काढले ?
३ : किती ?
४ : कर्ज घेतल्याची तारीख.
५ : हप्ते भरण्यासंबंधीचा तपशील– दिनांक
६ : आजवर किती हप्ते भरले– रक्कम
७ : परत फेड व्हावयाची रक्कम
८ : जमीन तारण दिली आहे का ?

कोणती गाव तालुका सर्व्हे नंबर

९ : यांत्रिक अवजारे तारण लावली आहेत का ? कोणती ?...

(अ) यंत्राचा ब्रॅण्ड

(ब) नंबर

(क) घेतल्याची तारीख

१० : कर्जाची संपूर्ण फेड झाली असल्यास तसे प्रमाणपत्र

११ : इतर...... शेरा :–

शेतकऱ्याने वेळोवेळी घेतलेल्या कर्जाच्या नोंदीकरता बरीचशी पाने या पुस्तिकेची असावी म्हणजे एकच पुस्तिका बरेच दिवस वापरता येईल.

ज्या ज्या वेळी शेतकरी कुठल्याही पतसंस्थेकडे कर्जाकरता अर्ज करील, त्या त्या वेळी त्याने ही पतपुस्तिका त्या त्या पतसंस्थेच्या कार्यालयात हजर केली पाहिजे असा दंडक असावा. पत-पुस्तिका सादर केली नाही तर कुठल्याही पतसंस्थेने कर्जाचा अर्ज मंजूर करू नये. प्रत्येक संस्थेने कर्जदाराला कर्ज दिल्यानंतर लगेच त्याच्या पतपुस्तिकेत योग्य त्या नोंदी केल्या पाहिजेत अशी त्यांच्यावर सक्ती असावी. कर्ज परतफेडीच्याही नोंदी वेळेवारी व्हाव्यात. जरूर तर या गोष्टी प्रत्यक्षात उतरविण्याकरता योग्य ते कायदे सरकारने पास करावेत."

पण अशा तऱ्हेच्या पत-पुस्तिका प्रत्येक जमिनधारकाला देणे, हव्या त्या नोंदी करणे व या सर्व गोष्टी एकाच वेळी सर्व राज्यांकडून पार पाडून घेणे म्हणजे मोठे कठीण कामच आहे. आपल्या एकूण सर्व राज्यांची आणि त्यांच्या महसूल खात्यांची कार्यक्षमता विचारात घेता व झटपट एखादे काम हातावेगळे करण्याचा त्यांचा लौकिक नाही याची दखल घेता श्री. परिख यांची पत-पुस्तके देण्याची योजना खूपच वर्षे खाईल. आणि घोडा पळून गेल्यानंतर तबेल्याला कुलूप लावण्यात स्वारस्य राहाणार नाही.

शेतकऱ्यांना करायच्या पत-पुरवठा-पद्धतीत काय बदल करता येतील की जेणे करून ते शेतकऱ्यांनाही सोईचे पडेल व बँकानाही सुरक्षिततेचे वाटेल या दृष्टीने मी माझ्या काही प्राध्यापक मित्रांजवळ व काही बँकर्सजवळ चर्चा केली. कृषिवल-पत-पुस्तिकेची कल्पना तशी साऱ्यांनाच पसंत पडली. कारण आज शेतकऱ्याला कर्ज देताना बँकर घाबरत असतो. कारण त्याला आपल्या कर्जदाराची तशी खात्री-शीर माहिती उपलब्ध नसते. पण तरीही श्री. परिख यांच्या पत-पुस्तिकेत अनेक संस्थांनी वेळोवेळी नोंदी करायच्या आहेत. त्या करण्यात कुठल्याही संस्थेने गलथान-पणा दाखवला तर तो एकूण पतपुरवठा करणाऱ्या संस्थानाच घातक ठरेल. या दृष्टीने माझे एक प्राध्यापक मित्र श्री. अनंतराव जोग यांनी सांगितलेल्या गोष्टी व्यवहाराच्या दृष्टीने खचितच स्वागतार्ह आहेत. प्रा. जोगांना या विषयात रस आहे आणि शिवाय अलिबाग तालुका खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष या नात्याने सहकारी-पत पुरवठ्यासंबंधी चांगला अनुभव त्यांच्या गाठी जमा आहे.

चर्चा करताना, ते म्हणाले, 'कर्ज देण्याची आजची पद्धत अत्यंत सदोष आहे.

प्राथमिक सोसायटी मार्फत एकरकमी कर्जबटवडा होतो. सर्व रक्कम एकदम हाती पडल्याने, विशिष्ट वेळी जेवढी रक्कम हवी तेवढी त्या कामाकरता वापरून उरलेल्या रकमेचा उपयोग शेतकरी अनुत्पादक गोष्टींवर करतो आणि कर्जाचा बोजा उगाच वाढतो. सोसायट्यांच्या कर्जफेडीच्या हिशेबात तर सावळागोंधळ असतो. सेक्रेटरी वेळेवारी पावत्या देत नाही. त्याने दिल्या तर शेतकरी त्या जपून ठेवीत नाहीत. त्यामुळे कर्जफेड पुरी होताना अनेक भानगडी उपस्थित होतात. घेतलेले कर्ज फेडले आणि पुन्हा काही दिवसांनी कर्ज लागले तर ते वेळेवारी मिळणे कठीण होते. त्यामुळे पुन्हा कर्ज लागेल, या अपेक्षेने शेतकरी कर्जाची फेडच करायचे टाळतो आणि ते साहजिकच आहे. कारण मुळात कर्ज मिळवायला त्याला फार यातायात करावी लागते. मध्यस्थ दलालांचे हात ओले केल्याशिवाय कर्ज मिळत नाही. सहकारी क्षेत्रात कर्ज मिळवून देणारा एक नवा दलाल वर्ग जोपासला गेला आहे.

कर्जदानातील हे दोष श्री. परिखांच्या पत-पुस्तिकेने दूर करता येणार नाहीत. दुफेरी कर्जदानाला आळा घालणेही त्या पद्धतीने शक्य होईल असे वाटत नाही. शेतकऱ्यांना वेळेवारी सुलभरीतीने कर्जपुरवठा करणे, त्यांच्या उचलीचे व फेडीचे चोख हिशेब ठेवणे, दलाल नाहीसे करणे व शेतकरी वर्गास प्रत्यक्ष बँकांचे संपर्कात गोवून, हळूहळू बँकेशी व्यवहार करण्याचे शिक्षण त्यांना मिळण्याची व्यवस्था करणे या गोष्टी व्यापक बँक व्यवहारांच्या दृष्टीने जरूर आहेत.

## नवी नोंदवही

श्री. परिख यांनी सुचविलेल्या पत-पुस्तिकेत, शेतकऱ्यासंबंधी, त्याच्या जमिनीसंबंधी, कर्जासंबंधी, तारणासंबंधी ज्या नोंदी असाव्यात असे म्हटले आहे त्या सर्व योग्यच आहेत. प्रश्न आहे तो हा की राज्यांच्या महसूल खात्यांनी प्रत्येक जमीनधारकांची अशी पतपुस्तिका तयार करणे वर उल्लेखिल्याप्रमाणे वेळखाऊ व कठीण काम आहे. शिवाय त्या पद्धतीत शेतकऱ्याने कुठल्याही पतसंस्थेद्वारे आपली पत-मागणी पुरी करण्याची जी मुभा आहे तीमुळे मूळ प्रश्न सुटेल असे वाटत नाही. प्रा. जोग यांच्याजवळ बोलताना व काही बँकर्सजवळ चर्चा करताना माझ्या मनात साकार झाली ती कल्पना अशी.

या देशात आता बँकांचे जाळे ग्रामीण भागात हळूहळू व निश्चितपणे पसरत जाणार. अशावेळी या संस्था (व्यापारी बँका व सहकारी बँका) यांनी ठेवीदार म्हणून व कर्जदार म्हणून आपापले ' क्लायंटेल ' निश्चित केलेले बरे. त्या दृष्टीने ग्रामीण भागातील १०० वा २०० जमीनधारक त्या भागातील सहकारी वा व्यापारी बँकेशी निगडित करावेत, या जमीनधारकांना लागणारा सर्व प्रकारचा कर्ज पुरवठा मग तो अल्पमुदतीचा असो वा दीर्घ मुदतीचा असो, त्यांच्याशी निगडित अशा बॅन्केनेच करायचा. या जमीनधारकांची पत त्यांच्या स्थावर-जंगम माल-

मत्तेची संपूर्ण पाहणी करून व वेळी महसूल खात्याची मदत घेऊन त्या त्या बँकेने निश्चित कराराची एकदा प्रत्येक कलायंटेची पतधारणा नक्की केल्यावर बँकेने आपले निराळ्या पद्धतीचे पासबुक त्याच्या नावे तयार करायचे. या पतपुस्तिकेत जमीनधारक शेतकऱ्यासंबंधीची सर्व माहिती नोंदली जाईल. त्यानंतर त्या शेतकऱ्याकडून योग्य ते कागदपत्र बँकेने करून घ्यायचे. त्याची कमाल पतधारणे एवढी रक्कम त्याला कर्ज दिली असे दाखवून ती त्याच्या नावे उघडलेल्या या नव्या पद्धतीच्या खात्यात जमा आहे असे दाखवायचे. या करता त्याच्या कमाल पतधारणेएवढ्या कर्जाचा अर्ज घेऊन त्यातच ही रक्कम आपल्या खात्यात जमा करावी असे त्याच्याकडून लिहून घेतले की यातील तांत्रिक अडचणही दूर व्हावी. या पतधारणेपैकी काही रक्कम कर्जधारकाला रोख स्वरुपात व काही खत, अवजोर वगैरे वस्तुस्वरुपात देण्यात येईल अशीही वरील पत-पुस्तकात सोय करता येईल. शेतकरी कर्जधारक त्याला लागेल त्यावेळीच या रकमेतून उचल करील व त्याचवेळी प्रत्यक्ष उचललेल्या रकमेवरच बँकेने व्याज आकारणी सुरू करायची. त्याच्या खाती कमाल कर्जधारणेएवढी जमा केलेली रक्कम ही ' मंजुरी ' या सदरात असल्याने त्या रकमेवर व्याज आकारणे अन्याय्य ठरेल.

या पद्धतीने वर्षातून हव्या त्यावेळी बँकेतून रक्कम मिळण्याची सोय होईल. पैसे हाती आले की त्याचा भरणा करण्याचीही शेतकऱ्याला संवय लागेल. भरणा केलेल्या कर्जाचा रकमेवरची व्याज आकारणी लगेच थांबेल. उचललेल्या रकमेपेक्षा भरणा जास्त झाला तर उर्वरित रकमेवर बँकेने इतर ठेवीदाराप्रमाणे शेतकऱ्याला व्याज द्यावे. यामुळे शेतकऱ्याला कर्जाची फेड-उचल हवी तेव्हा करता आल्याने, आवश्यकता नाही त्यावेळी रकमा हाती ठेवण्याचे प्रयोजन वा प्रलोभन त्याला राहाणारच नाही.

वस्तुरूप कर्जाचा वापर योग्य त्या वस्तूंच्या खरेदीसाठीच होण्यासाठी त्या रकमांची स्वतःसाठी रोख उचल करण्याची शेतकऱ्याला बंदी राहील. फक्त ज्या संस्थेकडून त्याने माल घेतला असेल त्या संस्थेस देण्यासाठी शेतकऱ्याने एका निराळ्या प्रकारच्या आज्ञापत्राचा वापर करावा (नेहमीच्या चेकने या रकमा काढणे शक्य होऊ नये म्हणून अशा विशिष्ट प्रकारच्या आज्ञापत्रांचा वापर बँकांनी प्रसृत करावा). शेतकऱ्यास खते, यंत्रे, पंप आदि नेहमी लागणाऱ्या वस्तू पुरविणाऱ्या संस्थांची त्याच बँकेत खाती असल्यास या रकमा आदा करणे सोपे पडेल.

या पद्धतीत कर्ज वाटप संस्था म्हणून सरकारी क्षेत्रात काम करीत असलेली प्राथमिक सहकारी संस्था त्या कामातून मुक्त होऊन तिला इतर कामांकडे लक्ष देणे सोईचे होईल. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडून आजवर दीड ते दोन टक्के कमी व्याजाने सहकारी प्राथमिक संस्थेला आदा होणारी रक्कम तशाच सुटीच्या व्याजाने सहकारी बँकांप्रमाणे व्यापारी बॅन्कानाही मिळाल्यास वरील वाढलेल्या

कामाबद्दल पाऊण ते एक टक्का स्वतःला ठेवून एक टक्का कमी व्याजाने त्या शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करू शकतील. शिवाय कर्ज वाटपाबाबत श्रीमंत शेतकऱ्यांना अधिक व्याजाचा दर व छोटया जमीनधारकास कमी व्याजाचा दर अशा तऱ्हेने समाजवादी धोरणही बँकांस प्रत्यक्षात उतरविता येईल.

प्राथमिक सहकारी संस्थांपेक्षा बँकांची कार्यपद्धती अधिक कार्यक्षम असल्याने कर्ज वाटपातील घोटाळे व इतर दोष नाहीसे होतील व पत-पुस्तकातील व बँकांच्या लेजरमधील नोंदीमुळे कर्ज दप्तर अत्यंत विश्वासार्ह राहील.

अनेक गावात जमीनधारण करणाऱ्या शेतकऱ्यांचे खाते कुठल्याही एकाच बँकेत ठेऊन त्याच्या ठिकठिकाणच्या जमीनधारणेसंबंधीच्या नोंदी त्याच्या पत-पुस्तिकेत ठेवावी.

प्रतिवर्षी ३१ मार्चला या सर्व खातेदारांचा कर्जहिशेब व्याजासुद्धा पुरा करून पतपुस्तिकेतच अंतर्भूत असलेल्या 'निष्कर्जीपणाचे प्रमाणपत्रांवर' (No dues certificate) बँकेच्या अधिकाऱ्याने सह्या कराव्या व ती खाती कर्जरकमांचे बाबतीत गोठवण्यात यावीत. समजा एखाद्या खातेदाराची उचल रु. ५००।– भरणा रु. ५५०।– झाला. तर ३१ मार्चला रु. ५०० कर्ज + व्याज गोठवून टाकून कर्जदाराची बाकी रक्कम त्याने काढण्या-ठेवण्याकरता इतर ठेवीदाराप्रमाणे मोकळी होईल. कर्जापेक्षा भरणा कमी झाला तर कर्ज+व्याज यातून भरणा केलेली रक्कम वजा करून उरलेली रक्कम खातेदाराच्या पुढील वर्षाच्या कमाल-पतधारणेच्या रकमेतून कमी करून नवी कमाल-पतधारणा त्याचे पत-पुस्तकात नोंदवावी. पुढील वर्षाच्या भरण्यातून प्रथम ती रक्कम पूर्ववर्षीच्या कर्जापोटी जमा केली की तीवर व्याज वाढते राहाणार नाही. पण वर्षात पूर्णभरणा न केल्याची शिक्षा म्हणून वर्षअखेरपर्यंत कमी केलेली कमाल-पत-धारणा मात्र बँकेने बदलू नये. दीर्घ मुदतीच्या कर्जाबाबत कर्जहिशेब विशिष्ट मुदतीत व्हावेत. (अर्थवर्षाऐवजी ५ वा ७ वर्षांनी ते करता येतील.)

वर सुचविलेल्या पद्धतीमुळे शेतकरी व बँका यांचे घनिष्ठसंबंध प्रस्थापित होऊन शेतकऱ्यांच्या दुष्काळासारख्या अडीअडणींचाही बँका विचार करू शकतील. ग्रामीण भागातील ठेवींचे प्रमाण वाढवायचें असेल तर शेतकऱ्यांना अशी कर्जे सुलभरीतीने व हव्या त्या वेळी मिळणे जरूर आहे. उत्पादक कर्जे शेतकऱ्यांचे दुर्दिन नक्की संपवितील व ते खरे ठेवीदार बनतील. बँकांचे राष्ट्रीयीकरण असे राबविले नाही तर त्यातून काहीच निष्पन्न होणार नाही. या दृष्टीने सरकारने त्वरित पावले उचलायला हवीत.

□ □ □

गाडी जसजशी पुण्याजवळ येऊ लागली, तसंतसं तिला अधिकच अस्वस्थ वाटू लागलं. दौण्ड सोडलं आणि एकस्प्रेसने वेग घेतला. इतका वेळ तिला झालं होतं, कधी एकदा पुण्याला पोहोचू ? मागे एकदा दांताच्या डॉक्टरकडे ती गेली होती तेव्हा पण असंच काहीसं वाटलं होतं. बसल्याबसल्याच तिने आळस दिला. संध्याकाळ टळून गेली होती. खिडकीतून बाहेर फक्त अंधार, गाडीच्या तालावर सारे प्रवासी पेंगुळले होते. वाचावं म्हटलं तर दिवेसुद्धा पेंगुळले होते. अन् वाचायला तिचं मनच नव्हतं. असणार तरी कसं ?

एक मोठं कटुसत्य आज तिला उमजलं होतं ! किती उशीरानं ! प्रेम, माया, आईबाप, भाऊ बहीण सगळी नाती खोटी ! मतलबी ! खरं फक्त देणं घेणं ! सकाळी जागी झाली पण तशीच लोळत होती ! इथे काही नवरा ऑफिसला जाण्याची घाई नव्हती ! माहेरी आलेली ती सासुरवाशीण होती. पाटावरून ताटावर अन् ताटावरून...मधल्या घरातल्या टेबलावर चहाच्या कपबशा वाजू लागल्या तशी तिला वाटले उठावं. पण इतक्यात बाबांचे शब्द ऐकू आले –

' मग, आणलं का तिला पातळ ? चेक वटला ?'

यावर शांतता. कुणाला विचारीत असावे बरं ? पुन्हा त्यांचे शब्द, " आज आण मग न चुकता !" यावरतीही शांतता. दोन-तीन कपांचे आवाज येत होते. टेबलावर ! कोण कोण होते कोण जाणे. आता मात्र आवाज जरा मोठा होता –

" आणि –आणायचं नसेल तर तसं सांग, म्हणजे..."

" म्हणजे काय ? " हा आवाज भाऊंचा.

" म्हणजे मी घिवून येईन स्वत: समजलं ?"

---

# मी जिंकले मी हरले !

**सौ. नलिनी अंबाडे**

---

" पण, बाबा..."

" पण बीण काही नाही ! तूच म्हणालास ना की, एकच आहे तिला म्हणून. अन् नाहीतरी सासरी जाताना पातळ घ्यायचंच असतं आपण. "

" मग जाताना बघू. ती काही आता जात नाही लौकर " हा आवाज आईचा ! म्हणजे आईसुद्धा होती म्हणायची तर !



" जायला तोंड असेल तर ना ? " भाऊने आईची री ओढली.
" कालसुद्धा वाट बघत होती पोस्टमनची ! पत्रच न्हाइयै तिकडून. "
" त्याचं काय अडलंय ? हीच भांडली अन् तरातरा आली माहेरी..."
" नाहीतर काय ?"
" तेव्हा, लव्हमॅरेज करताना आठवले होते का घरचे कुणी ?" भाऊच्या

शब्दांना धार होती. यावर बाबांचं हुंसणं ऐकू आलं. " म्हणजे मायलेक दोघंही एक झालात तिच्याविरुद्ध हं !" बाबासाहेब म्हणाले होते. " ते काहीही असो. तिनं माहेरी नाही जायचं तर कुठं ? अन् ती जाईल तेव्हा जाईल. काही बोलू बिलू नका तिला. समजलं ?"-कप ठेवल्याच्या आवाजावरून तिला, त्यांचा राग जाणवला. क्षणभर वाटलं तिला, हे स्वप्न तर नाही ? पण ती अंथरुणात होती तरी पूर्ण जागी होती, झालेला संवाद खरा होता. पण ह्या लोकांना हे कळलंच कसं ? मैत्रिणीच्या लग्नाला आलो सांगितलय आपण; पण, ' कळलं ' ह्यांतच सारा अर्थ गोळा झाला होता. आता ह्या घरात–जन्मदात्या आईवडिलांकडे–राहाण्यांत अर्थ नव्हता. लग्नामुळे तुटलेलं माहेर, पुढे जोडता येईल, ह्या आजपर्यंतच्या आशेचे तुकडे तुकडे झाले होते. अथांग पाण्यात गटांगळचा खाल्ल्याप्रमाणं तिला झालं. केवढचा आत्मविश्वासानं ती पुण्याहून, घरी आली होती ! लग्नानंतर मुलगी म्हणे माहेरची राहात नसते. खरंच तर ! भाऊचं न् तिचं लहानपणापासून पटायचं नाही, पण आईसुद्धा त्याला सामील ? हा धक्का अनपेक्षित होता.

ती उठली तेव्हा घरात शांत झाले होतं–शांत नव्हते फक्त तिचं मन, अकराच्या डाकेलाही पत्र नाही. आज बरोबर १० वा दिवस होता. क्षमा मागणारे पत्र त्यांना मिळूनही दोन दिवस झाले होते. पोस्टमन तसाच गेलेला पाहून ती झट्दिशी पानावरून उठली –

" कागं ? झालं इतक्यात ? पोळी घेना एक. "

हात धुता धुता ती आईकडे टक लावून पाहात होती. हीच का ती सकाळच्या संवादातली आई ? आल्यादिवशी पातळ मागितलं त्यामुळं घोटाळा झाला सगळा. गॅलरीतूनच हात करून तिनं एक टॅक्सी थांबवली.

" आईगं, मी जाते बरं का " तिच्या डोळचाला डोळा देण्याची तिला इच्छा नव्हती–वाकून नमस्कार करण्याचं निमित्त छान होतं !

" कुठं गं ?" आईचा प्रश्न ऐकायला ती हजर असेल तर ना ? गाडी पुण्याकडे धावत होती. कुठल्याशा लहानशा स्टेशनवर वेग कमी झाला. बाहेरच्या अंधारात फक्त रूळ चमकले जमिनीवरचे ! तिला वाटलं, गाडी पुण्याला जाऊच नये. मग कुठे ? प्रश्नाला उत्तर सांपडेना. खरंच, ह्या जगात आपल्याला दुसरं ठिकाणही असू नये ? आठ दिवसांपूर्वी जे घर सोडून तरातरा बाहेर पडलो त्याच घरी पुन्हा जायचे ? त्याला तुझी कुठं जरुरी आहे ? उगिचच तिनं मंगळसूत्र चाचपलं ! गरज जर असती तर तो आला असता इकडे, निदान पत्राला उत्तर आलं असतं तुझ्या. ह्या दहा दिवसांत, दहा नया पैशाच्या कार्डानं पण त्यानं तुझी चौकशी केली नाही ना ? पण...पण...मला त्याची जरुरी आहे. माहेर पण तुटलं. असू दे माझा पराभव. मी हरले, नाही तरी लेखी क्षमा मागितलीच आहे की पत्रानं ! अन् त्यानं कुठे मला ' जा ' सांगितलं होतं ? मीच रागारागानं घर सोडलं होतं.

बस्स ! एव्हरीथिंग ईज फेअर इन लव्ह म्हणतात ! आपलं तर लव्ह मॅरेजच आहे ! चूक उमजल्यावर क्षमा मागण्यात...अन् त्याच्याजवळ...कसली लाज?... ते काही नाही...दार बंद करायचं...दिवा मालवायचा...आणि घट्ट घट्ट...त्याचे पाय धरून म्हणायचं ' मी हरले. '

एकाएकी तिला खूप खूप हलकं वाटलं ! मंगळसूत्र तिनं उगिचच चावलं ओठांनी...दीर्घ श्वास घेतला...गाडी सांधे बदलत होती...पुणं आलं होतं ! इथं कोण येणारंय आपल्याला घ्यायला ? पराभव झालेल्याचं कधी स्वागत असतं ? झपाझपा ती, खाली मान घालून, स्टेशनबाहेर पडली. रात्रीचे साडेआठ वाजत आले होते. समोर दिसली त्या टॅक्सीत ती बसली. कधी ते तिचे तिलाच समजलं नाही. विचार होते त्याचेच ! गेल्या आठवड्यात जेवणाचे काय हाल झाल असतील त्यांचे ? सकाळी चहा तरी मिळाला की नाही रोज ? रोज जेवताना आपल्या-प्रमाणेच त्यालाही आठवण येत होती का ? आपल्याप्रमाणेच रात्री तो पण उशीत डोकं खुपसून रडत...घरीच हातानी सैंपाक केला असेल की खाणावळीत ? घरी सामान कुठे आहे ? सामान संपलं होतं म्हणून तर सारं रामायण घडलं होतं. दोस्तमंडळींना घरी फराळाची पार्टी द्यायची म्हणे तो. लग्नाची राहिलेली पार्टी म्हणे त्यांची.

"आता कसली लग्नाची पार्टी ! वर्ष होईल की लग्नाला." तिनं उडवून लावलं !

"आग्रह आहे सगळ्यांचा. त्या निमित्तानं कुणी घरी येतं ! सात-आठ जण तर राहिलेत. सात-आठजण – त्यांच्या बायकापोरं म्हणजे झाले पंचवीस ! डालडा नाहीय, रवा संपलाय, साखर बेताचीच आहे. कसं जमायचं ? डालडाचा डबाच बारा रुपये, नेस्कॅफे तीन...शिवाय दूध जादा ! तिचा नकार पक्का होता पण तोही माघार घ्यायला तयार नव्हता. म्हणे ते मद्रासहून आणावयाच्या खड्याच्या बांगड्यां-साठी ठेवलेले पैसे काढ ! रविवारी पार्टी अन् शनिवारीच तिला तिच्या दरमहाच्या मैत्रिणीनं गाठलं ! दुपारी गोळी घेवून जरा लवंडली तर डोळाच लागला. ती उठली तेव्हा बाजारातून शेवचिवडा, बिस्किटं, आणलेली होती. पार्टीची तयारी झालेली होती. इतक्यात कुणी हॉटेलचा पोऱ्या, कॉफी घेऊन आला अन् सरळ चपलानिशीच सैंपाकघरात गेला. तिरीमिरीने ती उठली, पण एकंदर रागरंग गरम होता. ती गप्प बसली. पार्टीला तिने हसतमुखाने नाटक वठवलं खरं, पण केव्हा लढाईला तोंड लागेल सांगता येत नव्हतं ! अन् त्याला निमित्त झालं जोशांच्या व्रात्य चिरंजीवाचं ! पाणी प्यायला ते कार्टं सैंपाकघरात गेलं कधी कोण जाणे ? डेरा फुटण्याचं विशेष नाही, पण शेवचिवड्याच्या बशा – प्लॅस्टिकच्याच त्या – होड्याप्रमाणं पाण्यात तरंगू लागल्या. बिस्किटांचा चिखलाचा लगदा झाला ! त्या पोरापेक्षा तीच अधिक घाबरली.

' जिवंत आहेस का मेलीस ? सैपाकघरात बघ जरा. " तो ओरडला.

" खायला गेलं असेल ते कार्ट. " ती चरफडली स्वतःशीच. " कशाला असल्यांना बोलवावं ? दळभद्रे मेले " दारातून सौ. जोशांनी ते ऐकलं. पोराच्या पाठीत धपाटा तर दूरच, पण पोराला उचलून तरातरा निघून गेली. तिचा आज्ञाधारक बैलोबा नवरापण तसाच न बोलता तिच्या मागेमागेच निघून गेला. मग पुन्हा थोडंथोडं सामान हॉटेलातून आणणं–पार्टीचा बेरंग–पार्टी संपल्यावर झालेला वाद आणि खाल्लेली थोबाडीत – प्रथमच ! त्याच रात्रीच्या पॅसेंजरने ती माहेरी निघून गेली होती ! पण आता तो परत घरात घेईल का ? त्यानं नाही म्हटलं तर ? तर जायला कुठे ठिकाण आहे ? सख्खे आईबाप पण दुरावलेच की ? तिचं डोकं सुन्न झालं ! आपल्याला चक्कर येतेय वाटलं !

" बाई, नंबर काय ब्लॉकचा ? हेच ते लोकमान्य नगर " टॅक्सी ड्रायव्हरच्या शब्दांनी ती भानावर आली. खरंच की, टॅक्सी कॉलनीत आली होती. जेमतेम ९ च झाले होते पण मध्यरात्रीप्रमाणे कॉलनी शांत होती. निर्मनुष्य रस्ता अन् बंद घरे ? ड्रायव्हरने गाडी बंद केली अन् खाली उतरला व मागे पाहू लागला निरखून ! एकाएकी तिला भीती वाटली. ब्लॉकचा नंबर सांगून तिनं विचारलं, ' का, काय झालं ?"

एक शिवी हवेतच हासडून ड्रायव्हर म्हणाला, " मघापास्नं साला पीछा करतोय ! दुसरा रस्ता नाही का रे साल्या तुला ?" बसल्या जागेवरूनच तिने मागे पाहचलं, खरोखरच एक टॅक्सी अंधारात उभी होती ! पिच्छा ! पाठलाग !! रात्रीची वेळ, टॅक्सीत एकटी ती ! निर्मनुष्य रस्ता ! तिला दरदरून घाम सुटला.


# व्होल्गा जेव्हा लाल होते

## ले. : वि. स. वाळिंबे

**मूल्य : अठरा रुपये**

**राजहंस प्रकाशन**

वास जोरात झाला. तिच्या हृदयाचे ठोके तिलाच एकू येऊ लागले. घशाला कोरड पडली. इतक्यात ती मागची गाडी पुढे निघून गेली. एक वळण घेताच तिला तिचा ब्लॉक दिसू लागला. दिवे आहेत असे पाहताच तिला एकदम हायसं वाटलं. टॅक्सी थांबताच एक नोट ड्रायव्हरच्या हातात देत ती बाहेर आली – तो मघाचीच टॅक्सी समोर उभी! सारी कॉलनी तिच्याभोवती फिरू लागली. लटपटत्या पायांनी – झोकांड्या खात ती कशीबशी माडीवर आली! उघड्या दारातून तिला तो स्वयंपाकघरात पाठमोरा दिसला. धाड्दिशी तिने कॉटवर स्वतःला झोकून दिले. त्याच्या पावलांचा आवाज ऐकू आला – टक् टक् टक् – तिने डोळे अधिकच घट्ट मिटले. प्राण कानात आणून ती प्रतिक्षा करू लागली. आता तो म्हणेल "कुणी बोलावलं? कशाला आलीस परत? गेट आऊट" त्याच्या संपूर्ण तळहाताचा स्पर्श तिच्या मस्तकाला जाणवला, तशी तिला जोराचा हुंदका आला. दोन्ही हातांनी त्याचा हात पकडून तिने ओठावर घट्ट दाबून धरला – त्यातूनही हुंदका आला. दोन्दी हातांनी त्याचा हात पकडून तिने ओठांवर घट्ट दाबून धरला – त्यातूनही हुंदका फुटलाच. "मी चुकले रे! मला क्षमा कर. मी हरले, मी हरले, तू जिकलास, म्हण, क्षमा केली म्हणून, मला घरात घेशील ना? नको रे दूर लोटू मला."

"अगं, अगं कॉफी सांडेल."– तिनं प्रथमच डोळे उघडून त्याला डोळे भरून पाहून घेतलं. "क्षमा केली म्हण आधी."

"तुला मघाशी स्टेशनवर पाह्यलं तेव्हाच केली! तुझं लक्ष असेल तर ना? तुझ्या पाठोपाठच माझी टॅक्सी होती!"

"तू स्टेशनवर घ्यायला आला होतास? तुला कसं कळलं?"

"आधी कॉफी घे बघू. किती घाम आलाय तुला." रुमालाने तिचा घाम पुशीत, त्याने तिचे केस मागे केले–"ही बघ तू निघाल्याची तार अन् हा बघ डेली-रिपोर्ट! तुझ्या वडिलांकडून"–तिला आश्चर्याचा शॉक बसला.

"बाबांनी रोज एक पत्र टाकलं! त्यांना कसं कळलं?"

"मी सोमवारी भेटलो समक्ष ऑफिसात – सोलापुरला. कुंदाच्या लग्नात पाहचलं तुला मंगळवारी गेल्या!"– तिला दुसरा शॉक!

म्हणजे सासरेजावई एक झाले होते तर! त्याच्या पाठीवर गाल घाशीत अन् दोन्ही हातांनी चापट्या मारीत ती म्हणाली "तू फार कनिंग आहेस! तू जिंकलास खरा, पण तू माझाच आहेस, मग मी पण जिंकले ना?"

भिंतीवरच्या कॅलेंडरमधलं बाळ हसत होतं – पूर्वीप्रमाणेच! जणू काहीच झालं नाही असं!

□ □ □

# कविता

## सुटला सुगन्ध रजनीचा....!

काळी काळी रजनी वेगळी
पाहुनि तुला पडली जांभळी
नजर लागेल केशपाशाला
अवगुंठव घाल नीट त्याला–!
डाळिंब फुटले वेड्यावाणी
पाहुनि कांति तुझी मसकती
नक्षत्रांची तू आहेस रोहिणी
फिकी पडली मदनरती–!
चाल पाहुनि तुझी मस्तानी
कैक बाजीराव रंक होती
सागर भरला तुझ्या नयनी
नाही वेळ यायला भरती–!
चंद्रही लपला तुला पाहुनि
सुटला सुगन्ध रातराणीचा
येशील का कधी माझ्या शयनी
दरवळू दे गन्ध रजनीचा–!

–रमाकांत

## रात्र

एक रात्र अशी येते
मधुर स्वप्नांनी न्हाऊन निघते
रात्र संपते दिवस येतो
स्वप्नसृष्टितुन सत्यसृष्टीत उतरतो
प्रत्यक्ष उमजल्यावर
तो दुःखात विरुन जातो
दर रात्री असेच होते
दर दिवसा असेच होते

–युवराज वाणी

## कान्हा, असाच का छळणार

कान्हा, असाच का छळणार
राधेसाठी सांग कधी रे मोठा तू होणार ॥ धृ. ॥

तारुण्याने मुसमुसलेली
राधा बघ ही उभी राहिली
बालपणीचा बुरखा परि हा असाच का घेणार ॥१॥

धुंद चांदणे शरदामधले
अवती भवती पहा पसरले
सुधा यातली प्रीत यातली नाही का दिसणार ॥ २ ॥

दोन पांखरे शाखेवरती
पहा कशी ती कुजबुज करिती
त्या बोलीचा अर्थ तुला रे सांग कधी कळणार ॥ ३ ॥

प्रीतीची मी ज्योत लावली
जळते आहे मीच आपुली
सार्थक नाही ज्योतीचे या अशीच का जळणार ॥ ४ ॥

—बा. सा. पवार

## आस्वाद

---

नेहमीच अनुभवाला येणाऱ्या एका रात्रीचे वर्णन युवराज रा. वाणी यांनी केलेले आहे. मनातल्या उत्कट इच्छा व्यवहारात हरवून बसलेल्या सामान्याची ही रात्र आहे. रात्रीत मधुर स्वप्नांनी न्हाऊन निघणे आणि दिवसा सत्यसृष्टीत वावरताना त्या स्वप्नांच्या आठवणींनी आणि प्रत्यक्षातील कठोर वास्तवाने व्यथित होणे हे सामान्यांचे नशीब आहे. स्वप्नसृष्टीचा विलय आणि सत्यसृष्टीची जाणीव हा एक धक्का आहे. पुन्हा हे रोजचे आहे. कधी न संपणारे आहे. कवितेत अतिशय साधे-पणाने मांडलेल्या अनुभवास शेवटच्या दोन ओळीतील आवर्तनांनी एकदम भाव-

सत्याचे रूप दिले आहे. या आवर्तनांतील रोखठोक लय साधी सरळ आहे, तरी परिणामक आहे. कवितेला मूल्य देणारी आहे.

शाहिरांच्या देहकेंद्रित अनुभवाचा प्रामाणिकपणा रमाकान्तांच्या ‘ सुटला सुगंध रजनीचा ’ या कवितेत आहे. शब्दांचे सौष्ठव अथवा रचनेची सफाई नसतानाही संवेदनात्मक जाणीवांचा प्रामाणिक आविष्कार कवीने या कवितेत घडवला आहे. ‘ तिच्या ’ केशकलापाला पाहून काळी रजनी जांभळी पडणे, तिची ‘ मसकती ’ कांती पाहून डाळिंब वेड्यावाणी फुटणे, या कल्पनांच्या मागे कवीची संवेदना प्रभावी बनलेली आहे. या कल्पनांची बंदिश चुकल्यामाकल्या नवखेपणाने केलेली असली, तरी त्यातील उत्कटता समजून घेण्यासारखी आहे. ही सगळी उत्कटता देहलावण्यावर केंद्रित झालेली आहे. ‘ येशील का कधी माझ्या शयनी ’ ही देह-पिपासा त्यातून आकारलेली आहे.

राधाकृष्णाच्या पुरातन प्रतिमेतून एका प्रणयातुर प्रणयिनीचे मनोगत बा. सा. पवार यांनी फार वेधकतेने व्यक्त केले आहे. जुने अर्थसंदर्भ घेऊन भावनेची उत्कटता या नाट्यगीताने रेखलेली आहे. राधेच्या देहमनातील प्रणयाचे उधाण आणि बाल्पणाची बुंथी पांघरलेली कृष्णाची लटकी निरागसता यातील नाट्य-संघर्ष सर्वकालिक असल्याचा प्रत्यय त्यातून साकार झाला आहे. कवितेतील प्रणयि-नीने या लटक्या निरागसपणास केलेले लाडिक आवाहन, तिच्या देहयौवनाचे मादक वर्णन, प्रणयाला आवाहन करणारे निसर्गविभाव आणि स्वतःच्या एकांगी प्रीति-भावनेची कातर तक्रार या साऱ्या छटा यातील शब्दाकृतींनी रेखलेल्या आहे. शैलीचे माधुर्य आणि आशयाची भावरम्यता यांचा समन्वय या कवितेत झालेला आहे.

— रसिक



# शहाजी राजे भोसले

## बावन्न बिरुदांचे धणी

अ. रा. कुलकर्णी

श्री. तेलकर हे एक जुन्या पिढीतील सव्यसाची पत्रकार आहेत. परदेशांतही वास्तव्य करून त्यांनी भारतीय वृत्तपत्रांची सेवा केली आणि विपुल ग्रंथ-लेखनही केले आहे. प्रस्तुत ग्रंथ लिहिण्यास त्यांना प्रेरणा मिळाली ती शहाजीराजे यांच्या समाधीची झालेली दुर्दशा पाहून होय. तेव्हा शहाजीमहाराजांची कहाणी रचण्यामागे श्री. तेलकर यांची भूमिका इतिहाससंशोधकाची नसून इतिहासभक्ताची आहे. या दृष्टिकोनातून त्यांच्या उपक्रमाकडे पाहिले म्हणजे त्यांचे कौतुक करावेसे वाटते.

होदेगिरीला ते जेव्हा गेले होते तेव्हा साहजिकच शहाजी महाराजांच्या समाधीचे दर्शन घ्यावे असे त्यांना वाटले आणि म्हणून ते मोठ्या भक्तीभावाने आणि आदराने तिकडे धावून गेले आणि सारी परिस्थिती पाहून त्यांची दारुण निराशा झाली. स्वराज्य संस्थापकाच्या समाधीची ही दैना पाहून त्यांचे मन हेलावून गेले आणि त्याच्याविषयी अधिक माहिती जाणून घ्यावी, त्याच्या ऐतिहासिक कार्याचे महत्त्व या वास्तूच्या रूपाने लोकांच्या स्मरणात नित्य राहील असे काही तरी करावे या भावनेतून या पुस्तकाचा जन्म झाला आहे. मराठवाड्यात जन्माला आलेला हा मराठी सरदार, पुढे कर्नाटकात आला कसा, त्याचे कर्नाटकात काय स्थान होते आणि या दावणगिरीच्या परिसरात त्याचे देहावसान झाले कसे हा सारा इतिहास सामान्यजनापर्यंत पोहोचविण्याच्या हेतूने श्री. तेलकर यांनी हा ग्रंथ रचला आहे. आपल्या मनात निर्माण झालेली आवर्तने साहित्याच्या माध्यमातून आपल्यासारख्या इतिहासभक्तांपर्यंत पोहोचविणे एवढीच माफक भूमिका श्री. तेलकर यांची आहे. येथे इतिहाससंशोधकाचा अभिनिवेश नाही.

मराठ्यांच्या इतिहासातील काही थोर व्यक्तींचे आकर्षण भारतातील सर्व प्रदेशांत समप्रमाणात आहे असे नाही. पश्चिम भारतातील लोकांना छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल जेवढे आकर्षण वाटते तितके कर्नाटक अथवा उत्तरेकडील

लोकांना वाटेलच असे नाही. कर्नाटकात शहाजी, एकोजी, सरफोजी या व्यक्तींचे महात्म्य अधिक तर उत्तरेकडील लोकांना पहिल्या बाजीरावाचे अथवा थोरल्या माधवरावांचे आकर्षण फार. तेव्हा कर्नाटकनिवासी तेलकरांना शहाजीराजांबद्दल कुतुहल आणि आकर्षण असणे स्वाभाविक आहे.

कर्नाटकाच्या सर्व भागांतून एकेकाळी मराठी माणसाचा सर्रास संचार होत होता. जिंजी, तंजावर, त्रिचनापल्ली, मदुरा, पाँडेचरी ही गावे मराठ्यांच्या चांगल्याच परिचयाची होती. मराठ्यांच्यामुळे दक्षिणेतील हिंदु देवालये शाबूत राहिली, संस्कृती टिकून राहिली हे ऐतिहासिक सत्य नाकारता येणार नाही. किंबहुना शहाजीसारखी मराठी माणसं लोकप्रिय झाली याचे कारण त्यांच्या सांस्कृतिक कार्यातच आपल्याला आढळेल. म्हैसूर विद्यापीठातील एक इतिहासाचे प्राध्यापक डॉ. मुद्दाचारी यांनी कानडी साधनांच्या साहाय्याने शहाजीच्या कर्नाटकातील कार्याचे यथायोग्य मूल्यमापन केले आहे. या नव्या संशोधनाचा श्री. तेलकर यांनी उपयोग करून घेतला आहे आणि कर्नाटकाच्या राजकारणात सर्वोच्च स्थान संपादन करून तो स्वामी कसा बनला याचे चित्रण केले आहे.

शहाजीच्या जीवनकार्याचा संपूर्ण आढावा, थोडक्यात आणि समर्पक शब्दांत श्री. तेलकर यांनी प्रस्तुत ग्रंथात घेतला असला तरी त्यांच्या जीवनातील एका पैलूवर त्यांनी अधिक भर दिला आहे. तो पैलू म्हणजे स्वराज्याचे प्रेरक म्हणून त्यांनी केलेल्या कामगिरीसंबधीचा होय. इतिहासाचार्य राजवाडे यांनी शहाजी महाराजांचे उत्तरायुष्य म्हणजे शिवाजी महाराजांच्या कार्याची पायाभरणी कशी होती हे अत्यंत मार्मिकपणे आपल्या ‘ राधामाधव विलास चंपू ’ या काव्याच्या प्रस्तावनेत दाखवून दिले आहे. १६४० ते १६६३ हा २३ वर्षांचा शहाजीच्या उत्तरचरित्राचा म्हणजेच कर्नाटकातील कारकीर्दीचा भाग शिवाजीच्या चरित्राशी समांतर आहे इतकेच नव्हे तर शिवाजीच्या चरित्राचा प्रोत्साहक आहे. शहाजी आणि त्याचे सहकारी यांनी शिवाजीच्या चरित्राला स्वतंत्र आणि स्वराज्योन्मुख वळण देण्याची शिस्त कशी बांधून दिली ते शहाजी महाराजांच्या उत्तरकालीन खटपटीवरून स्पष्टपणे नजरेस येते.

१६३६ साली निजामशाही संपुष्टात आली आणि त्या राज्याचे वाटप करण्यात आले. शिवभारतकार परमानंद यांनी या वाटपाचे कर्तेपण शहाजी राजांकडे दिले आहे. शिवभारत, अध्याय ९, श्लोक २० हा या दृष्टीने तपासून पाहण्यासारखा आहे. यात

निजामविषयं शाहः स्वविषयं विना
दिल्लीन्द्राय ददौ कंचित् ये दिलायच कंचन ।

असे म्हटले आहे. याचा अर्थ असा, की शहाजीने स्वतःच्या जहागिरीचा पुणचाकण इत्यादि भाग स्वतंत्र ठेवला आणि पुढे तोच भाग शिवाजीला पोट मोकासा

करून दिला. याचे वैशिष्टय म्हणजे या जहागिरीच्या मोबदल्यात शिवाजी महाराजांना कोणाची चाकरी करावयाची नव्हती. ते त्या भागाचे अधिपति होते आणि हे मान्य केल्यावर १६४६ साली रांझे गावच्या बाबाजी गुजराला अनितीच्या वर्तनाबद्दल त्याचे पाटिलकीचे वतन जप्त केल्याच्या आणि त्याचे हातपाय तोडण्याची शिक्षा दिल्याच्या पत्रावर असलेल्या 'प्रतिपच्चंद्र लेखेव' या राजमुद्रेचा अर्थ लागतो. अशारीतीने 'स्वतंत्र' बनविणे हे शहाजी महाराजांचे मोठे द्रष्टेपण आणि मुत्सद्देगिरी होय; आणि म्हणूनच राजवाडे म्हणतात त्याप्रमाणे शिवाजी महाराजांची प्रेरक शक्ती म्हणजे शहाजी राजे होत, या विधानाची सत्यता पटते. शहाजी महाराजांची ही सारी योजना अपूर्व आहे. त्यांनी केलेले अंदाज, बांधलेले आडाखे बरोबर ठरत होते. जावळीच्या मोऱ्यांचा निःपात करून शिवाजी महाराजांनी प्रादेशिक आक्रमणाचा शुभारंभ केला, खुद्द महाराजांची सुटका विजापूरकरांच्या कैदेतून करून घेतली आणि अफजल प्रसंगी विजय संपादन करून अदिलशाहीला शह दिला आणि मोंगली सत्तेशी झुंज देण्यास ते सिद्ध झाले. सुरतेची बसुरत करून टाकली. शहाजी या साऱ्या बातम्या बंगळूरात बसून ऐकत होते,


माणूसच्या वाचकांना परिचित

**पराजित-अपराजित**

लेखक : वि. स. वाळिंबे — पृष्ठे : ३७५ सुमारे — किंमत : २० रुपये

**प्रकाशन दिनांक ४ सप्टेंबर १९७१** | गेल्या शंभर वर्षांच्या फ्रान्सच्या राजकीय वाटचालीमधील कृष्णक्षण आणि सुवर्णक्षण टिपणारा एक महत्त्वपूर्ण ग्रंथ.

प्रकाशनपूर्व सवलतीचे मूल्य फक्त १२ रुपये.

आपल्या नजीकच्या ग्रंथविक्रेत्याकडे अगर आमचेकडे पैसे भरून मागणी नोंदवा.

**विश्वकर्मा साहित्यालय,**

२०३५/२ सदाशिव, टिळक पथ, पुणे ३०.

सुखावत होते आणि अशा या समाधानाच्या क्षणीच त्यांना मृत्यू आला.

श्री. तेलकरांनी शहाजी-शिवाजी यांच्या अन्योन्य संबंधाचा भाग आपल्या या छोटया ग्रंथात आणला आहे, हे या ग्रंथाचे एक वैशिष्टच म्हणून सांगता येईल. प्रा. शेजवलकरांच्या मताचा आधार घेऊन ते म्हणतात, ' शिवाजी महाराजांच्या जीवनाचे ध्येय निश्चित झाले ते बंगळूरच्या आसमंतात, विजयनगरच्या पडछायेत.' म्हणजेच शहाजीराजांच्या उपदेशात.

श्री. तेलकरांनी हा ग्रंथ मोठचा परिश्रमाने तयार केला आहे. शहाजी महाराजांवर आतापर्यंत राजवाडे, सरकार, बेंद्रे आणि डॉ. मुद्दाचारी यांनी विस्तृत लेखन केले असले तरी सामान्य वाचकाच्या दृष्टीने एका इतिहास भक्ताने महाराजांच्या चरणी वाहिलेल्या या साहित्य-पुष्पाचे महत्त्व कमी लेखता येणार नाही. सोप्या, चटकदार शैलीत श्री. तेलकरांनी हे पुस्तक नटविले आहे. शहाजी महाराजांसंबंधीचे प्रेम, मराठचांच्या कर्तृत्वाचा अभिमान आणि हे सारे लोकांना सांगण्याची तळमळ ही या ग्रंथामागची प्रेरणा आहे आणि स्वतःला जे जाणवले आहे ते लोकांच्यापर्यंत नेऊन पोहोचविण्याच्या कामी श्री. तेलकर यशस्वी झाले आहेत.

हे सारे ठीक असले तरी एक प्रश्न मात्र अद्याप अनिर्णितच आहे. तो म्हणजे शहाजी महाराजांच्या समाधीच्या निश्चित स्थानाबद्दलचा होय. ही समाधी ' यरगटनहल्ली ' येथे आहे की ' होदेगिरी ' येथे आहे या वादात श्री. तेलकर गुंतून राहिले नाहीत. तो प्रांत संशोधकांना सोडून आज प्रचलित असलेल्या ' होदेगिरी 'च्या वृंदावनाला मान्यता देऊन या ग्रंथाची रचना केली आहे. किंबहुना त्या वृंदावनाची दैन्यावस्था पाहूनच त्यांना शहाजी महाराजांच्या अतुल पराक्रमाची माहिती करून घेण्याची इच्छा झाली.

श्री. तेलकरांनी या ११० पानी ग्रंथाचे तीन भाग केले आहेत. पहिल्या भागात शहाजीराजांच्या चरित्राचे कथन आहे, दुसऱ्या भागात छायाचित्रावली आहे आणि तिसऱ्या भागात आधारभूत संदर्भ दिले आहेत. या पुस्तकाला म. म. दत्तो वामन पोतदार यांची प्रस्तावना आणि लेखनाच्या कामी प्रा. ग. ह. खरे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. चरित्राच्या निमित्ताने ' बावन्न बिरुदांचा धणी ' शहाजी यांच्या वृंदावनाची लोकांनी आस्थेवाईकपणे चौकशी करावी, अशी लेखकाने कळकळीची विनंति केली आहे. इतिहास आणि थोर ऐतिहासिक व्यक्ती यांच्याबद्दलचे प्रेम वाढीस लावण्याच्या कामी पुढाकार घेतल्याबद्दल श्री. तेलकरांचे हार्दिक स्वागत होणे आवश्यक आहे.

**शहाजी राजे भोसले** : श्रीधर तेलकर : प्रकाशक : तेलकर फिचर्स सर्व्हिस, कँप, बेळगाव : १९७१ : पृष्ठे ११० : मूल्य १५ रुपये.

◻

# आलोचना प्रकाशित । गीतकाव्य

आलोचना प्रकाशनातर्फे प्रा. वसंत दावतर यांनी प्रकाशित केलेले ‘ गीतकाव्य ’ हे मराठीतील साहित्यचर्चाविषयक एक लक्षणीय पुस्तक आहे. मराठीतील साहित्य चर्चा बव्हंशी वर्णनात्मक वा ऐतिहासिक आढाव्याच्या स्वरुपाची असते. विशेषत: ललित वाङ्मयाच्या विविध घाटांचा मूलभूत विचार वा आकृतिवादी समीक्षा मराठीत अभावानेच आढळते. प्रस्तुत पुस्तकांत लिरिक या काव्यप्रकाराचा विचार, कवी, समीक्षक. गायक, संगीताभ्यासक अशा विविध व्यक्तींनी केला आहे. ‘ आलोचना ’ मासिकाचा गीतकाव्य विशेषांक व सोमैय्या महाविद्यालयाच्या ‘ मराठी प्रबोधना ’तर्फे लिरिकवर झालेला परिसंवाद, यातून हा ग्रंथ निर्माण झाला आहे. इंग्रजीत ज्याला आपण लिरिक असे म्हणतों त्याला मराठीत कोणता अर्थपूर्ण प्रतिशब्द योजावा, या काव्यप्रकारचे काव्य व संगीत यांच्याशी नेमके नाते कोणते, गेयता आणि काव्याची श्रेयस्करता यातील संबंध कोणता, हे प्रश्न साहित्यचर्चेतील वादग्रस्त प्रश्न मानले जात होते–यापुढेही मानले जातील; परंतु मराठीत लिरिकवर आतापर्यंत झालेल्या तुरळक स्फुट विचारापेक्षा अधिक व्यापक व मूलगामी विचार प्रस्तुत ग्रंथातून वाचकांसमोर आला आहे.


गीतकाव्य या वाङ्मयप्रकारचे मूलभूत विवेचन करणारे, ‘ गीतकाव्य संकल्पना-परिवर्तने ’ हा प्रा. गंगाधर पाटील यांचा व ‘ गीतकाव्याचे प्रकार ’ हा प्रा. सदा कऱ्हाडे यांचा, असे दोन लेख या संग्रहात आहेत, तर गीतकाव्य व गेयता यांचा विचार करणारे प्रा. अशोक रानडे, जितेंद्र अभिषेकी व दिलीप चित्रे यांचे तीन लेख आहेत. मराठीतील गीतकाव्यावर प्रा. रमेश तेंडुलकर व प्रा. ल. ग. जोग यांनी लिहिले असून प्रा. व. दि. कुळकर्णी यांचा लेख त्या पद्धतीचाच आहे. संपादकांनी या लेखांची केलेली क्रमरचना मात्र विवेचनाच्या सूत्राच्या दृष्टिकोनातून काहीशी दोषास्पद वाटते. उदा. गंगाधर पाटील व सदा कऱ्हाडे यांचे लेख संकल्पनेचा विचार करणारे असल्यामुळे ते प्रतिशब्दचर्चेनंतर लगेच यायला हवे होते आणि व. दि. कुलकर्णी यांचा लेख पाटलांच्या विवेचनाची चर्चा करणारा असल्यामुळे नंतर यावयास हवा होता.

या लेखसंग्रहातील प्रा. गंगाधर पाटील यांचा लेख, त्यातील पाश्चात्य विचारांचा सुजाण आढावा आणि आदिगीतापासून आजच्या लिरिकपर्यंत गीताच्या आविष्काराच्या विविध रूपांचा विचार, यामुळे लक्षणीय झाला आहे. विशेषत: प्रा. पाटील यांनी हेगेल–इलियट–सुझान लँगर यांच्या विचारातील अंत:संबंध स्पष्ट करण्याचा केलेला यत्न, लिरिकचे कवीच्या व्यक्तित्वाशी असणारे नाते व आविष्कारातील कालकल्पना विशद करण्याच्या दृष्टिकोनातून उपकारक ठरला आहे. प्रा. पाटील

यांचे लँगरच्या कालनिरपेक्ष वर्तमानाचे (Timeless Present) आकलन व पुढील परिसंवादांतील काही श्रोत्यांचे आकलन यात अंतर पडल आहे. लिरिक हा प्रा. कऱ्हाड्यांच्या संशोधनाचा विषय असल्यामुळे गीतकाव्य निर्माण होताना मानवी व्यक्तिमत्वाच्या भावस्थितीच्या विविध प्रतिक्रियांचा सूक्ष्म विचार त्यांनी केला आहे. त्याचप्रमाणे शुद्ध गीतकाव्यापेक्षा Pure Poetry पेक्षा– 'गीत' हा वेगळा प्रकार मानावा हा त्यांचा विचार मराठीतील बरेच वाद नाहीसे करू शकेल असा आहे. त्याप्रमाणे काव्याची जुनी वर्गीकरणे नाकारली तरी त्यातील तत्वे न नाकारता नवकाव्यात जुन्याची प्रतिबिंबे शोधणे आवश्यक आहे. या विचाराचे सूत्र पुढे कोणी-तरी वाङ्मयविचारात योजावे असे आहे. वरील दोन लेखात एक लक्षणीय विशेष आढळतो. प्रा. पाटील व प्रा. कऱ्हाडे, जुनी कविता – नवकाव्य – श्रेष्ठकनिष्ठतेच्या पूर्वापार कल्पना या सर्वांपासून अलिप्त राहून निरभ्र मनाने विचार करत आहेत. प्रा. तेंडुलकरांच्या लेखात संवेदनक्षमतेने काव्यास्वाद घेणाऱ्या रसिकाचे दर्शन आपल्याला होते. तपशील कृत्रिम वर्णनात्मक वा काव्यात्मक स्वरूप कसे घेऊ शकतो, हे स्पष्ट करण्यासाठी 'नलदमयंती' स्वयंवरां'तील आणि सावता माळ्याच्या अभंगातील त्यांनी निवडलेली उदाहरणे बोलकी आहेत. या संग्रहातील गीतात्मक विचारावर लिहिलेला प्रा. रानड्यांचा लेख त्यातील विचारांच्या स्पष्टतेमुळे उल्लेखनीय झाला आहे. विशेषतः त्यांतील गीतकाव्य, गीत, पद हे वर्गीकरण गीत काव्य विचारामध्ये अधिक शिस्त आणू शकेल असे वाटते. या लेखातील विचारांना, प्रा. व. दि. कुलकर्णी यांनी केलेला 'lyrical expression'चा विचार, प्रा. जोगांनी केलेला काव्यातील लयीचा विचार, उपकारक ठरले आहेत. परिसंवादामुळे मात्र या विषयाची वेगळी चर्चा झाली आहे असे वाटत नाही. विशेषतः कवी बोरकर व पाडगावकर या दोन पिढ्यातील गीतकाव्यकारांकडून काही विशेष विचाराचा लाभ झालेला नाही.

या ग्रंथातील विचार मराठीतील साहित्यचर्चेमध्ये वाङ्मय प्रकाराविषयीच्या विचारांना चालना देईल; त्या विचाराला मूलभूत संकल्पनाच्या विश्लेषणाची दिशा देईल अशी आशा आहे.

**– सौ. पुष्पा भावे**





रविवार, १ ऑगस्ट १९७१ या दिवशी पुणे येथील मॅट्रिक विद्यार्थी मासिकाला २५ वर्षे पूर्ण झाली.

# मॅट्रिक विद्यार्थीचे

# नॉन मॅट्रिक संपादक

# लक्ष्मणराव केळकर

वा. ग. तळवलकर

१९४० साल. पुणे विद्यार्थी गृहासमोरच्या जनार्दन सदाशिव लिमिटेडच्या छोटेखानी छापखान्यात माझी 'प्राची' हा कथासंग्रह छापला जात होता त्यानिमित्ताने छापखान्यात माझी वारंवार बैठक असे. छापखान्याचे मालक श्री. (आता कै.) ग. ना. जोशी यांच्या इतिहासविषयक शालेय पुस्तकाची नवी आवृत्ती, पां. वा. गाडगीळ यांचा 'कॅपिटल-सारग्रंथ' ही पुस्तके नुकतीच छापून पूर्ण झालेली होती. श्री. विद्यासेवक (स. ह. मोडक) यांचा 'रेशमाचे कोष' हा चिनी-मराठी अनुवादित कथांचा संग्रह, विख्यात हिंदी उपन्यासकार श्री. जैनेंद्रकुमार यांच्या 'त्यागपत्र' या कादंबरीचा प्रा. अवधूत महादेव जोशी कृत मराठी अनुवाद इत्यादी पुस्तकांची कामे प्राय: एकाच वेळी चालू होती. त्याच वेळी छापखान्याचे स्वत:चे 'मंदार' नावाचे मासिकही निघत असे, त्यातही माझे थोडेफार लेखन होई.

त्या छोटया छापखान्याच्या ईन-मीन-तीन कर्मचाऱ्यांमध्ये सांगलीहून नुकताच पुण्याला आलेला एक पोरसवदा तरुण होता. शर्ट आणि पायजमा हा त्याचा साधा

वेष. शिक्षण मॅट्रिकपर्यंत देखील नाही, पण कामात एक प्रकारची टापटीप आणि चोखपणा. याहूनही विशेष म्हणजे बोलण्यात-वागण्यात ऋजुता आणि प्रांजलपणा. साहजिकच, ह्या तरुणाबद्दल माझ्या मनात आत्मीयता निर्माण झाली.

लक्ष्मण सखाराम केळकर हे त्याचे नाव. घरच्या परिस्थितीत शिक्षण पुढे चालू ठेवणे शक्य नव्हते म्हणून त्याच्या मामांनी (वर उल्लेखिलेले श्री. स. ह. मोडक उर्फ 'विद्यासेवक' यांनी) त्याला सांगलीहून पुण्याला आणून ह्या छापखान्यात चिकटवून दिले.

छापखातल्या आमच्या एका अनौपचारिक बैठकीत चालक श्री. जोशी काहीशा संचितपणे म्हणाले, – 'आपल्या मंदार मासिकाचा खप वाढला पाहिजे – वर्गणीदार वाढले पाहिजेत. काय करावं? काही उपाय सुचवा की जरा!'

यावर माझ्या डोक्यातली एक कल्पना मी सहजगत्या त्यांच्यापुढे मांडली.– 'समाजात मासिकांचे जे एकंदर वाचक असतात त्यांमध्ये अनेक वर्ग असतात. वकील, डॉक्टर, एंजिनिअर, व्यापारी, विद्यार्थी–यापैकी कोणत्या तरी एका वर्गाला आवडेल नि त्यांना आवश्यक ठरेल असं साहित्य तुम्ही देत राहिलात तर तो तो वर्ग तुमचा कायमचा वाचक होईल. आपलं पुणं शहर विद्यार्थ्यांसाठी प्रसिद्ध आहे. इथं अनेक मोठ्या शाळा आहेत नि त्यामुळेच निरनिराळ्या विषयांवरचे उत्तम शिक्षक आहेत. दर वर्षी मुंबई विद्यापीठाच्या मॅट्रिक्युलेशन परीक्षेला साठ-सत्तर हजार विद्यार्थी बसतात. (हा त्या काळचा आकडा.) ह्यांपैकी काही विद्यार्थी अभ्यासासाठी क्रमिक पुस्तकांखेरीज गाइड्स वापरतात. गाइड-पुस्तकांचं स्वरूप काहीसं ठोकळेबाज असतं, त्यामुळे खरा अभ्यास होतो असं नाही. कित्येक विद्यार्थी अवघड विषयांच्या क्लासेस्मध्ये नाव नोंदवतात, पण अशा चांगल्या शिक्षकांच्या क्लासेस्चा लाभ शहराबाहेरच्या विद्यार्थ्यांना मिळू शकत नाही ..अशा परिस्थितीत, मॅट्रिक परिक्षेला सबंध मुंबई इलाख्यातून (त्या वेळच्या) बसणाऱ्या साठ-सत्तर हजार विद्यार्थ्यांना उपयोगी पडतील असे निरनिराळ्या विषयांवरचे धडे ह्या पुणे शहरातल्या निरनिराळ्या शाळांमधल्या तज्ज्ञ शिक्षकांकडून लिहवून घेऊन जर तुम्ही आपल्या 'मंदार' मासिकात दरमहा हप्त्याहप्त्यानं दिलेत तर फार मोठा विद्यार्थी वाचकवर्ग 'मंदार'चा ग्राहक बनेल.'

श्री. जोशींनी माझी कल्पना ऐकून घेतली, पण अमलात आणली नाही. पण योगायोग असा की कालांतराने त्या छापखान्यातली नोकरी सोडलेल्या, आणि जीवनात आत्मोन्नतीचा मार्ग शोधणाऱ्या त्या तरुण लक्ष्मण केळकर याने मात्र ती कल्पना अप्रत्यक्षात राबवायचे ठरविले.

१ ऑगस्ट १९४६ रोजी 'मॅट्रिक विद्यार्थी' या मासिकाचा जन्म झाला तो असा. त्याचा पहिला अंक बारकाईने पाहून गुरुवर्य धोंडो केशव कर्वे, श्री. म. माटे, आर. एन्. जोशी प्रभृतींनी अभिप्राय दिले ते निखालस शाबासकीचे!

सुरुवातीला ह्या मासिकाची वार्षिक वर्गणी होती फक्त ४ रुपये. आता ती २० रुपये झाली आहे. मात्र ते 'मासिक' म्हणविले जात असले तरी वर्षाकाठी त्यांचे एकूण वीस अंक प्रकाशित होतात. बहुतेक सर्व अंकांमध्ये सर्व अभ्यासविषय असतात; खेरीज विशिष्ट विषयांचे विशेषांकही असतात.

आता ह्या मासिकाला २५ वर्षे पूर्ण झाली असल्याने ते यशस्वी झाले आहे, असे म्हणायला वास्तविक काही हरकत असू नये. किंबहुना 'मॅट्रिक विद्यार्थी' या मासिकाच्या यशामुळे 'व्हर्नाक्युलर फायनल विद्यार्थी' हे आणखी एक मासिक त्यांनी १९५० साली काढले. परंतु विद्यार्थ्यांकरिता प्रत्येक अभ्यास विषयाचे मार्गदर्शक धडे, प्रश्नोत्तरे हेच केवळ देऊन श्री. केळकर यांचे समाधान होण्यासारखे नव्हते. हे सर्व साहित्य देण्याखेरीज विद्यार्थ्यांसाठी अधिक काही तरी कृतिशील मदत देण्याकडे त्यांचा प्रथमपासूनच कल होता. म्हणून त्यांनी वर्गणीदारांमध्ये 'नादारी सवलत' योजना सुरू केली. म्हणजे प्रत्येक शाळेमध्ये जशी मुलांना 'फी'च्या बाबतीत नादारी असते, तशीच आपल्या मासिकाच्या वर्गणीबाबतही त्यांनी उपलब्ध ठेवली. या योजनेनुसार गरीब व हुशार विद्यार्थ्यांना त्या त्या शाळा प्रमुखांच्या शिफारशीनुसार हे मासिक संपूर्ण वर्गणी ऐवजी अवघ्या नाममात्र एक रुपयात वर्षभर देऊ केले. होतकरू विद्यार्थ्यांनी, केवळ आर्थिक अक्षमतेमुळे मासिकाच्या मार्गदर्शनापासून वंचित राहू नये, हाच हेतु यामागे होता. याचा फायदा अनेक विद्यार्थ्यांना झाला.

अशीच एक आणखी उदार कल्पना म्हणजे 'मॅट्रिक विद्यार्थी' मासिकाची 'फॉर्म फी मदत' योजना. जे विद्यार्थी अभ्यासाने योग्य व पात्र असतील, परंतु मॅट्रिक परीक्षेच्या फॉर्मसाठी लागणारी फी (म्हणजे तेव्हा विद्यापीठाला किंवा आता एस्. एस्. सी. बोर्डाला भरावे लागणारे परीक्षा-आवेदन शुल्क) भरण्यास असमर्थ असतील, अशा परीक्षार्थींना मॅट्रिक विद्यार्थी मासिकातर्फे तेवढी रक्कम देण्यात येत असे. मासिकात केलेल्या आवाहनानुसार काही पालकांकडून आलेल्या देणग्यांत श्री. केळकर स्वतःची रक्कम भरीला घालून ही मदत उभी करीत. अर्थात ह्या मदतीसाठीही अर्ज यावा लागे. तो त्या त्या शाळा-प्रमुखांमार्फत, आणि रक्कम पाठविली जाई तीही त्या त्या शाळेकडे. त्या रकमेचा दुरुपयोग होऊ नये, म्हणून ही रास्त खबरदारी. केळकरांची ही योजना मासिकाच्या तिसऱ्या वर्षापासून, म्हणजे १९४८ सालापासून अस्तित्वात आहे.

याखेरीज दरवर्षी एस्. एस्. सी. परीक्षेत पहिल्या क्लासमध्ये नंबर पटकावणाऱ्या सर्व वर्गणीदार विद्यार्थ्यांना सत्कारपूर्वक प्रत्येकी ५१ रु. ची बक्षिसे दिली जातात ती वेगळी.

परंतु एवढेच करून लक्ष्मणराव केळकर स्वस्थ बसले नाहीत. मॅट्रिकच्या म्हणजेच जीवनाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्यांसाठी आणखी काही तरी विधायक करण्याचे वेड त्यांच्या डोक्यातून गेलेले नव्हते तेव्हा मॅट्रिक पास झाल्यानंतर उच्च शिक्षण

घ्यायचे असल्यास कोणकोणत्या विषयाच्या शिक्षणाची सोय कुठे कुठे आहे, आणि कोणकोणत्या व्यवसायात पडायचे असल्यास मार्गदर्शन कुठे कुठे मिळू शकेल या-बाबतची माहिती मोठ्या कष्टाने गोळा करून ती व्यवस्थितपणे वर्गीकृत करून 'मॅट्रिक विद्यार्थी' मासिकात देण्याची प्रथा त्यांनी सुरू केली. आज काही व्यक्ती किंवा संस्था किंवा खुद्द आपले सरकार अशी माहिती मोठ्या प्रमाणावर 'व्यवसाय-मार्गदर्शना'च्या हेतूने प्रकाशित करीत असते. पण हेच काम केळकरांनी कित्येक वर्षांपूर्वी सुरू केले होते, हे विशेष.

विद्यार्थ्यांनी आजवर मासिकाला भरघोस पाठिंबा दिलेला आहे, असे श्री. केळकर अभिमानाने सांगतात. 'काही वेळा पास झालेले वर्गणीदार बोलकी पत्रे पाठवून कृतज्ञता व्यक्त करतात, तर कित्येकदा समक्ष पेढे घेऊन येतात; आणि कधी कधी आम्ही पेढे घ्यावेत' म्हणून मनीऑर्डरने अगत्यपूर्वक पैसे पाठवतात !

पण मासिकाच्या रीतसर वर्गणीखेरीज वशिल्याच्या वाममार्गासाठी पैसे पाठविणारे विद्यार्थी किंवा पालक भेटतात तेव्हा धक्का बसतो, असे श्री. केळकर सांगतात. 'वशिला लावून आपल्या मुलाला कसेही करून पास करण्यास परीक्षकांना सांगावे' अशी पत्रे लिहिणारे मालकही क्वचित भेटतात. एम्. एम्. सी. परीक्षा बोर्डाशी आमचे काही लागेबांधे आहेत अशा भ्रमात असे पालक असावेत, असा निष्कर्ष श्री. केळकर काढतात आणि स्वच्छ इन्कार करणारा खुलासा करतात !

एकदा तर, परीक्षेत पेपर अवघड गेलेल्या एका मुलाने आपल्या थोरल्या भावाच्या पावलावर पाऊल टाकून आत्महत्त्या करू नये म्हणून त्याच्या पालकांनी 'काहीही करून परीक्षकांना सांगून माझ्या मुलाला पास करा, आणि त्याला आत्म-हत्त्येपासून वाचवा—' अशी काकुळतीची प्रार्थना पत्रातून श्री. केळकर यांच्याकडे केली. तेव्हा त्या पालकांना आणि त्यांच्या मुलाला पुण्याला घरी बोलावून घेऊन त्यांची समजूत घालण्याची कामगिरी केळकरांना करावी लागली !

असे असले तरी, 'गृहिणीपद सांभाळून मॅट्रिक पास झाले ती केवळ आपल्या मासिकाच्या मदतीनेच—' अशा अर्थाची पत्रे जेव्हा येतात तेव्हा 'क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते' या वचनाचा प्रत्यय श्री. लक्ष्मणराव व त्यांच्या जोडीने त्यांचा कार्यभार उचलणाऱ्या त्यांच्या पत्नी सौ. कमलाताई केळकर या उभयतांना येतो.

या कष्टाळु आणि विद्यार्थी-सेवापरायण जोडप्याचा एकुलता एक सुपुत्र श्रीनिवास हा एम्. एस्सी. होऊन पीएच्. डी. साठी संशोधन करीत आहे. 'अमेरिकन फील्ड सर्व्हिस'च्या प्रकल्पातून तो दोनदा अमेरिकेला जाऊन आलेला असून आपल्या साहित्य-संगीत-क्रीडाप्रेमामुळे त्याने आंतरराष्ट्रीय कौटुंबिक मित्रपरिवार केला आहे. वडिलांच्या कामगिरीबद्दल त्याला जास्त अभिमान आहे.

आरंभी सांगितल्याप्रमाणे, कोवळ्या तरुण वयात सांगलीहून पुण्याला आलेल्या

पृष्ठ ४८ वर

नलिनी अंबाडे

# थोडे गोड, थोडे कडू, बजेट–ई–तमीळनाडू

वास्तविक बजेट जूनच्या शेवटच्या आठवड्यातच मांडले गेले, पण चर्चेनंतर शिक्कामोर्तब होण्याचा अवकाश होता. ती चर्चा २२ जुलैपर्यंत चालली अन् एखादी करवाढ रद्द होण्याची आशा मावळली. महाराष्ट्रात म्हणे पूर्वीचाच ब्रेड पण स्वस्त झाल्यासारखा वाटू लागलाच ना ! इतर सर्व राज्यांप्रमाणेच तमीळ-नाडूचे बजेटदेखील सोळा कोटींचा घाटा दाखविणारेच ठरले. वास्तविक यंदापासून दारूबंदीचा तोटा संपलेला तर आहेच, उलट गुत्त्यांच्या लिलावातून कमाई होणार आहे !

बजेटाच्या भाषणांच्या मोसमात मुख्यमंत्र्यांनी, केंद्राकडून राज्याला अधिक अधिकार मिळण्याच्या जुन्याच मागणीचा पाठपुरावा केला. हरितक्रांतीचा उदो उदो केला. ह्याचावर्षी शेतीबद्दल दोन मुद्दे लक्षात येण्यासारखे आहेत. जागतिक बँके-कडून मिळणारे ४० कोटींचे कर्ज – त्यामधून वीस हजार विहिरी व पंधराशे ट्रॅक्टर्स मिळतील. दुसरा मुद्दा म्हणजे शेती उत्पन्नावर कर बसविण्याच्या योजनेची घोषणा – ‘ सावध रहा. ’

तुतीकोरीन येथील नियोजित खत कारखाना, संपूर्ण आशिया खंडात मोठा ठरेल – ६१ कोटींचा खर्च व रोजी २७०० टनांचे उत्पादन. त्याच्याजवळच २० कोटींच्या ‘ हेवी वॉटर प्लॅन्ट ’ची योजनाही बजेटमध्ये होती. ही झाली सरकारी गुंतवणूक, पण खाजगी गुंतवणुकीचा ठणठणाटच आहे ! दक्षिणेत ‘ लेबर-ट्रबल्स ’ आणि दरडोई कमी उत्पादन हे दोन मोठे अडसर उद्योगधंद्याच्या प्रगतीत आहेत. या दृष्टिने DCM (दिल्ली क्लॉथ मिल्स लि.) तर्फे “मणाली ’ ह्या मद्रासच्या उपनगरात निघणार असणाऱ्या नव्या कापडगिरणीत साडेआठ कोटींची गुंतवणूक स्वागतार्ह आहे.

तुम्ही रामेश्वरमला गेलेले असाल तर आठवेल की, रामेश्वरमला जाण्यासाठी

मोटारीचा रस्ताच नाही. रामेश्वरम् बेट, भारताला ' पांबन ' नामक प्रचंड रेल्वेच्या पुलाने जोडलेले आहे. त्यामुळे स्वतःच्या गाडीने जाणाऱ्यांची व यात्रा स्पेशल बसेसची निराशाच होते. यंदाच्या बजेटात ह्या-सडक-पुलाकरिता सव्वासहा कोटी रुपये ठेवलेले पाहून, मनाला बरं वाटलं.

सर्वात जास्त खर्च तमीळनाडू राज्य, शिक्षणावर करीत आहे. यंदाचे बजेटात ८२ कोटींची तरतूद आहे. आत्ताचे ह्या राज्यात पी. यु. सी. पर्यंतचे शिक्षण मोफत आहे. शिवाय सरकारी प्राथमिक शाळात दुपारचे जेवणही मोफत आहेच. ह्यासाठी बाराशेचे-सोळाशेचे खोटेनाटे दाखले आणण्याची जरुरीच नाही. हरिजनांसाठी राखीव जागा १६% होत्या, त्या १८% झाल्या आणि ९ वी पासून ते बी. ई., एम्. बी. बी. एस. पर्यंत हरिजनास स्पेशल शिकवण्या; फ्री बोर्डिंग इ. इ. तमीळनाडूने शिक्षणावर जणू सर्वस्व पणाला लावले आहे. पूर्वीपासूनच स्पर्धांच्या परीक्षात, वरच्या नोकऱ्यात ही दाक्षिणात्य मंडळी पुढे आहेतच. (आणि मराठी मंडळी मागे मागेच आहेत !) त्या दृष्टिने ८२ कोटींचा ' लाल कंदील ' महाराष्ट्राने वेळीच समजावून घ्यायला हवा असं वाटतं.

सरकारी खजिना वाढविण्याची बजेटातील युक्ती पाहा. सरकारी नोकरांचा प्रॉव्हिडंट फंड रुपायाला जुना एक आणा – म्हणजे ६$\frac{1}{4}$% दराने अद्यापही कापला जातो. तमीळ सरकार त्यावर ४·८% व्याजही देते. येथून पुढे जर राज्य नोकरांनी अधिक रक्कम स्वखुषीने कापून दिली तर त्या अधिक रकमेवर आठ टक्के व्याज मिळणार आहे. आणखीही दोन नव्या योजना पाहा. सुमारे २००० पदवीधरांना पगारी समाजसेवक म्हणून, दरमहा १७५ रु. वर खेड्यात पाठविले जाईल. त्यांना मदतीस दोन हजार ग्रेड–एक कॉन्स्टेबलसही दिले जातील. कॉन्स्टेबल भरतीमध्ये सुशिक्षितांना प्राधान्य देऊन, त्यांना खास सब-इन्स्पेक्टर पातळीवरून जनतासंपर्काचे शिक्षण दिले जाईल.

झोपडपट्टीवासीयांसाठी ३ कोटी व पन्नास हजार एकर जमीन बाजूला ठेवली आहे. पण त्या लोकांची काळजी दुसरीच आहे ! लौकरच दारू मोकळी होणार म्हणजे खर्च वाढला आणि चोरून दारू गाळण्याचा धंदा बसला !

बजेटात नवीन असा कोणताही कर नाही. पण सेल्सटॅक्सच्या जुन्याच करात अल्पशी वाढ करताच, सामान्य जनतेस ती भरपूर जाणवली आहे. सेल्सटॅक्स पूर्वी रुपायाला ३ पैसे होता, तो आता ३$\frac{1}{2}$ पैसे झाला – दुकानदार अर्थातच ४ पैसे घेणार ! शिवाय टॅक्स रकमेवर १०% सरचार्ज नव्याने बसला ! त्यामुळे बाजारातील प्रत्येक वस्तूचे भाव, बजेट सादर होताच वाढले ना पटापट ! वास्तविक दारुबंदीमुळे होणारा तोटा, भरून काढण्यासाठी सेल्सटॅक्स बसविला होता. आता दारूबंदीच उठल्यामुळे, सेल्सटॅक्स रद्द होण्याची (वेडी) आशा आम्ही करीत होतो. रद्द होणे दूरच तो आणखीनच वाढला. आतापर्यंत सरकारला ९३ कोटी

मिळत होते. नवी करवाढ त्यात ७ कोटींची भर ट्राकील, व राऊंड फिगर १०० कोटींची होईल. दुकानदार कधी अर्धा पैसा परत देतो? बस्! जनतेला दोन्ही-कडून थपडा! सेल्सटॅक्स वाढीवर लोकांची प्रतिक्रिया तीव्र झाली. साउथ इंडिया चेंबर ऑफ कॉमर्सने व्यापारात घट येईल हा इशारा दिला. वास्तविक रेडिओ, इस्तरी इ. वस्तूंच्या मूळ किंमतीच्या ६७% रक्कम करांमध्ये जाते आहेच, त्यात ही भर! सहाजिकच मद्रासचा इतर प्रांतांशी व्यापार मंदावेल.

नव्या वर्षी मद्रास शहरातील घरपट्टी व जमीनसारा दोन्हीही वाढत आहेत. स्वत:बरोबरच मद्रास शहराने कोईमतूर, त्रिचनापल्ली, मदुरा व सेलम ह्या शहरांनाही ओढले आहे. त्यामुळे सरकार एक कोटी रुपये कमविणार आहे. मद्रास शहरास 'मुंबई-दिल्ली'पेक्षाही अधिक भव्य करण्यासाठी एक योजना आखली आहे – जवळ जवळ साडेनऊशे कोटी रुपयांची अन् अनेक वर्षांची! सध्यातरी पैशाअभावी योजना कागदावरच आहे.

तमीळनाडूतील दोन्ही बसवहातूक सरकारीच आहे. दोन्ही म्हणजे गावातले गावातील व दोन गावांना जोडणारी : अर्थातच् सरकारी अव्यवस्थेमुळे कारभार तोटयात आहेच पण बेभरवशाचासुद्धा झालाय. मद्रास सिटीबसेसवर तर महाभारत रामायण लिहून होईल. त्यापेक्षा पी. एम. टी. शंभरपटीने बरी म्हणायची वेळ येते. इतके असूनही, कालच्या बजेटात घोषणा केलेली आहे की, ५० किंवा अधिक बसेस असणाऱ्या उरल्यासुरल्या कंपन्यांचेही राष्ट्रीयीकरण! वास्तविक जिथे सरकारी बसेस चालत नाहीत असेच रूटस् खाजगी कंपन्यांना दिलेले होते. आता कुणालाही १० पेक्षा अधिक बसेस ठेवता येणार नाहीत–असल्यातर बायको मुलगा यांच्या नावे ट्रान्स्फरही करता येणार नाही. तुम्ही मदुरा, त्रिची शहरात TVS कंपनीच्या बसेस पाहिल्या असतील. TVS ही दक्षिणेतील सुप्रसिद्ध कंपनी–वक्तशीरपणा आदबीने वागणारा नोकरवर्ग, उत्तम गाड्यांबद्दल ही कंपनी नावाजलेली! पण आता सारेच सरकारीकरण. म्हणजे उद्धट नोकर...काळवेळेचे बंधन इल्ले! मद्रासचे असेंब्लीत चर्चेच्या वेळी विरोधी आमदारांनी अक्षरशः शिव्या मोजल्या. पैकी उदाहरणादाखल मि. जे. जेम्स (काँग्रेस-ओरी.) यांचे वाक्य पाहा 'State-Transport, in which a capital of over 20 crores had been sunk, seemed to be in a mess, which God alone can clean-up' त्याचे कारणही तसेच आहे. गेल्या वर्षी ५३ लाखांचा तोटा आहे, तर १९६९ साली तोटा होता ४४ लाख ३७ हजारांचा. ते काहीही असो. ह्या नव्या जाळ्यात जेमतेम १० कंपन्यांच्या ७०० बसेस सापडतील. शिवाय त्यांना चार कोटींची नुकसानभरपाई द्यायची, तो प्रश्न आहेच!

बजेटातील जमीन महसूल खात्याला सोळा कोटींची नुकसानी आहे, तर जमेची सारी भिस्त आहे कर्जावर–केंद्राकडून ४४ कोटी, ओपन मार्केट कर्ज २२ कोटी, तर

ॲटानोमस संस्थांकडून १६ कोटी. वास्तविक सध्याच ६० कोटी, पूर्वीचे कर्जापोटी द्यावे लागतात तमीळनाडूला. अर्थातच पुढील वर्षासाठी १६ कोटींची तूट आहेच ! कुणी सांगावे ? सध्यातरी लॉटरीत तमीळनाडू आघाडीवर आहे ! हा तोटा भरून निघण्यास, सोळा लाखाचे बक्षिसाची एक लॉटरी सोडत पुरेशी आहे. शिवाय हरियानावर ताण केल्याचे समाधान निराळेच !

□ □ □

---


## लक्ष्मणराव केळकर

पृष्ठ ४४ वरून

श्री. लक्ष्मणराव केळकरांनी प्रामाणिक कष्टांनी मॅट्रिकच्या विद्यार्थ्यांची तर सेवा केलीच, पण ती करता करता स्वतःची उन्नतीही साधली. आज त्यांच्या मालकीचा एक छोटासा छापखाना, भव्य तीन मजली इमारत, मोटारगाडी इत्यादि लौकिक सुखसाधने उभी आहेत.

सर्व अभ्यास विषयांमध्ये भूगोल हा त्यांच्या अत्यंत आवडीचा विषय. म्हणून भूगोलविषयक एक मोठे संदर्भ-ग्रंथालय व संग्रहालय आपल्या तीन मजली वास्तूत निर्माण करण्याची त्यांची एक स्वप्न-योजना आहे, आणि त्या दृष्टीने ते यापूर्वीच खटपटीला लागलेले आहेत. आणि ते संकल्पित संग्रहालय केवळ आपल्या चार भिंतीत कोंडून ठेवणे त्यांना मान्य नाही. एक मोठी व्हॅन-गाडी घेऊन देशाच्या कोनाकोपऱ्यात हिंडून, ह्या फिरत्या संग्रहालयाच्या द्वारा एकमेकांची माहिती एकमेकांना द्यावी, आणि खरीखुरी एकात्मता देशभर निर्माण करावी, ही ह्या संग्रहालयामागील प्रेरणा त्यांच्या मनात आहे...

मी जर देव असतो, तर म्हणालो असतो– ' तथास्तु ! '



# इंग्लंड – आर्थिक प्रश्नचिन्ह !

महागाई भडकते आहे. भरमसाठ चलनवाढ झालेली आहे. बेकारीनं सर्व जुने विक्रम मोडले आहेत. 'रोल्स रॉईस'सारखे प्रचंड, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे उद्योग दिवाळं काढीत आहेत. मोठमोठे उद्योग समूह उद्योगाचा विस्तार करण्यासाठी बिचकत आहेत. नवीन भांडवल गुंतवणूक लांबणीवर टाकत आहेत. साठ टक्के कंपन्यांतली उपलब्ध उत्पादनक्षमता पूर्णपणे उपयोगात आणली जाणं अशक्य झालं आहे. वाढती महागाई गृहिणींना त्रस्त करून सोडत आहे. वाढती बेकारी प्रश्नचिन्हाचं गांभीर्य वाढवत आहे. तर, महागाई-चलनवाढ ह्यामुळे निर्माण होणारे कामगारांचे आर्थिक लढे समाज जीवन खिळंखिळं करून सोडत आहे.

हे वर्णन एखाद्या अविकसित आफ्रो-आशियाई राष्ट्राचं नाही; तर, आमच्या 'ग्रेट ब्रिटन'चं आहे ! एकेकाळच्या समृद्ध इंग्लंडची आजची आर्थिक परिस्थिती अशी आहे. वर्षापूर्वी निवडून येताना हुजुरांनी चांगल्या भविष्याचं चित्र जनतेसमोर रेखाटलेलं होतं. पण वर्षानंतर परिस्थितीत फारसा बदल नाही. उलट, आर्थिकदृष्ट्या ब्रिटन आज अतिशय कमकुवत बनला आहे. राजकीय दृष्ट्याही हुजूर पक्षानं बरेच काही गमावलं आहे. द. आफ्रिकेला शस्त्रास्त्र विक्री, ऱ्होडेशियाशी फिरून संवाद, आशियाई ब्रिटिश पासपोर्टधारकांविषयीचं धोरण, बांगला देशबाबतची भूमिका – वगैरे अनेक बाबतीत आज हीथ सरकारवर, ब्रिटिश मंडळी कोरडे ओढताना आढळतात ! ह्या साऱ्याचं साहजिक पर्यवसान हुजुरांच्या ताज्या पराभवातनं आढळून येतं. स्थानिक पातळीवरील निवडणुकांत तसेच, लोकसभानिवडणुकांत अलीकडे हुजूर पक्षाला बरेच हादरे बसले. ह्या प्रत्येक ठिकाणी मजूर-पक्षानी घवघवीत यश मिळवलं आहे ! आपल्या सरकारबद्दलच्या जनतेच्या रोषाचीही पूर्ण कल्पना पंतप्रधान हीथ ह्यांना आहे. त्यांच्या ताज्या वक्तव्यातून ही जाणीव स्पष्ट होते. तथापि आगामी निवडणुकांपर्यंत, हे पारडं पुन्हा फिरवता येईल; आणि पुन्हा हुजूरपक्षच सरकार बनवू शकेल ह्याविषयीही त्यांना आत्मविश्वास वाटतो.

त्यांच्या ह्या आत्मविश्वासाचं कारण अर्थात उघड आहे. फ्रेंच अध्यक्ष पाँपिदू ह्यांच्याबरोबरची बोलणी यशस्वीरित्या पार पाडून नुकतेच हीथसाहेब परतले आहेत. युरोपीयन सामाईक बाजारपेठ आता इंग्लंडला खुली झाली आहे. आणि

त्यामुळे, इंग्लिश-उद्योगाला त्यामुळे जवळ जवळ तीस कोटींची बाजारपेठ उपलब्ध झाली. साहजिकच, औद्योगिक वाढ, क्षमतेचा परिपूर्ण उपयोग त्यामुळे होईल ही अर्थज्ञांची रास्त अपेक्षा आहे. त्यामुळे आपोआप बेकारीचा प्रश्न सुटू शकेल, महागाईची झळही कमी होईल असा अंदाज आहे! १९६१ पासून लोंबकळत पडलेल्या ह्या प्रश्नांत एडवर्ड हीथ ह्यांनी संपादलेलं यश ही त्यांची भरीव कामगिरी गणली जात आहे. त्यांची ही कामगिरी, ब्रिटनला देणगी मानली जात आहे! आणि ह्याच मार्गांनी ब्रिटनपुढली आर्थिक समस्या सोडवली जाऊन, हुजुरांचा पुढल्या निवडणुकांतला मार्ग मोकळा होईल असं गणित मांडलं जात आहे!

तूर्त तरी, सामान्य ब्रिटिश जनतेचा युरोपीय सामायिक बाजारपेठेतील प्रवेशाला विरोध आहे! आणि आर्थिक परिस्थितीही डळमळीत आहे! ह्या परिस्थितीवर स्वार होऊन, विल्सनसारख्या प्रतिस्पर्ध्याला हाताळून, हीथ सरकारला पुढे कूच करायचं आहे!! आज तरी, पाश्चात्य निरिक्षकांच्या मते हीथसाहेबांना फारशी आशा नसल्याचं बोललं जात आहे.

## समाजवाद! समाजवाद!!

टांझानिया! आफ्रिकेतलं नवस्वतंत्र राष्ट्र. अर्थात समाजवादी!! त्याचे अध्यक्ष न्यरेरे हे टांझानियातल्या वुईमेन्स कौंसिलपुढे (वनिता समाजापुढे) भाषण करीत होते. आपल्या भाषणात ते म्हणाले, 'प्रत्येक व्यक्तीला तिच्या गरजेनुसार वेतन मिळालं पाहिजे. त्याचप्रमाणे दोन नागरिकांच्या मासिक उत्पन्नात फार मोठी तफावतही असता कामा नये! आता हेच पहाना! मला दरमहा चार हजार रुपये पगार आणि माझ्या निरोप्याला मात्र फक्त दोनशे रुपये पगार! हे असं का असावं? मी राष्ट्राध्यक्ष आहे हे कबूल. पण म्हणून एवढी तफावत? तेही आम्ही दोघेही कुटुंबवत्सल असून व दोघांच्याही गरजा समान असून देखील? राष्ट्रांध्यक्षांचं पोट मोठं असतं असा तर कुणी समज नाही ना करून घेतला?'

अ. न्यरेरे ह्यांच्या भाषणावर टाळ्यांचा कडकडाट झाला. कडकडाटातून भानावर येऊन त्यांच्या निरोप्यानं मोठ्या आशेनं व्यासपीठाकडे पाहिलं! पण अध्यक्ष तिथे थांबलेच नव्हते. त्यांच्या हेलिकॉप्टरचा दूर दूर जात असलेला आवाज मात्र निरोप्याच्या कानावर केवळ आदळत होता!!

□ □ □

पृष्ठ ११ वरून

प्रकार घडले होते. पण देशाच्या इतर भागातील विद्यार्थ्यांच्या मानाने ते काहीच नव्हते. मुंबईत तर आजपर्यंत विद्यार्थी संप वगैरे विशेष असे नव्हतेच. गेल्या फेब्रुवारी-मार्चच्या सुमारास एका छोटया प्रकरणावरून सेंट झेवीयर्स कॉलेजमधील काही विद्यार्थ्यांनी मुंबईतील सारी महाविद्यालये बंद पाडायच्या घोषणा केल्या होत्या. का तर म्हणे एक 'विद्यार्थी नेता' वर्गात काही सांगत असताना तेथे प्राचार्य गेले आणि त्यांना काहीतरी सांगायचे होते म्हणून त्याला जागेवर बसण्यास सांगण्यात आले व त्यात त्या नेत्याचा हक्कभंग झाला. त्यानंतर त्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी एक-दोन प्रचंड मोर्चे काढण्याचा घाट घातला होता पण शंभर दीडशे डोकीच त्यात सामील होती आणि त्यातही प्रामुख्याने होती अस्ताव्यस्त केस वाढलेली, बेट बॉटम् परिधान केलेली, (व बहुधा फार्म्स न मिळालेली) वडिलांचा पैसा उधळणारी मॉडर्न पोरं पोरी. त्यांचा एक नेता स्वतःला डॅनी कोहेन (डॅनी कोहेन हा फ्रान्समधील 'मे रेव्होल्युशन '–१९६८ मे–चा विद्यार्थी नेता) समजून विद्यार्थी क्रांतिच्या फालतू गप्पा मारीत होता. कॉलेजच्या जिन्याच्या पायऱ्यांवर घोळक्यांनी बसून सिगरेटी फुकणारे, पोरींच्या गळ्यात हात घालून सदैव संचार करणारे हे विद्यार्थी कसली कपाळाची क्रान्ती करणार.

याच्या अगदी उलट प्रकार सध्या मुंबईत घडत आहे. शिक्षणाची व ज्ञान साधनेची खरी कळकळ असणारे व त्याबाबत गंभीर असणारे, ग्रामीण भागातून आलेले, मध्यमवर्गीय कुटुंबातील विद्यार्थी त्यांच्या रास्त मागण्यांसाठी संप करून राहिले आहेत. त्यांच्या संपाची तऱ्हाही वेगळी आहे. ती मग पुढे पाहूच.

हे विद्यार्थी पशु-वैद्यक-महाविद्यालयाचे आहेत. पूर्वी मुंबई-विद्यापीठाशी ते संलग्न होते. पण १९६८ पासून ते राहुरीच्या महात्मा फुले कृषि विद्यापीठास जोडण्यात आले आणि त्याचवेळी काही प्रश्न निर्माण झाले. याच कृषि विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी पुणे येथे संप व लढा चालू केला आणि पशु-वैद्यक महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनीही त्यांना पाठिंबा दर्शविण्यासाठी व त्यांच्या स्वतःच्या रास्त मागण्या मंजूर करून घेण्यासाठी संप पुकारला आणि तो मोठ्या निर्धाराने पण इतरांना त्रास न होईल अशारितीने, शांतपणे चालू आहे.

परवाच मी तेथे जाऊन विद्यार्थी कृति समितीचे अध्यक्ष श्री. माणिक पुरे व इतर सदस्य यांची भेट घेतली. पशु-वैद्यक महाविद्यालयाचा परिसर अत्यंत रमणीय आहे. तेथे गेल्यावर आपण मुंबईतीलच एखाद्या भागात आहोत यावर विश्वासच बसत

नाही, इतकी ती जागा रमणीय आहे. तेथे नेहमीसारखे संपाचे वातावरण वगैरे बिलकूल नव्हते की आरडाओरड वा घोषणांचे राज्य नव्हते. अगदी तेथील शांत वातावरणाला शोभेल असाच शांत संप. मुलांनी तेथील साऱ्या कर्मचाऱ्यांना महाविद्यालयाच्या आवारात प्रवेश बंद केला आहे. पण याबाबतही कोणाचाही अजूनपर्यन्त अनादर झाला नाही. अगदी प्राचार्य डॉ. हत्तंगडी व त्यांचे सहकारी प्राध्यापक यांनाही तेथे प्रवेश बंद असूनही त्यांचाही अनादर करण्यात येत नाही. त्यांच्या शिस्तबद्ध, शांत व सभ्यतापूर्वक चाललेल्या संपाची झलक पुढील एका किस्स्यावरून येईल. संपाचा एक भाग म्हणून सुमारे अडिचशे ते तीनशे विद्यार्थ्यांनी सचिवाल्यावर मोर्चा नेला होता. गाडीने परळहून येताना साऱ्यांनी तिकीटे काढली होती. त्याबाबत एक टी. सी. म्हणाला की, संप वा मोर्चात सामील व्हायला जाताना सर्वांनी तिकीटे काढण्याचा हा बहुदा पहिलाच प्रसंग असावा. असो.

संप चालू असला तरी पशु-उपचार विभागाचे काम जारीने चालू असून ते काम स्वतः विद्यार्थीच करतात. शिवाय प्रयोगार्थ पाळलेल्या प्राण्यांची देखभाल करणे त्याचप्रमाणे स्वच्छता कामगारांनाही प्रवेश बंद असल्याने सर्वत्र स्वच्छता राखणे ही सर्वच कामे विद्यार्थी करतात.

पुण्याच्या कृषि विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना जरी या विद्यार्थ्यांचा पाठिंबा असला तरी त्यांच्या अनेक जुन्या समस्या व मागण्या आहेत व त्यासाठी संप चालू आहे. त्यांच्या मागण्या रास्त असूनही आजपर्यंत त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे.

## विद्यार्थ्यांच्या मागण्या

त्यांची पहिली मागणी अशी की इंटिग्रेटेडच्या विद्यार्थ्यांना B. V. Sc. & A. H. ही पदवी मिळावी. (B. V. Sc. & A. H. म्हणजे बॅचलर ऑफ व्हेटरनर्स सायन्स अॅन्ड अॅनिमल हसबंड्री) १९६३ पासून त्यांना हीच पदवी मिळत होती पण १९६८ सालापासून त्यांना फक्त B. V. Sc. हीच पदवी मिळते. म्हणजे अॅनिमल हसबंड्रीचा अभ्यास मात्र करायचा पण पदवीत त्याचा समावेश नाही. त्यामुळे अॅनिमल हसबंड्रीशी सलग्न विभागात नोकरीची संधी नाही. शिवाय राज्याबाहेर अशी पदवी नसल्यामुळे व्हेटर्नरी व एक्सटेंशन अधिकारी म्हणूनही नोकरी मिळणे जड. नागपूरच्या पंजाबराव कृषि विद्यापीठाच्या पदवीत A. H. चा समावेश आहे मग एकाच राज्यातील दुसऱ्या विद्यापीठात हा भेदभाव कशासाठी ? शिवाय या दोन्ही विद्यापीठांचा अभ्यासक्रम व परिक्षा पद्धतीही सारखीच आहे. असे असूनही हा भेदभाव आहे.

त्यांची दुसरी मागणी क्लास टू गॅझेटेड पोस्ट पदव्युत्तर मिळावी. म्हणजे पदवी मिळाल्यानंतर नोकरीत क्लास टू ही गॅझेटेड पोस्ट मिळावी, कारण १९६१ च्या नाईक कमिशनच्या (मुख्यमंत्री नाईक महसूल मंत्री असताना ते या कमिशनचे

प्रमुख होते) शिफारसींनुसार बी. डी. ओ., मेडिकल ऑफिसर, इंजिनियर व बी. व्ही. एस्सी. व ए. एच्. यांना क्लास टू गॅझेटेड पोस्ट मिळाली पण बी. व्ही. एस्सी. सोडता इतरांना नोकरी मिळताच तात्काळ ही पोस्ट देण्यात येते तर त्यांना मात्र तीन-चार वर्षांनंतर ही पोस्ट मिळते. येथे एक गंमतीदार प्रकार म्हणजे मेडिकल ऑफिसर (माणसांचा डॉक्टर) ज्या रोग्यांना तपासतो त्यांची शरीररचना सारखी असते व त्यांना बोलता येतें तर या गुरांच्या डॉक्टर्सना वेगवेगळ्या प्राण्यांची वेगवेगळी शरीररचना अभ्यासावी लागते. शिवाय या अबोल पेशन्टस्ना काय झाले आहे तेही शोधून काढायचे आणि मुळात म्हणजे त्यांना काबूत ठेवायचे ही सारी कसरत करावी लागते. वाघोबांसारखा पेशंट असल्यावर मग बघायलाच नको. पण असे असूनही पोस्ट देताना त्यांना सापत्नभावाची वागणूक.

त्यांची तिसरी मागणी विद्यावेतन पुन्हा चालू करण्यासंबंधीची आहे. १९६८ च्या बॅचला ते दोन वर्षे मिळाले पण त्यानंतर बंद झाले.

ग्रामीण भागातून अनेक मध्यमवर्गीय व गरीब कुटुंबातून येणारी ही मुले, त्यातच पुस्तकांच्या किमती अफाट व मुंबईची राहणी खर्चीक म्हणून हे वेतन पुन्हा मिळावे अशी मागणी. बरं ही रक्कम किती आहे तर अवघी ४० रुपये.

पशुवैद्यकशास्त्राचा येथील अभ्यासक्रम पाच वर्षांचा करण्यात आला आहे तर देशभर तो सहा वर्षांचा आहे. शिवाय या पाच वर्षांच्या कोर्सला 'इंडियन कॉन्सिल ऑफ अॅग्रिकल्चरल रिसर्च' या संस्थेने मान्यताही दिलेली नाही, त्यामुळे आपले भवितव्य धोक्यात येईल, असे विद्यार्थ्यांना वाटते. शिवाय देशातील इतर पशु-वैद्यक पदवीधरांबरोबरचा शैक्षणिक दर्जाही त्यांना न मिळण्याचाच धोका येथे अधिक.

याशिवाय प्राध्यापकांची कमतरता, फुले कृषी विद्यापीठात या फॅकल्टीला योग्य ते प्रतिनिधित्व नसणे व इतरही काही मागण्या आहेत.

१९६१ सालीही त्यांनी संप केला होता, पण मागण्यांबद्दल सहानुभूतिपूर्वक विचार करण्याचे आश्वासन मिळाल्याने तो मागे घेण्यात आला होता. पण ६८ साल उजाडले तरी काहीच हालचाल न झाल्याने पुन्हा त्यांना याच मार्गाचा अवलंब करावा लागला. पण पुन: त्याच प्रकारच्या आश्वासनानंतर संप मागे घेतला गेला म्हणूनच यावेळी आश्वासनांना भीक घालायची नाही तर प्रत्यक्ष अंमलबजावणी होईपर्यंत निर्धाराने संप चालूच ठेवायचा निर्णय विद्यार्थी कृती समितीने घेतला आहे.

राज्याचे मुख्य मंत्री व शेतकी मंत्री श्री. पी. के. सावंत यांच्याशी विद्यार्थ्यांनी बोलणी केली, पण निश्चित आश्वासने व त्यांची तातडीने अंमलबजावणी होईल असे न वाटल्याने अजूनतरी संप आहे त्याच अवस्थेत आहे.

विद्यार्थ्यांच्या मागण्या रास्त आहेत आणि सरकारने त्वरित त्यांची दखल घ्यावी

नाहीतर सुमारे दहा वर्षे आश्वासनांच्या आशेवर पोळून निघालेले विद्यार्थी जर वाकड्या वाटेकडे गेले तर तो त्यांचा दोष असणार नाही. ◻

# वाजपेयी मुंबईत

गेल्या रविवारी एक प्रसन्न व्यक्तिमत्त्व मुंबईत होतं. जनसंघाचे अध्यक्ष खासदार अटलबिहारी वाजपेयी, जनसंघातर्फे 'चलो दिल्ली' या 'बांगला देश'संबंधी संसदेवर होणाऱ्या सत्याग्रहासंबंधी मुंबईतील प्रचाराचा नारळ फोडण्यासाठी येथे आले होते. बांगला देशाला तात्काळ मान्यता देणे का आवश्यक आहे यासंबंधी पत्रकारपरिषदेत त्यांनी प्रश्नांना उत्तरे दिली.

आपण मान्यता देण्याने सारेच प्रश्न सुटणार नसले तरी त्यामुळे उघडपणे तेथील मुक्तीफौजेला मदत देणे विशेषत: रणगाडे, विमानविरोधी तोफा, छोट्या बोटी व तत्सम इतर लष्करी साहित्य देणे सुकर होईल व त्यामुळेच येथील निर्वासित परत जाण्याला मदत होणार आहे असे ते म्हणाले. चीन या संघर्षात उतरणार नाही असाही त्यांना विश्वास वाटतो. पाकिस्तान आपल्यावर हल्ला करण्यापूर्वीच आपण बांगला देशच्या मान्यतेचा प्रश्न निकालात काढला पाहिजे. पाकिस्तानच्या सत्ताधिशांना हल्ल्यासाठी त्यांना योग्य ती जागा व वेळ यांची निवड करू देण्याची संधी देता कामा नये असे त्यांना वाटते. जम्मू-काश्मीरमधून येणाऱ्या बातम्यांवरून पश्चिमेकडेच हल्ला होईल असे दिसते. पेकिंगवादी मौलाना भाषानी यांच्या अनुयायांना चीनकडून मदत मिळत असल्याचेही त्यांनी सांगितले.

त्यांच्या पक्षातर्फे संसदभवनच्या सत्याग्रहाच्या निमित्ताने 'बांगला देश पुरुषार्थास आवाहन' हे श्री. दि. वि. गोखले लिखित पुस्तक प्रकाशित करण्यात आले असून दादर, चर्चगेट, बोरीबंदर येथील स्टेशन्सवर पुस्तकाच्या प्रती विकण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. शिवाय निरनिराळ्या ठिकाणी प्रचारसभाही घेण्यात येत आहेत.

दिनांक १ ते ११ ऑगस्टपर्यंत रोज ५०० सत्याग्रही संसदेवर निदर्शने करतील आणि १२ ऑगस्ट रोजी प्रचंड सत्याग्रह करण्याचा कार्यक्रम आहे.

महाराष्ट्रातील सत्याग्रहींची पहिली तुकडी मुंबईची असून त्यात ५० महिला आहेत व त्याचे नेतृत्व जनाबाई वाघ नावाच्या एका श्रमिक महिलेकडे आहे. पाच किंवा सहा ऑगस्ट रोजी बांगला देशच्या मान्यतेच्या प्रश्नावर मुंबईत सर्वपक्षीय सभा घेण्याचाही जनसंघाच्या मुंबई शाखेचा मानस आहे.

**थोडे विषयांतर :** पत्रकार परिषदेत एका पत्रकाराने श्री. वाजपेयी यांना ते श्री. जॉर्ज फर्नांडिस यांच्या लग्नाला गेले होते का, असा प्रश्न विचारला, त्यावर त्यांनी अत्यंत मिस्किलपणे सांगितले.

'अरे भाई, हम अपने शादीके लिये दुसरोंको बुला नही सकते तो दुसरोंकी शादीमे कैसे जायेंगे.' यावर हास्याचे फवारे उडाले.'

तात्काळ दुसरा प्रश्न विचारला गेला. 'आपण श्री. फर्नांडिस यांच्या पावलावर पाऊल टाकणार का?'

हास्याच्या प्रचंड धबधब्यातच त्यांच्याकडून नकारार्थी उत्तर आले.

◻

# नाट्यशिक्षण शिबिर

रविंद्र नाट्य मंदीरच्या भव्य स्टेजवर निरनिराळ्या वयाचे पुरुष आणि स्त्रिया बसलेल्या असतात. अगदी मन लावून काहीतरी लेखन आणि तोंडाने पुटपुटणे चालू असते. त्यांचा उत्साह दांडगा असावा असे प्रथमदर्शनीच वाटू लागते. हा एक आगळा वर्ग पाहून मला माझ्या बालपणाची आठवण झाली. चाचणी परिक्षा असली की आम्हीही बाकावर न बसता गुरुजींच्या टेबलाखाली वा खुर्चीजवळ, किंवा एखाद्या कोपऱ्यात, बसून परिक्षा देत असू पण आमचे मास्तर वा बाई मात्र खुर्चीवरच बसायच्या.

या वर्गाच्या बाई खुर्ची वगैरेवर न बसता चक्क विद्यार्थ्यांप्रमाणेच स्टेजवर खालीच बसल्या होत्या. जवळपास फळा, डस्टर वा खडू वगैरेची काहीच भानगड नव्हती.

या बाई म्हणजे रंगभूमीवरील सुप्रसिद्ध अभिनेत्री सौ. विजया मेहता या होत. विजयाबाईंचा उत्साह अमाप, अभिनयकुशलता दांडगी आणि रंगभूमीविषयीच्या निरनिराळ्या अंगाचे सखोल ज्ञान, यामुळेच महाराष्ट्र सरकारच्या सांस्कृतिक संचालनालयाने नाटचशिबीरांच्या संचालकत्वाची जबाबदारी गेली दोन-तीन वर्षे त्यांच्याकडे सोपवली.

राज्य सरकारतर्फे प्रतिवर्षी ज्या नाटचस्पर्धा घेण्यात येतात. त्यात अभिनय वा दिग्दर्शनाचे सुवर्णपदक मिळालेल्या कलाकारांना रंगभूमीची व अभिनयाची ओळख करून देण्यासाठी दरवर्षी हे नाटचशिबीर घेण्यात येते भोपाळसारख्या महाराष्ट्रा-बाहेरील ठिकाणाहूनही शिबिरार्थी येतात.

अभिनय, आवाज आणि हालचाली त्याचप्रमाणे, नेपथ्य, प्रकाशयोजना पाश्चात्य नाटककार वगैरे विषयांची थोड्या काळात (एक महिन्यात) जास्तीत जास्त ओळख करून देणे हे या शिबिराचे प्रयोजन.

सौ. विजयाबाईंना शिबिरासाठी नाटचशिक्षणाचे पाठ घ्यावयाला मिळालेले सहकारीही उत्साही आणि आपापल्या क्षेत्रात गाढे असलेले आहेत. यातूनच एक

टीम तयार होणार असून येत्या काही महिन्यात दिल्लीच्या 'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा'च्या धर्तीवर महाराष्ट्र सरकार जी अॅकॅडमी सुरू करणार आहे त्यावेळी या टीमवर्कचा फारच चांगला उपयोग होईल.

एक महिन्याच्या काळात उत्तम नट-नटी निर्माण व्हाव्यात अशी अपेक्षा नाही. हा फक्त नाटच विषयक दृष्टी देण्याचा एक प्रयत्न आहे. शिबिरार्थी हा कमीत कमी शालांत परिक्षा उत्तीर्ण झालेला असावाच ही अट असल्याने विद्यार्थ्यांना एक ठराविक बौद्धीक पातळी जरूर असते.

या वर्षीच्या शिबिरात एकूण २७ विद्यार्थी असून त्यापैकी ९ जण मुंबईचे आहेत. त्यांच्यापैकी अनेकजण गेली काही वर्षे रंगभूमीवर वावरत आहेत. त्यांच्या ठाई अमाप हौस आणि शिकण्याची उत्कट इच्छा जरूर आहे. अनेकांना व्यावसाईक म्हणून रंगभूमीवर जायला आवडेल असेही त्यांनी सांगितले. विचारलेल्या सर्वच प्रश्नांना त्यांनी अगदी मोकळेपणे उत्तरे दिली. एक शिबिरार्थी म्हणाला की शिबीर शिक्षणाबद्दल तो साशंक होता म्हणून फक्त १५ दिवसाचीच रजा त्याने घेतली पण शिबिर सुरू होताच काही दिवसातच त्याने रजा वाढविण्याचा अर्ज ठोकला. मुंबईबाहेरील विद्यार्थ्यांना येथे पारंपारिक व प्रायोगिक नाटकांचे अनेक प्रयोग बघायला मिळाले, हा फारच मोठा लाभ वाटतो. कारण शिबिराचा एक भाग म्हणून सर्व विद्यार्थ्यांना नाटयप्रयोग, त्याचप्रमाणे पाश्चात्य नाटयविषयक चित्रपट वगैरे दाखविले जातात. ही त्या सर्वांच्या दृष्टीने एक फार मोठी जमेची बाजू.

रोज विद्यार्थ्यांना योगासने करावी लागतात. हे काम श्री. माधव वाटवे यांच्या अखत्यारीतले. शरीराला आवश्यक तेवढी विश्रांती देऊन आपले चित्त व देहसामर्थ्य एकाद्या गोष्टीवर एकाग्र करण्यासाठी ही योगासने उपयोगी पडतात.

प्रा. अशोक रानडे व्हॉईस कल्चरचे धडे देतात. आपल्या आवाजाची शक्ती ओळखून त्याचा जास्तीत जास्त चांगल्या रितीने उपयोग कसा करावा यासंबंधीचे हे शिक्षण. पार्श्वसंगीतावर प्रमाणबद्ध व तालबद्ध हालचाली करण्याचे पाठही विद्यार्थी गिरवतात. शिवाय अभिनयासाठी पाच-दहा मिनिटांचा एखादा प्रसंग रंगविणे, त्याचप्रमाणे एखादा विषय वा कल्पना यांचा अभिनयात कसा विकास करावा याचेही शिक्षण शिबिरात दिले जाते. स्वतःच्या वा इतरांच्या चुका पाहून त्या सुधारणे हा शिबिरातील महत्वाचा भाग व त्याला 'इंप्रुव्हायझेशन' असे म्हणतात. व याचा फारच चांगला उपयोग होतो असे विद्यार्थ्यांनी सांगितले.

नाटयशिबिराचे इतर मानकरी आहेत श्री. शाम आडारकर, श्री. दामू केंकरे आणि पडद्यामागील सुत्रधार श्री. राजाराम हुमणे आणि श्री. नाना गांगुली.

एक महिना चाललेल्या या शिबिराचा समारोप २९ जुलैला झाला. त्या दिवशी सर्व कलाकारांनी अनिल डांगे यांची 'स्टेशन' ही एकांकिका सादर केली.

। □ □

सौ. पुष्पा भावे - 

# रंगभूमी

## इंद्राचे आसन नारदाची शेंडी

श्री. रत्नाकर मतकरींच्या 'बालनाटय' संस्थेचे नवीन नाटक 'इंद्राचे आसन नारदाची शेंडी' या महिन्यात रंगमंचावर आले आहे. लहान मुलांच्या करमणुकीचा गंभीर विचार गेल्या दहा वर्षातच मराठी नाटयक्षेत्रात सुरू झाला आहे. श्री. मतकरींनी लेखक व दिग्दर्शक या दोन्ही नात्यांनी बालनाटय कल्पनेच्या विकासाला लक्षणीय हातभार लावला आहे. बालप्रेक्षकांमध्ये अमाप लोकप्रियता मिळालेली असूनही आपल्या लहान मुलांच्या नाटकाचा एक साचा त्यांनी बनवलेला नाही. दरवर्षी येणारे त्यांचे नाटक वेगळे रचनास्वरूप घेऊन येत असते. तरी त्यामध्ये काही समान वैशिष्टये जरूर जाणवतात. रंगमंचावरील चमत्कार, नेपथ्याची भव्यता, बालनटांनी केलेला कृतक अभिनय या साऱ्यांपासून त्यांची रंगभूमी अलिप्त आहे. त्याऐवजी बालमनाच्या कल्पकतेवरचा आणि विनोद बुद्धीवरचा विश्वास त्यांच्या विशिष्ट नाटयरचनेला कारणीभूत झालेला आहे. आतापर्यंतच्या त्यांच्या नाटकात नेपथ्याचें फारसे अवडंबर कधीच नसल्यामुळे त्यांना आपली नाटके शालेय सभागृहातून करता येत होती. 'इंद्राचे आसन नारदाची शेंडी' या त्यांच्या नाटकात नेपथ्य व इतर चमत्काराला महत्त्वाचे स्थान असूनही त्यांनी जो प्रयोग सादर केला त्यात सहजता, लवचिकपणा हा विशेष गुण जाणवला.

हिंदु पुराणकथेतील ऋषींच्या तपाने डळमळणाऱ्या इंद्राच्या आसनावर आणि नारद-इंद्र मैत्रीच्या कल्पनेवर हे नाटक आधारलेले आहे. मुलांच्या आधुनिक आशंकवादी दृष्टीची आणि चमत्कृतीच्या हौसेची विरोधी जाणीव हा या नाटकाचा मूलप्राण आहे. या दोन अंकी नाटकाची सैल रचना सांधून घेण्यासाठी एक शाहीर सूत्रधार श्री. मतकरींनी योजला आहे. इंद्राची चहाची आवड, इंद्राणीला हवे असणारे उंच टाचांचे बूट, नारदाने एकतारीचा टेलिफोनसारखा वापर करणे, ऋषींचे तप मोडण्यासाठी सिनेसंगीताची योजना अशा एक ना दोन अनेक गोष्टी मुलांच्या भोवती असणारे जीवन आणि पुराणकाल एकमेकांवर आरोपित करण्यासाठी श्री. मतकरींनी योजल्या आहेत. माणसाचे माकड होणे – त्याला प्रथमतः हसेल तो मनुष्य माकड होईल असा उःशाप मिळणे, म्हणून 'त्या माकडाला हसा

ना ' असा आग्रह होणे, यातून निर्माण होणाऱ्या विनोदाला बालप्रेक्षकांनी मनःपूर्वक प्रतिसाद दिला.

ज्या आसनाभोवती हे कथानक गुंफले होते ते आसन चालत धडपडत इकडेतिकडे जात असे, त्यामागचा सूर्यचिन्ह बाळगणारा पडदाही त्याबरोबर सरकत असे. याचा दृश्यपरिणाम फारच रोचक होता. वेताचा उपयोग नेपथ्यामध्ये फारच कलापूर्ण वाटला. रंगमंचावर आश्विनीकुमारांची फुगलेली पोटे सपाट होणे, माणसाला शेपटी येणे या सगळ्यांवर कळस चढवणारे गजाननाचे आगमन, हे सारे अत्यंत क्षमतेने दाखवले गेले. दैवताचे गांभीर्य राखून त्याचे रंगमंचावर दर्शन घडविणे अत्यंत अवघड असते; परंतु श्री. मधुकर नाईकांनी गजानन फारच डौलाने सादर केला. त्यांच्या रूपाबद्दल रंगभूषाकाराचे कौतुकच करावयास पाहिजे.

या नाटकाच्या प्रयोगात श्री. विजय साळवी यांनी केलेला नारदाचा अभिनय, त्यांचा वैशिष्टयपूर्ण आवाज, शरीराचा लवचिकपणा यामुळे हृद्य झाला. श्री. दिलीप प्रभावळकर व सौ. कमलिनी फडके यांनीही इंद्र आणि इंद्राणी यांच्या भूमिका समजून केल्या. परंतु श्री. मधुकर नाईक, श्री. साळवी आणि कु. जोशी यांचा अपवाद वजा करता कोणाही पात्राला संवाद मुलांपर्यंत स्पष्ट पोचवणे जमत नव्हते.

या नाटकाचा प्रयोग पहात असताना श्री. मतकरींच्या बालगीतलेखनातील कौशल्य विशेषत्वाने जाणवले. त्याचप्रमाणे या गीतांना व्यामिश्र चाली वा पार्श्वसंगीत न देण्यातील त्यांचे चातुर्य जाणवले.

' स्वर्गात आकाशगंगा.
गंगेला सोन्याचा घाट
घाटाला पायऱ्या शंभर ' यासारखी साधी सुंदर गीते त्यांनी लिहिली आहेत. बालांसाठी ध्वनिमुद्रिका काढणाऱ्या संगीतदिग्दर्शकांनी मतकरींच्या गीतांची दखल घ्यायला हवी आहे.

वर उल्लेखिलेल्या गीतांवर बसवलेले नृत्य मात्र फारच गलथानपणे सादर झाल्यामुळे त्या गीतांवर अन्याय झाला. आज शालेय कार्यक्रमातही लोकनृत्य ज्या शिस्तीने सादर केली जातात त्या तुलनेने या नृत्यातील तालविघातक सैलपणा विशेष खटकला. किंबहुना या नाटकाचा प्रयोग पाहात असताना दिग्दर्शकाने पदन्यासाकडे (footwork) द्यावे तितके लक्ष दिलेले नाही हे सारखे जाणवत होते. बालनाट्यातील अभिनयाला नाट्यक्षेत्रात मानले जात नसल्यामुळे श्री. मतकरींना गुणी माणसे मिळणे अवघड जात असेल हे मलाही मान्य आहे; परंतु मुलांसाठी केल्या जाणाऱ्या नाटकाच्या प्रयोगात याहून कितीतरी अधिक सफाई असावयास हवी.

एक मात्र निश्चित : दरवर्षी येणाऱ्या मतकरींच्या नाट्यप्रयोगामुळे उद्याच्या नाट्यरसिकांवर नाटक म्हणजे काय ? नाटक कसे पाहावे ? याचे सुजाण संस्कार नकळत होत आहेत. □ □ □

शरद गोखले

चित्रपट

# देवमाणूस

## दयनीय

मद्रासी मंडळींचा मोर्चा सध्या मराठी चित्रपटांकडे वळला आहे. हिन्दी चित्रपटांचा 'उत्तम धंदा' करणारी ही मंडळी धंद्याचे तेच गणीत घेऊन मराठी चित्रपट निर्मिती करू पहात आहेत. तथापि या आघाडीवर त्यांना यश मिळेल, असे वाटत नाही. वैजयंतीमाला–डॉ. बाली-यांची 'झेप' पार कोसळली. आता ए. के. एम्. प्रॉडक्शन्सचा देवमाणूस आला आहे.

इनामदारी संपली तरी विठ्ठलवाडीमध्ये इनामदारांच्या घराला प्रतिष्ठा आहे. इनामदारांच्या पश्चात इनामदारीणबाईंनी–आईसाहेबांनी गावावर माया करून प्रतिष्ठेची शान कायम ठेवली आहे. देवमाणूसची कथा या इनामदार कुटुंबियां-भोवती गुंफण्यात आली आहे–पुवई कृष्णन यांची ही कथा आता वाचा हं...

आईसाहेब–त्यांना दोन मुलगे. एक मानलेला प्रसाद. एक पोटचा–शेखर. प्रसाद सद्वर्तनी, सेवावृत्तीचा. शेखर अर्थातच दुर्वर्तनी, अरेरावी करणारा, कुटुंबासाठी प्रसादची प्रेमावर तिलांजली. शेखरचे अत्याचार इत्यादि.–तपशिलांचा मसाला भरून कथा फुलवली आहे. त्याला बेंगरुळासारखे वाटणारे खास 'मद्रासी पद्धतीचे'. उपकथानक जोडले आहे. अशा कथेचा शेवट काय होणार ? अखेरीस प्रसादचा विजय. शेखरला शिक्षा.

देवस्थानच्या हत्तीकडून शेखरला शिक्षा करण्याची योजना अतिशय पोरकट वाटली आणि प्रसादचा पुतळा अंगावर पडून शेखरचा झालेला मृत्यु विलक्षण कृत्रीम वाटला. अख्खा गाव प्रसादचा गौरव करतो. देवमाणूस म्हणून त्याचे गोडवे गातो,–प्रसादला जनमानसात एवढी प्रतिष्ठा मिळण्याएवढे त्याने काय केले आहे. हे कधीच समजत नाही.

राजदत्त हे मराठी चित्रपट सृष्टीतील आजचे आघाडीचे दिग्दर्शक, त्यांचे घरची राणी ठीक वाटले, अपराध छानच होते. पण देवमाणूस मात्र कोणत्याच दृष्टिने समाधान देत नाही. चित्रपटातील सर्वात चांगला भाग म्हणून अधळी सुमा, तिच्याबद्दल प्रसादला वाटणारी अनुकंपा सुमाच्या मनात प्रसादबद्दल फुललेली प्रीती,

या सर्व भागाचा उल्लेख करावा लागेल. तर उपकथानकातील प्रेमप्रकरण अगदी फालतू म्हणून बाजूस टाकावे लागेल. उपकथानक पसरट झाल्याने मुख्य कथानकाची गती कुठीत झाली आहे. चित्रपटाला स्वतःचा असा टोन नाही. चित्रपट केवळ १३ रिळांचा असूनही पूर्वार्ध सामान्य, कंटाळवाणा व गतिहीन झाला आहे.

कलाकारांपैकी रमेश देव (शेखर) पठडीबद्ध परंतु चांगले काम करून जातात. देवमाणूस झालेल्या काशिनाथ घाणेकरांची अवस्था दयनीय झाली आहे. प्रारंभापासून अखेरपर्यन्त ते बावचळत वावरले आहेत. अनुपमा दिसते चांगली, बोलणे जरा जास्त लाडीक आहे.

अंधळ्या मुलीचे सुमाचे काम. सरला या नवीन नटीने मनलावून केले आहे. छोटी परंतु महत्त्वाची भूमिका तिच्या वाटचाला आली आहे आणि या भूमिकेला तिने पुरेपूर न्याय दिला आहे.

अन्य छोटया भूमिकांसाठी नावाजलेले कलावंत एकत्र आणले असून,—एक नाना पळशीकर वगळता अन्य कलावंत आपआपल्या भूमिकेत शोभून दिसतात, पळशीकर अतिनाटकी अभिनयाने चांगल्या भूमिकेवर अन्याय्य करतात.

तंत्रज्ञांपैकी सर्वात झकास कामगिरी दत्ता गोर्ले यांची, छाया चित्रणाची महत्त्वाची बाजू त्यांनी झकास संभाळली आहे. पोफळी, चिपळूणच्या परिसरातील बाह्य चित्रण मराठी चित्रपटाच्या मर्यादा लक्षात घेता फारच सरस वाटते. गोर्ले यांनी चित्रपट प्रेक्षणीय केला असला, तरी तो श्रवणीय करण्याची कामगिरी पांडुरंग वोळूर यांना जमलेली नाही. चित्रपटाचे संवाद कित्येक वेळा सुस्पष्ट ऐकूच येत नाहीत. संगीताची बाजू सुधीर फडके यांनी धावत पळत परंतु ठीक संभाळली आहे. चटकन लोकप्रिय ठरेल अशी धून एकाही गीताला मिळालेली नाही. अण्णा माडगूळकरांच्या गीतानाही नेहमीची सफाई नाही. घाईगर्दीत मामला उरकल्यासारखा वाटतो. तात्पर्य काय तर हा ए. के. एम्. चा देवमाणूस निराशजनक वाटतो. विशेषतः मद्रासी मंडळी पाठीशी असल्याने निर्मिती अवस्थेत नेहमी जी आर्थिक तारांबळ उडालेली आढळते; तशी तारांबळ या चित्रपटाच्या बाबतीत झाली नसावी. वाईट इतकंच वाटते की मराठीतील बेस्ट पॉसिबल कास्ट घेऊन हे कडबोळं का तयार करावं, तेव्हा मंडळी पुन्हा निर्मितीत उतरणार असतील, तर त्यांनी जरा सावधगिरीने उतराव इतकच.



 पृष्ठ ९ वरून

गांधीजी काही सुटेनात. शाळा आम्हाला भेटेना. मग बुलेटीन्सचे दिवस सुरू झाले. कॉंग्रेसतर्फे भूमिगत चळवळीची सनसनाटी इत्थंभूत माहिती देणारी पत्रकं निघत. ती वाटणे, वाचणे आणि तिखटमीठ लावून त्यातला मजकूर इतरांच्या कानात कुजबुजणे, ही कामं आम्ही स्वतःच्या गळ्यात अडकवून घेतली. ती पत्रकं कोण लिहायचं नि ती कुठे टंकलिखित होत परमेश्वर जाणे. पण ती वाचताना आपण काहीतरी क्रांतीकार्यच करीत आहोत असा समज होण्याइतके आम्ही भाबडे होतो. बुलेटीन्सच्या मागोमाग कॉंग्रेसचा भूमिगत रेडिओ सुरू झाला. तिन्ही सांजा टळल्यावर काळोखात रेडिओला अक्षरशः कान चिटकवून कुठून तरी अज्ञात ठिकाणाहून ध्वनिक्षेपित होणारे छुपे बातमीपत्र ऐकणे, हा आमचा एक नवाच उद्योग सुरू झाला. डॉ. लोहिया तो कॉंग्रेस रेडिओ चालवीत आहेत अशी कुणकुण होती. नंतर उषा मेहेतांचं नाव कानावर पडू लागलं. कुणीतरी बातमी आणली की, गिरगाव बॅक रोडवरल्या मेहेंदळे बिल्डिंगसमोरच्या इमारतीत पाचव्या मजल्या-वरच्या शेवटच्या खोलीत गुप्त रेडिओचं केंद्र आहे. नंतर डॉ. लोहीया आणि उषा मेहेता दृष्टीला पडाव्यात म्हणून आम्ही मेहेंदळे बिल्डिंगवर अक्षरशः पहारा करू लागलो. पण ती मंडळी कधीच दिसली नाहीत. ती पाचव्या मजल्यावरची खोली मात्र नेहमी बंद असे! त्या भूमिगत आकाशवाणीवरून सुरुवातीला ध्वनिक्षेपित करण्यात येत असलेली 'वंदेमातरम'ची चाल अक्षरशः मनावर रोमांचाची फुलं फुलविणारी होती. त्या द्रुतगतीतल्या चालीला चपखल बसेल असं मराठी विशेषण एकच आहे–मर्द!

अशा गिरक्या घेणं आमचं चालू होतं. घरची माणसं मात्र आमच्या नावाने ठणाणा करीत होती. पोरं शाळेत जात नाहीत ह्याचा अर्थ काय? नि, गांधीजी ह्यांना काय डबोलं देणार? हे त्यांच्यापुढे दोन यक्ष प्रश्न होते! आजी तर सांजसकाळ म्हणे, 'अरे निदान मॅट्रीक तरी व्हा रे; म्हणजे चार दिडक्या तरी मिळवाल; शिकलाच नाही तर काय खाल?' आम्ही मात्र प्रसंगविशेषी धोंडेही खायची तयारी ठेवली होती. कधी कधी वाटायचं की शाळेत जावं. पण पुन्हा वाटा-यचं 'नको! तिकडे गांधीजी, नेहरूंसारखे देशभक्त तुरुंगात नि इकडे आम्ही शाळा करायच्या? थू : आमच्या जिनगानीवर!' आमच्यापैकी एकाच्या अंगात अचानक विरश्री संचारली. तो म्हणाला, 'वेळ अशी येईल की आपल्याला जेवायलाही मिळायचं नाही. काय मिळेल ते पोटात ढकलून वेळ निभावून न्यावी लागेल.' आम्ही म्हटलं 'तथास्तु!' नुसता पाव ढोसून रहाणं म्हणजे काय ते अनुभविण्याचे मी ठरवलं. पॅथे सिनेमासमोरचा मोंगल तेव्हा दोन आण्यात पोटभर खिमा-पावरोटी

द्यायचा. वर बक्कळ कांदाही वाढायचा. मी गेलो. खिशातले दोन आणे पुन्हा पुन्हा पाहिले. ते खर्च करायचे नक्की केलं. गरम गरम पावरोटी. खिम्याचा फडशा पाडला. वर वशीभर कांदा फस्त केला. ते खाणं मला इतकं विलक्षण रुचकर लागलं की मोंगलाकरची पावरोटी-खिमा चापायला मिळत असेल तर आजन्म क्रांतीकारक व्हायला मी एका पायावर तयार झालो ! इतरांनाही ते ठिकाण





अपूर्व गर्दीत सुरू आहे.

अखिल हिंदुस्थानातील रसिकांचे मन जिंकणारे हे चित्र आता मुंबईकरांना रिझविण्यासाठी दाखल झाले.

भू :–धर्मेंद्र, हेमामालिनी, प्राण, ललिता पवार, मनमोहन, इन्द्राणी मुखर्जी, शबनम, जानकीदास गुड्डी, धुमाळ, अरुणा इराणी आणि मेहमूद

: निर्माता दिग्दर्शक : प्रमोद चक्रवर्ती

: गीते : आनन्द बक्षी

: संगीत : एस. डी. बर्मन

ध्वनिकला व्ही. के. मूर्ती

लेखक सचीन भौमिक, गुलशन नन्दा, आगाजानी काश्मीरी

रॉक्सी रोज ३ खेळ

कॅपिटॉल रोज ३ खेळ शुक्र. शनि. रवि. ४ खेळ

लोटस रोज ४ खेळ

प्लाझा रोज ४ खेळ

गणेश रोज ४ खेळ

सूर्य रोज ४ खेळ

पॅराडाईज रोज ४ खेळ

रूपम रोज ३ खेळ

नन्दी (बांद्रा), मीलन (सांताक्रुझ), अम्बर–संगम (अंधेरी), हंजर (जोगेश्वरी) टोपीवाला (गोरेगाव) जया (बोरिवली), संगीता–न्यू इरा (मालाड) नटराज (चेंबूर), श्रेयस (घाटकोपर), जवाहर (मुलुंड) आकाश–कल्पना (कुर्ला) अशोक गणेश (ठाणे), कृष्ण (भांडुप), पूर्णिमा (कल्याण) सपना–प्रभात (उल्हासनगर)

दर बुधवारी सकाळी ११ वाजता व शुक्रवारी दुपारी १–३० वा. विविध भारतीवर ' नया जमाना ' रेडिओ प्रोग्राम ऐका. –कपूरचंद प्रकाशन –

सांगितलं. मग सगळेच काही दिवस तरी त्या मोंगलाचे अगत्यशील आश्रयदाते झाले.

असे दोन महिने गेल्यावर डोळ्यांसमोर काजवे नाचायला लागले. मुंबईतल्या घातपाती चळवळीला ओहोटी लागली. अच्युत पटवर्धन, अरुणा असफअल्ली, जयप्रकाश नारायण, ही नावं नव्याने कानावर पडू लागली. दूर कुठे कुठे मोडतोड होई, बॉम्ब उडवले जात, ब्रिटिशांना चांगलीच अद्दल घडवली जाई. पण ते पाणी ओहोटीचं वाटू लागलं. तरुण मंडळींच्या नोकऱ्या सुरळीत चालू होत्या. बायासुद्धा रेशनिंगमध्ये लागल्या होत्या. स्कॉलर मुलं व्यवस्थित शाळेला जात-येत. सुंदर मुली त्यांच्याशी बोलत, वह्या-पुस्तकं देत-घेत आणि आम्ही देशभक्त काय करीत होतो ? तर, शाळेला दांड्या मारून चौपाटीच्या वाळवंटावर समंधासारखे भटकत होतो. चौपाटीचा कंटाळा आला की कोटात घिरट्या मारायच्या. कोटाचा कंटाळा आला की राणीच्या बागेत चकरा मारायच्या ! एकदा तर आम्ही हायकोर्टात जाऊन एका पोटगीच्या दाव्याचं निरस कामसुद्धा जांभया देत देत अथपासून इति-पर्यंत ऐकलं !

दिवस असे लकटले जात होते. क्रांतीचं महावस्त्र हळूहळू विरू लागलं होतं. आमच्या पायाखालची वाळू सरू लागली होती.

पाच महिन्यांनंतर एक दिवस कृतिसमितीने घोर निर्णय घेतला, ' शाळांवरचा हरताळ मागे घ्या आणि सर्वांनी शाळांमध्ये जा ! देशात चालू असलेली घात-पाताची चळवळ गांधीजींना बिलकूल पसंत नाही. गांधी महाराज की जय ! '

माझी बोबडीच वळली ! आता कुठल्या तोंडाने प्रिन्सिपॉलसाहेबांसमोर नाक घासायचं ? फार शरमिंदा झालो. प्रथम क्रांतीकारकांवर चरफडलो. पण ते सातारा, फलटण भागात अगम्य उद्योग करीत होते. त्यांच्या कानावर आमचा जळफळाट कसा जाणार ? त्यांना मनातल्या मनात चार दुगाण्या हासडल्या. माथं शांत केलं. पुस्तकं गोळा केली. अंगारा लावला. शर्ट विजारीत खोवला आणि शाळेची पायरी पाच महिन्यांच्या प्रदीर्घ खाड्यानंतर मान खाली घालून चढलो. गेल्याबरोबर प्रिन्सिपॉलसाहेबांनी हातावर दोन छड्या इतक्या ताकदीने ओढल्या की विजार ओलीच व्हायची वेळ आली होती. पण बचावलो. वर्गात रफटफ करायला सुरवात केली. माझी विद्यार्थीदशा पुनरपि सुरू झाली. बाहेर जगात कुणी काय झेंडे लावले होते ? पारतंत्र्यातला हिंदुस्थान पारतंत्र्यातच राहिला होता. जिवाचं रान करणारे विचारे महात्माजी तुरुंगात आत्मक्लेश भोगीत होते. पंडीतजी नगरला तुरुंगात खितपत पडले होते. पण ईश्वराला साक्ष ठेवून खरं सांगायचं तर त्याचंही मला-फारसं वाईट वाटलं नाही, की जेवढं प्रचंड वाईट माझी शाळा पुन्हा सुरू झाल्याा मुळे मला वाटलं ! किंबहुना पुन्हा शाळेत गेल्यानंतर तोंडावर आलेल्या मॅट्रिकच्य परीक्षेत आम्ही चारी मुंड्या चीत झालो त्याचं दुःखही, शाळा पुन्हा सुरू झाल्या-मुळे झालेल्या दुःखाच्या मानाने अगदी किरकोळ आणि कोमट कोमट वाटलं ! ◻ ◻

पुण्याने
देशाला अनेक व्यक्ती
आणि वल्ली
बहाल केल्या आहेत.
काही सुप्रसिद्ध
तर काही कुप्रसिद्ध.
जगभर
आपल्या सत्कृत्यानं
धमाल उडवून देऊन
प्रत्येकाच्या मनातल्या गोंधळाला
प्रश्नार्थक चिन्हात ठेवणाऱ्या
रुस्तुम सोहराब नगरवालाची
सुरस कथा

यापुढील विशेषांकी–
(१४ ऑगस्ट १९७१)

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS ( Weekly ) : 50 Paise : Regd. No. M-H 649

"पाडव्याला आपण गुढ्या उभारतो. आजही आम्ही चांगीवावर आमच्या बांधवांचं रक्त सांडून विजयाचा झेंडा लावला. पण विजय कुणाचा ? आमचा ? छे :

माणूसचे लेखक
कर्नल आनंद भास्कर जाधव यांनी
दुसऱ्या महायुद्धात ब्रह्मदेश आघाडीवर
बजावलेल्या कामगिरीचा

आँखों देखा हाल

# बर्मा फ्रंट

स्वातंत्र्यदिन
विशेषांकातील
आणखी एक
खास लेख



या विशेषांकाची पृष्ठसंख्या । सुमारे पाउणशे
नेहमीपेक्षा दुप्पट आकार (गरिबी हटाव अंकाचा)
किंमत दीड रुपया केवळ
विक्रेत्यांनी व वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.